# अमृतधारा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय रंजक
सं. क्र. २५५८



REFBK-0025179

शहाजादा सलीम आणि अनारकली

बाबुलनाथ

अपूर्ण काव्य
२५४८
२५१८९
२९१७७१८६

... ग्रंथालय ठाणे
२५४८
२५१८९
क्रमांक २९१७७१८६
ग्रंथ शाखा

# अमृतधारा

## नवीन सचित्र छंदोबद्ध काव्यसंग्रह



REFBK-0025179

बाबुलनाथ

काळे ब्रदर्स पब्लिकेशन
'शामसदन', ६० सोमवार पेठ, पुणे - ११.

श्री. विनायक शामराव काळे
( कवि - बाबुलनाथ )
लेखक, प्रकाशक, संपादक, वितरक
आणि संचालक
काळे ब्रदर्स पब्लिकेशन
'शामसदन'
६० सोमवार पेठ, पुणे ११.

सर्व हक्क :
श्री. सुभाष विनायक काळे
यांचे स्वाधीन

आतील चित्रें व फोटो :
श्री. हरिश्चंद्र लचके
५९५ नारायण पेठ, पुणे ३०.
कु रजनी फणसळकर
५५१ नवीन रास्ता पेठ,
पुणे ११.

ऑगस्ट १९८६

मुखपष्ठ छपाई :
स्वरुप मुद्रण
६८७ नारायण पेठ, पुणे ३०.

योग्य किंमत २० रुपये

मुद्रक :
पां. ल. गोगावले
श्री गणेश मुद्रणालय
३५७ शनिवार पेठ,
पुणे ३०.

ब्लॉक्स :
श्री. हरिश्चंद्र लचके
लचके प्रोसेस स्टुडिओ
५९५ नारायण पेठ,
पुणे ३०.



माझे ज्येष्ठ स्नेही

महाराष्ट्र कवि श्री. यशवंत

यांच्या पवित्र स्मृतीस

सादर समर्पण.

बाबुलनाथ

# अमृत धारा

## वर्षाव पहिला

### प्रदीर्घ बहारदार कविता


| कविता | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| शहाजादा सलीम आणि अनारकली | ९ |
| श्री माणिक प्रभु महाराज | ३९ |
| सती अनसूयेची सत्त्वपरीक्षा<br>व<br>श्री गुरुदेव दत्तांचा अवतार | ५७ |
| स्वामी श्री नृसिंह सरस्वती<br>व<br>कारंजा जन्मगांवाची महती | ६७ |
| पराक्रमी परशुराम | ७२ |


## वर्षाव दुसरा

### नावीन्यपूर्ण अप्रतिम कविता


| | |
|---|---|
| उषा देवते | १०० |
| हे आश्रम-जीवन | १०३ |
| गुरु शिष्य | १०४ |
| श्रीसमर्थ आणि उद्धव | |
| शिवभक्त श्री मार्कंडेयाची कथा | १०६ |
| गोदातीरी दिव्य चमत्कार | १०८ |
| खैबर खिंड | ११० |
| श्री घृष्णेश्वर | ११२ |
| इच्छा मरण | ११४ |
| अंबा आणि अंबिका | ११६ |
| सरस्वती आणि बनास | ११७ |

| कविता | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| जीवन क्षणभंगूर | ११८ |
| अतूट त्याची माझी जोडी | १२० |
| सीता हरण | १२२ |
| हिरा हरपला | १२३ |

## वर्षाव तिसरा

### वैशिष्ठ्यपूर्ण अजब कविता


| | |
|---|---|
| एका कवीचा खुळा धंदा | १२५ |
| तीन घोड्यांची शर्यत | १२७ |
| खल्वाटो निर्धनं क्वचित् | १२८ |
| मेलेला जिदा झाला | १३० |
| नव कवीचा लिंग-भेद | १३१ |
| भीम शूर तो दुर्बळ बनला | १३२ |
| भीम–पराक्रम निष्प्रभ ठरतो | १३३ |
| हौशी नट दोघे कोणी | १३४ |
| नाट्य सृष्टीतील शोकान्त घटना | १३६ |
| प्रयोग पहिला हो शेवटला | १३८ |
| दैवी चमत्कार | १३९ |
| कवी शिकंदर कीं बिलंदर ? | १४० |


## महत्वाचे शुद्धिपत्र

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३७ | ११ | आसादी | आझादी |
| ७८ | १ | हहय | हैहय |

# अमृत धारा

## वर्षाव पहिला

### प्रदीर्घ बहारदार कविता

**अमृत धारा**

अभिषेकाच्या कलशामधुनी
'अमृत धारा' कविता स्रवल्या
पंचामृतसम तीर्थ जाहल्या
स्वाद गोड घ्या त्यांचा लुटुनी !

१....

## शहाजादा सलीम आणि अनारकली

(जाति ल- वंगलता)



तारुण्याने मुसमुसलेली कोण अशी ही रमणी
अंगुर–बागेमधे पातली सुरेख नटुनी, थटुनी !

रंगीबेरंगी ती ल्याली मदनफुली सुरवार
पुष्ट उरोजावरी झळाळे जाकिट हिरवेगार !

हस्त-पदांना तिने लाविली मेंदी राजस्थानी
रूप गोजिरे तनुचे झळके निथळत आरसपानी !

शरीरकांती फुलाप्रमाणे प्रफुल्ल छेलछबेली
चंचल चपला अंगांगातुन यौवन अपुले उधळी !

काळे कुरळे केस मोकळे सोडुन पाठीवरती
फेकित जाळे कौळिण साक्षात् विहरे दर्यावरती !

शशीभोंवती छटा ढगांच्या शोभुन जैशा दिसती
बटा कचांच्या लहरत उडती तिचिया निटिलावरती !

कानांमधली दोन कुंडले हीरक–मोत्यांची ती
पदी चालता लखलख करुनी मागेपुढती डुलती !

हेवा करणाऱ्यांची लागो तिला न पापी नजर
नयनांमध्ये घालुन सुरमा फिरे परी कां स्वैर ?

सुडौल बांधा उंच तियेचा भरज्वानीने खुलुनी
सकल सुरूंच्या तरुंनी केली तिजवर मेहरबानी !

स्वेदबिंदु कधि तिच्या डंवरती प्रसन्न वदनावरती
पुष्पावरती टपटपणारे दंवबिंदू ते गमती !

रसरंगांच्या उद्यानी ही नाजुक कलिका फुलली
मधुर तियेच्या ओठांमध्ये मादक मदिरा वसली !

लाल गुलाबांपरी टपोरे कपोल उठुनी दिसती
डाळिंबाच्या दाण्यांसम की दातांची ती पंक्ती !

मशिदीमधल्या महीरपीसम कोरिव भुवया दोन्ही
नेत्रबाण कां त्यांतुन सोडी सावज दिसता कोणी ?

शुक चंचूसम सरळ नासिका कळी जणू चाफ्याची
सिंहकटी ती नाजुक–साजुक सुंदर सडपातळशी !

कठड्यावरती चढून एका यत्न तियेचा चाले
डाळिंबाचे फळ ते घ्यावे खुडून वृक्षावरले !

फळ तोडाया हात तियेचा पोचेना पण काही
चमत्कार पण घडे तेधवा, डोळ्यादेखत पाही !

धोंडा-वेष्टित–कागद कोठुन फळावरी आदळला
पडे खालती फळ तैसाही धोंडा तिज आढळला !

कठड्यावरुनी उडी मारुनी फळ ती हाती घेई
धोंडा-वेष्टित–कागद तैसा उचलत निरखुन पाही !

उलगडताना कागद त्यातिल मजकुर वाचायाला
न कळत तिजला मोह अनावर एकाएकी झाला !

वाचत असता कागद झाली लज्जेने बहु लाल
शहारुनीही शरीर गेले, तांबुस बनले गाल !

अनोळखी कुणि युवक तिथे तिज घाली प्रीती-साद
'नांव तुझे मज माहित नाही, देशिल मज का दाद ?

पाहुनिया सौंदर्य तुझे मी मोहुन अगदी गेलो
कलिजाचे मम तुकडे झाले, वेडा पुरता बनलो !

मोहबत करतो अती तुझ्यावर, कोणी मी न गनीम
प्रेम तुझे मज देशिल का गे, ? माझे नांव 'सलीम' !

रोमांचाने फुलून गेली अल्लड नाजुक तरुणी
जवानीतला युवक तेधवा गेला तिजला वदुनी – !

' केलेली मी शिकार द्यावी मुकाट मज हमखास
' द्या ना' म्हणुनी डाळिंबाचे फळ ते देई त्यास !

फळ देताना तिला जाणवे स्पर्श तयाचा गोड
मुखकमलावर तिच्या उमटली मंद स्मिताची झोड !

'दुसरी आणिक शिकार केली' लगेच तिज तो वदला
'कसली बाई ?' बळे जाणुनी, तया तडाखा दिधला !

'शिकार केली याच परीची', सलीम तिजला बोले
मुक्त हास्य मग चर्येवरती तिच्या खळाळुन उसळे !

'सुंदर आणिक वस्तु चाहतो मिळेल का ती बोल ? '
'योग्य जरी ती मिळेल', वदली सावरुनी निज तोल !

'ओळखले का मला ?' तशी ती काढी 'हो' हा शब्द
'चिठ्ठीमधल्या नांवावरुनी वदशी का बिनधास्त ?'

'शहाजादा तू शहाच भावी, ओळखती जन सर्व'
'गोड बोलशी,सांग परंतू काय तुझे गे नांव ?

'विचारल्याविण सांगायाची नाही अमुची खोड'
'विचारतो मग सांग अता ते करून ना हिरमोड !

'या जीवाचे असे बिचारे 'अनारकली' हे नाम !
'नामासम तव स्वरूप येते दिसून सुंदर ठाम'

'गरीब अबलेची कां थट्टा चालविली बिनधोक ?'
'अल्लाच्या दरबारी असती गरीब सारे लोक !'

'कबूल, पण ते दिसून येते अल्लाच्या स्वर्गात
शहेनशहा जे अक्बर त्यांच्या नाही दरबारात' !

'शहा पिताजी मानित नाही रंक राव हा भेद'
'दिसले, अनुभवले ते वदले, माफ करा खाविंद' !

'जाऊ दे ते सर्व, मनी मी धरतो इच्छा फक्त
प्रेम तुझे मज हवे, जहालो तुजवर मी अनुरक्त'!

'हाय ! तयाला विलंब अगदी झाला आता पुरता
हुंगुन गेले फूल तयाची इच्छा कसली धरता ?'
'कोमल काया तुझी कुणी गे कुस्करली ते सांग
कोण असा तो दुष्ट पातकी ? लागू दे मज थांग !'
'नांव कळाल्यावरी आपुली मोहबत ना टिकणार'
'तलाक देतो तुला मिळवुनी, बेगम मम करणार !
मला कळू दे नांव तयाचे तुला न अंतरणार'
अनार तेव्हा शरमुन काढी जळजळते उद्गार ! –
'कैसे सांगू, कैसे बोलू ? ऐका देउन कान
शहेन्शहा ते पिता आपुले अक्बर अब्बाजान !
जनानखान्यामधे तयानी बनवुन मजला राख
अल्प वयातच केले माझे जीवन पुरते खाक'!
'सत्य सांगशी ? स्पष्ट बोलशी ? बनलो मी हतकाय
शहा केवढे, तू ग केवढी ? नुरला जगती न्याय'!
'पुरुषांना ते दिसे नेमके स्वरूप स्त्रीचे मात्र
विवेक त्यांना रहात नाही उमरीचा तिळमात्र'!
'अविचारी ना मुळीच काही अमुचे अब्बाजान,
अल्प वयाच्या शादीस्तव तो विरोध त्यांचा जाण'!
'शादी माझ्याशी पण त्यांनी केली आहे कोठे ?'
'इज्जत त्यांची टांगुन वेशी, भकशी का हे खोटे ?'
'इज्जत माझी कुठे ठेवली?, मला रखेली केले
'विटाळता मम देह, वयाचे भान कुठे त्यां उरले ?'
'अब्बाजानांकडून झाली गलती अगदी मोठी'
'मोहबत करता तुम्ही अजूनी, इच्छा गमते खोटी'!

'अनार! शादी माझ्याशी तू खरेच करशिल काय ?'
'शहास कळता, होउन जाइल सर्वस्वी निरुपाय'!

'शक्य न कैशी शादी अपुली होणे सांग अनार?'
'जगू न देता शहा मला ते लगेच करतिल ठार'!

'शहा न इतुके खवीस, त्यांची समजुत मी काढीन'
'पुत्र भुले निज रक्षेवरती, होइल का त्यां सहन?'

'कठोर भाषण किती विदारक माझ्यासंगे करशी?'
'सत्य तेच मी वदे, शेवटी होइल माझी सरशी'!

'जळाविना तो मासा जैसा जिवंत ना उरणार
तुझ्याविना मम प्राण तसा गे क्षणभर ना तगणार'!

'तुमच्यासम मम जीव आपणावरी जडे हा भोळा
जीवन-ज्योती जळून माझा होइल चोळामोळा';

'बोलण्यात तू हार न जाता करशिल सकलां बाद
प्रीतित अपुल्या उद्भवली पण भलतीसलती ब्याद!'

'नका घाबरू, चला सावरू आपण एकामेकां
व्हायाचे ते होउन जाइल, येवो कसला धोका!'

दोघांमध्ये अशी भाषणें गाजुन जाता पार
सरून संध्याकाळ पातला आता अंधःकार!

बाहूपाशामधे आपुल्या अनारला तो ओढी
वरचेवर चुंबून तियेला सैल न अगदी सोडी!

पुष्ट तियेच्या दोन स्तनांवर नजर तयाची भिडली
कुस्करता ती अनार भलती शहारुनी उत्सुकली!

मिठीत त्याच्या सुखावुनीया संतोषाने रमली
भूक तयाची वाढत जाता दमछाकीने वदली -!

'गोडी थोड्यामधे सलीमा ! सोड म्हणी, मज सोड –
पाहिल अपणां चोरुन कोणी लपून वृक्षाआड !
बादशहाच्या कानी जातिल अपुले प्रीती–षोक
त्यांच्या क्रोधाग्नीमध्ये मी जळून होइन खाक !'
भानावरती सलीम येउन गद्‌गदुनीया वदला –
'पुन्हा कधी गे अनार येशिल भेटायाला मजला ? '
'योग घडे तर, चुकवुन येइन साऱ्यांची मी दृष्टी
बंदी नाही तुम्हांस कसली, मुक्त असे ही सृष्टी !'
'सत्य असे ते अनार वदशी, परिस्थिती बदलेल
काढू आपण तोड परंतू पुन्हा कधी दिसशील ? '
'संयोगाला अपुल्या देतिल शहा कधी न रुकार
असेच भेटू इथे उद्या, जा पडला अंधःकार ! '
खुशीत येउन सलीम तेव्हा पुनश्च तिज कवटाळी
दीर्घ तियेचे चुंबन घेता, शरमेने ती वदली – !
'भिंतीला ते कान, तसेही हेरां असती डोळे
भाषण अपुले श्रवेल कोणी, बघतिल कोणी चाळे !'
सलीम बोले –' अल्लावाचुन इथे न दुसरे कोणी '
परस्परांना करुन अलबिदा गेले प्रेमी दोन्ही !

२....

(जाति–चंद्रकला)

दिवस पुरा सरुनी सुरू हो अंधेरी रात
'अनार' झणि तेव्हा पोचली जनानखान्यात !
सलीमही तैसा प्रीतिनें वेडा बनलेला
संतोषून मनी आपुल्या महालात गेला !
प्रेमी युगुलांची भेट जी उद्यानी घडली
हेराने एका हाय ! ती अचूक पण टिपली !
हेर असा दुष्ट निपजला कोण चुगलखोर
दुजा न त्यां धंदा कसा तो बनला शिरजोर ?
'अबुल फजल' त्याचे नांव ते सकलांना ज्ञात
सलीमास जो की सदोदित पाही पाण्यात !
कट्टर तो वैरी शहाचा जिवलग पण दोस्त
मान तया मोठा शहाच्या भर दरबारात !
साधुन ही संधी करूनी तये अती घाई
द्यावयास वर्दी शहाच्या महालास जाई !
हाय ! परी तेव्हा दिसेना शहा महालात
रात्रीच्या वेळी धुंद तो जनानखान्यात !
विरस जरी झाला मनीं पण धरूनिया डूक
दुसऱ्या दिवसाला शहाला भेटे बिनचूक !
भरल्या दरबारी तिथे तो घाईनें येई
आपण आल्याची शहाला वर्दी निज देई !
कुर्निसात करुनी शहाला धीटपणे वदला -
'पेश करायाची बातमी एक तुम्हां मजला'!

‘ सांगा ती कसली ?’ शहा मग दावी उत्सुकता
म्हणे ‘ खाजगी ती मामला नाजुकसा भलता ! ’
‘ जवळ असे यावे बातमी द्या मज सांगूनी ’
फजल शहापाशी पोचला लगेच जाऊनी !
हळू आवाजाने बोलला ‘ सलीम तो अपुला
पुढे कसे सांगू ? अरेरे ! माफ करा मजला ’!
‘ दिली तुम्हां माफी परंतू न थांबता बोला
सलीमने माझ्या असा तो काय गुन्हा केला ? ’
‘ प्रेमामधि पडला आपुला सलीम शहाजादा ’
‘ हाय कुणाच्या तो ?’ शहा त्यां प्रश्न करी जादा !
‘ अनारकली प्यारी आपुली खास रखेली ती
जडून छंद तिचा करी तो तिच्यावरी प्रीती !
‘ वार्ता ही सत्य असे कां ? सांगा ऐकीव
काय पुरावा त्या तुम्हां ये कैशी जाणीव ?’
‘ अंगुर-उद्यानी तयांचे प्रीतीचे चाळे
कालच ते मजला माझिया नयनांना दिसले ’!
‘ वेळेवर तुम्ही खरी मज दिली बरे वार्ता
करुन चौकशी ती निवाडा करीन मी आता ’!
बोलुन त्यां ऐसे शहाच्या मनात ये राग
त्यजुनी दर्बार धरी तो महलाचा मार्ग !
शाही दर्बार जाहला अचूक बरखास्त
कुणास ना कळले तयाचें निदान ते गुप्त !

३....

(जाति-वसंत, गज्जल)

भला दर्बार सोडोनी महाली तो शहा गेला
मनी संताप आलेला तयाचा ना कमी झाला !

पुकारा देउनी गर्जे पहारा जो करी त्यास
'शहाजाद्यास सांगावे त्वरे मी बोलवी खास'!

महाली सारख्या फेऱ्या पुढेमागे शहा मारी
समोरी त्याचिया ठाके सलीमाची खडी स्वारी !

बघूनी त्या शहा बोले 'सलीमा, बैस ये बेटा'
शहाच्या बैठकीपाशी जहाला तो हळू बैठा !

शहा गोंजारुनी त्याला पुसे, होवोनिया शांत
'अरे मी ऐकिले कानी खरी का सांग ती बात'?
'मला सारे कळू द्यावे तुम्ही जे ऐकिलें कानी'
शहा रागावुनी तेव्हा कडाडे स्पष्ट शब्दांनी – !
'जनानखाना अरे माझा तुवा केलास रे भ्रष्ट
कळेना कां अशी व्हावी तुला बुद्धी बरे दुष्ट ?'
'वृथा बाजारगप्पांना तुम्ही देता कशी दाद ?
असे तो कोणता वैरी तयाची काय फिर्याद ?'
'फजल' सन्मित्र ते माझे कधी ना बोलती झूट
स्वतः जे पाहिले त्यांनी मला सांगीतले स्पष्ट !
'अनाराची' कशासाठी तुवा रे भेट घेऊन
तिच्याशी बात ना केली स्वतःचे प्रेम अर्पून ?'
मनी ओशाळुनी तेव्हा शहाजादा बने स्तब्ध
तयाची मान हो खाली मुखाने ना फुटे शब्द !

शहा गर्जूनिया तेव्हा वदे रागावुनी भारी
'अरे, तू गप्प का बेटा कसा झाला दुराचारी ?'

'जहाला स्नेह तो माझा अनाराशी अकल्पीत
जुळोनी ये तिची माझी जिव्हाळयाने खरी प्रीत' !

'तुला रे लाज ना कैशी रखेली तीच ना माझी
तिला मोहून तू जाशी कशी ती हो तुला राजी' ?

'जडायाला खरी प्रीती नसे धर्बंध कोणास'
'जनानखान्यातली माझी प्रिया ती जाण रे खास' !

'जडे आधी तिची प्रीती कळाले नंतरी मात्र
पित्याचे हाय ! ती माझ्या अरेरे ! प्रीतिचें 'पात्र' !

प्रिया ती ना तुम्हां शोभे खरी ती शोभते बेटी
तियेचा संग साधाया तुम्हां हो बुद्धि कां खोटी ?'

शहाच्या घालता त्याने घणाचा घाव तो वर्मी
शहा कां सर्द होऊनी तयाची ओसरे गुर्मी !

अखेरी शांत होऊनी शहा दे त्यास निर्वाळा
'वयाचा, जाति-धर्माचा नसे निर्बंध प्रेमाला !

अनाराच्याच प्रेमात कसा रंगून गेला तू
तुझ्यासंगे जगीं माझी अरे, होईल ना छीथू ?

शशीला डाग रे जैसा जनांचा दोष तो ठाम
मला लागूनिया जाता जिवा कोठून विश्राम ?

रखेलीने तुला वेडया कशी रे पाडली भूल ?
कलंकी तू शहा होता तुझा लौकीक जाईल !

हयाती मी अशा माझ्या    दिल्या होऊ बुऱ्या गोष्टी
प्रतिष्ठा लोपुनी माझी    वृथा राहीन मी कष्टी !
मला प्रेमाहुनी ताठा    असे तो खानदानीचा
धरावा तू न तो हेका    वृथा माझ्या रखेलीचा !
'परी' तू अन्य शोधोनी    तिच्याशी लाव रे शादी
रखेली जी प्रिया माझी    नको लागू तिच्या नादी !
शहाचा धाक ऐकूनी    सलीमाचा उडे खुर्दा
मनाशी तो वदे 'अल्ला    मदत् लाभो तुझी मर्दा' !
शहाच्या जाहल्या चालू    पुन्हा फेऱ्या पुढेमागे
निघाला प्रीतिचा वेडा    महालातून आवेगे !

४....

(जाति – केशवकरणी)

दुसऱ्या दिवशी मावळताना सूर्य नभोमंडली
वितरली छान हवा मोकळी !
ठरलेल्या योजनेप्रमाणे अंगुर – बागेमधे
कधीचा सलीम पोचे मुदे !
नटुनी, थटुनी 'अनार' उशिरा येता, तिज देखुनी
अतीशय सुखावला तो मनी !
एकसारखी नजर तियेच्या रूपावर रोखुनी
वदे तिज आतुरता दावुनी –!
'किति उशीर केला अनार येण्यास्तव
पाहून वाट तव व्याकुळला मज्जिव
कल्पना न येइल त्याची तुजला लव

शब्द दिलेला काल मला जो करशिल ना तू खरा
येउनी संशय गेला पुरा '!

' निघण्यासाठी कधीपासुनी सुसज्ज मी जाहले
हाय ! पण भीतीने ग्रासले !

जिकडेतिकडे कडक पहारे ठेवुन होते दिले
कसेतरि चुकवुन मी पातले ' !

बोल तियेचे ऐकत असता सलीम द्रवला मनी
करी पण गंमत नामी झणी !

वेलीवरली चार टपोरी द्राक्षें मधु तोडुनी
तियेच्या देइ मुखी घालुनी !

लगलीच तेंधवा अनार मनि लाजली
हासून तयाला आनंदे बोलली –
' किति गोड मधुर ही द्राक्षें मज लागली '
' प्रीति तुझी गे गोड तयाहुन भुलवुन जाते मला '
खुषित तो येउन बिलगे तिला !

शराब द्राक्षांची अति मोहक, गोड, सुवासिक खरी
पिताना कळे तिची माधुरी !

' डोळ्यामध्ये तुझ्या साठली शराब मादक भली
तियेने निद्रा मम भंगली !

अधरी तुझ्या चविष्ट शक्कर अपार तिज गोडवी
मधुरशा द्राक्षांना लाजवी !

मज्नूलागी लैला किंवा मदना लाभे रती
तशी मज अनार लीलावती '!

‘ किति कौतुक माझे करून देशी बरें
मज रूप लाभले दैवे जे गोजिरे
विध्वंस करिल ते जीवन माझे पुरे
जनानखान्यामधे डांबुनी पडले मी नाहक
रूप हे कारण बेलाशक ’ !

‘ करू नको तू मुळीच त्रागा, कुढू नको तू मनी
तुझी मी करीन सुटका झणी ’ !

‘ शक्य नव्हे ही गोष्ट सलीमा, आशा वेडी तुझी
व्यर्थ तू घेशी मम काळजी !

शहेन्शहांना कळता अपुल्या गुप्त अशा मस्लती
तयांचा चढेल पारा अती ’ !

‘ फजलकडूनी कधीच त्यांना कळली ही बातमी
अधम तो चुगलखोर आदमी ’ !

‘ प्रतिक्रिया शहाची काय जहाली बरे
मज सांग सलीमा, स्पष्टपणाने खरे ’
वच स्मरुनि शहाचे स्फुंदुन बोले त्वरे
‘ अनारवरती होउ नको रे कधीच तू आषक
सोड तो विचार नालायक ’!

‘ अंतिम तूझा विचार ठरला काय सलीमा, अता
जाहले हतबल मी सर्वथा ’ !

‘ दोघे मिळुनी पळून जाऊ अन्य मार्ग ना सुचे
तुझ्याविण जीवन लेचेपिचे ’ !

‘ मार्ग धाडसी पत्करताना झाली जर गफ्लत
सजा ती होइल दोघांप्रत ’!

'उपाय नाही त्याविण अंती उरला काही भला'
तिला तो देइ दिलासा खुला !

गगनात तेघवा मावळला दिनमणी
मनि होत उताविळ, सलीम सरसावुनी
घे मिठीत अपुल्या प्रियेस कवटाळुनी

वरचेवर चुंबून तियेला मंथुन काढी किती
राहिली तया न काही मिती !

कारंजाचे उडते पाणी जेथे बागेमधे
तिला तो ओढित नेई मुदे !

आपदमस्तक तिला भिजविता जलधारांनी पुरी
बने ती ओलेती सुंदरी !

पर्जन्याने न्हालेली ती लतिका जणु भासली
आर्द्र की थबथबुनी जाहली !

शरिरावरले विरल वस्त्र ते लपकुन तिजला बसे
चारु की वसंतसेना दिसे !

शुकचंचूसम दोन स्तनाग्रें उन्नत वक्षावरी
पुष्ट ते नितंब कळसापरी !

नजरेत तयाच्या प्रिया परीसम झुले
लाजून पूर्ण ती रोमांचांनी फुले
भर जवानीतला अनुभव तिजला मिळे

बळकट त्याच्या बाहूंमधली घट्ट सुटेना मिठी
मिटेना दोघांचीही दिठी !

प्रणय-नशेचा कळस गाठतां मिष्किल ती बोलली –
'भूक पण अखेरची वाढली '!
' सत्य असे गे तुझे बोलणे देहधर्म तो उरे
तयाविण समाधान ना पुरे ' !
' शादी माझ्याशीच सलीमा, करशिल ना सत्वर
काढणे धीर असे तोंवर '!
' बेशक शादी करिन तुझ्याशी कसम हवी का तुला ?'
' भरवसा त्वदीय आहे मला !
हा खेळ प्रीतिचा पुरे अता जाहला '
' भेटशील वेडे ! पुन्हा कधी तू मला ?'
' दिन शादीचा झणि ठरवुन दे चांगला
रोज इथे भेटेन खुशीनें,' बोलत ऐसे मिठे
निसटुनी पळत मृगाक्षी सुटे !

(जाति–लीलारती)

५....

अंधार पडूनी रात्र सुरू जाहली
आपुल्या महाली अनार्कली पातली
आधीच तिथे तो बादशहा ठाकला
जणु कृतांत काळापरी तिला भासला !

बघताच तिला तो क्रोधानें बोलला–
' यावयास इतुका विलम्ब का जाहला ?'
' कामास खाजगी गेलें होते जरा '
' सब् झूट ' ! वदे तो, बसे तिला हादरा !

'मी सत्य सांगते' अनार हळु बोलली
गर्जून शहाने लगेच धमकी दिली–
'तू औरत असशी, म्हणून नाही तर'...
'ना तरी काय हो केले असते खर ?'
'त्या गळफासाचे घडते तुज शासन'
'द्या बेशक मजला शिक्षा ती सांगुन'
'ते बघेन मी पण, बोल खरे तू अता
भेटलीस ना गे सलीमास तू स्वता'!
आवाज शहाचा चढलेला ऐकुनी
घाबरून गेली अनार भलती मनीं
घालून खालती मान हळू बोलली –
'बागेत आमुची भेट खरी जाहली'!
'व्यभिचार-गुन्ह्याला शासन राज्यामधे
माहीत असे कां तुला बरे कोणते ?'
'आरोप भयंकर केलेला ओंगळ
ऐकणार नाही, आहे मी निर्मळ'!
'आरोप झूट तो कैसा दे सांगुन'
'तो झूट खरोखर वदते मी निक्षुन
जरि प्रीती माझी जडे सलीमावरी
नच अजुन सोडली दोघांनी पायरी'!
'विसरून तुझा तू दर्जा तो आपुला
संबंध तयाशी कसा बरे ठेविला ?'
'दर्जा न कुणाचा प्रीती ती जाणते
सत्प्रेम आंधळे असत्य कां वाटते ?

जो जनानखाना प्रचंड दे पाळुन
त्या महत्त्व माहित प्रीतीचें कोठुन ?'
' आवरून मुख घे, कोणाशी बोलशी
मी कोण वाटलो, उद्धट कां वागशी '?

' मालीक तुम्ही मम, कधी न मी विस्मरे '
' मग सलिमाशी कां दोस्ती करशी बरे ?'
' मी सत्य खरोखर सांगू कां बोलुन ?
मज माफ करा, ' ' घे माफी, दे सांगुन ' !

' आपणांस अपुली बेटी मी शोभते
प्रतिपाळ तुम्ही मम केला हे जाणते
नच अपुल्याविषयी ओढ कधी लागली
त्या प्रीतीपेक्षा भीती मज वाटली !

मम देह विटाळुन काय तुम्ही साधले
मन विरुद्ध माझे कसे न हो जाणले
युव-युवती शादी करो खुषीने कुणी
फर्मान तुम्ही हे दिलेच ना काढुनी ?

मजसमान युवती सुंदर किति गांठुनी
कां जनानखाना देता शृंगारुनी ?
बळजबरी केली मजवर कां लोभुनी
ही नीती कसली ? न्याय बरे कोठुनी ?'

वर्मात घाव तो अनारने घालता
हो शहा निरुत्तर स्वीकारुन स्तब्धता
नरमून अखेरी त्याने वच काढले —
' तू खरी शहाणी अनार मी जाणले !

लाभलीस बेगम सलीमास तू जरी
आनंद जाहला असता मज अंतरी
पण दुर्दैवाने घटना ही घातक
नशिबात असे ते घडते बेलाशक !
मम रक्षेवरती प्रेम जयाचे जडे
होणार शहा तो सलीम माझा पुढे
दुर्लौकिक त्याचा नको कधीं व्हावया
अन् रोष जनांचा नको मला यावया !

शादीस न तुमच्या माझी ती मान्यता
मंजूर कदापी करील ना तो खुदा
तू नाद तयाचा पुरता दे सोडुन
नातरी सजा घे मृत्यूची जाणुन !'

'द्या मला सजा ती आनंदे भोगिन
कुर्बान करिन मी प्रीतीस्तव जीवन !

मम प्रेम खरे ते सलीमवरती जडे
सत्प्रीतीला ना पडती केव्हा तडे !'

'तुज रक्षा केली, चूक जरी मानतो
नच होइल गलती पुढे अशी सांगतो'
'द्या तलाक मजला आनंदाने म्हणी'
करि काकुळतीने अखेर ती मागणी !
'तू अनार असशी रक्षा माझी गडे
नच प्रश्न उरे तो तलाकचा त्यापुढे
तव कोणाशीही लाविन शादी सुधी
पण 'सलीम-बेगम' करीन तुज ना कधी !

तू जलदी त्याची दोस्ती दे सोडुन !'
' ते शक्य न काही व्हायाचे हातुन '
' मग जितेपणी तव हवीच बांधायला-
ती कबर, अखेरी दिला इषारा तुला !
घे मुदत तुला गे विचार करण्यास्तव
होईल ठीक; जर बेत बदलला तव
मी निघतो, माझी वाट मला मोकळी '
जाताच शहा, ती तळमळली मासळी !

(जाति – समुदितमदना)

६....

तिसऱ्या दिवशी संध्याकाळी अंगुर-बागेमधे
अनार आली सलीमास ती भेटायाला मुदे !
वेष तियेचा तेव्हा साधा, थाटमाट ना बडा
येण्यापूर्वी तिथें कधीचा सलीम होता खडा !
परस्परांची पछान होउन जुळली होती मने
अनार येता जवळ तियेला उत्सुकतेने म्हणे- !
' खडे पहारे चुकवुन आलिस धन्य हुषारी तुझी
माझी तुजला, तुझीहि मजला खरी अता काळजी !'

' महलामध्ये काल जेधवा उशिरा मी पोचले
तिथे अगोदर शहा देखुनी मनात भांबावले ! '
' काय म्हणाले शहा सांग तू, अधीर मन जाहले '
' नाद तुझा मी सोडुन द्यावा, म्हणून खडसावले ! '
' उत्तर तेव्हा काय शहांना तुवा दिले आपुले ? '
' तोंडावाटें शब्द न फुटता, तटस्थ मी राहिले ! '
' तुजवर त्यांची इतराजी ना पूर्णपणे जाहली ? '
' सत्य असे, पण मुदत तयांनी मनन कराया दिली ! '
' विचार तेव्हा अनार तूझा काय अखेरी ठरे ? '
' प्रेम तुझ्यावर कायम जडले, वदून गेले खरे !
मृत्यूची मज शिक्षा द्याया फेर न त्यांचा पडे '
सांगत ऐसे एकाएकी फुटे तियेला रडे !
' रडू नको तू मुळीच अगदी, ' सलीम तिज बोलला-
' नशिबामध्ये असे भोग तो हवाच भोगायला ! '
' विचार निश्चित काय सलीमा, तुवा ठरवुनी दिला '
आतुरतेने प्रश्न तियेने अखेर त्यां टाकिला !
' तुझा नि माझा एक जीव तो होउन गेला असे
विभिन्न मत मम तुझ्यावाचुनी बनेल आता कसे ?
निश्चय माझा शहांस देइन स्पष्टपणे सांगुनी
शादी माझी होणे नाही अन्य तुझ्यावाचुनी ! '
' निश्चित तेव्हा उरे न कसली धडगत आता मम
मौतीची ती शिक्षा माझ्या नशिबाला कायम !
लौकिक, अब्रूचा हा त्यांच्या प्रश्न जहाला खरा
अपुल्या प्रीतीचा तो टाकिल करून पक्का चुरा !

इतर कुणाशी माझी शादी लावुन देण्यास्तव
सज्ज जहाले शहा, परंतू दया न त्यांना लव !'
'झुगारुनी तू अनार, मजला तेव्हा कां जाशिल ? '
'दुष्ट असा तो विचार माझ्या मनीं कसा येइल ? '
'मुदत संपल्यावरी शहांना काय तुझे उत्तर ? '
'मौतच अमुच्या प्रीतिस देइल कायमचे अंतर !'
'माझ्यावरती प्रेम तुझे ते खरे मला आढळे
अजून अघटित घडेल ऐसे मनात येते बळे !'
'भलती आशा धरू नको, मम समीप ये शेवट
टळावयाचे अगदी नाही अनपेक्षित संकट !'
शेवटची कां भेट म्हणूनी तयास ती बिलगली
दुःखाश्रूंची फुलें तियेच्या नयनांतुन वाहिली !
डोळे भरुनी तयास बघुनी मिठी तिनें सोडली
निर्धाराने नरम दिलाने महालला चालली !
पाठीकडुनी तिची आकृती सलीम वेडा बघे
दीर्घ असा निःश्वास तयाच्या कलिजामधुनी निघे !

(जाति – रसना – गज्जल)

७....

शाही महालयाला
बेटा सलीम गेला
अक्बर् शहा तिथे तो
चैनीत बैसलेला !
काही न बोलताना
क्षण तो उगाच ठेला
पाहूनिया पित्याला
त्यानें सलाम केला !
‘ये ये समीप बेटा
लाजू नको मुळीच’
बोले शहा तयाला
खुणवूनिया हळूच !
बैसून मात्र दूर
बोले सलीम त्यांस –
‘माफी मला करावी
मम बोल ऐकण्यास !’
‘माफी तुला सदैव
माझी कृपा विशाल
तव बातचीत सारी
तू सांग रे खुशाल !’
‘प्यारी अनार्कलीशी
शादी करावयाचा
झाला अखेर पक्का
संकेत मन्मनाचा !
परवानगी तयाला
द्यावी तुम्ही खुषीने’
बोले सलीम ऐसे
दिल्दार भावनेने !
‘शादीस या त्वदीय
माझी न मोकळीक
तूझ्याकडून भारी
व्हावी न आगळीक !
तूझ्या दिलाप्रमाणे
वागू दिले तुला मी
दुर्लक्ष पार केले
शौकाकडे तुझ्या मी !
दुर्वर्तनी कसा तू
झालास सांग आज
वाटे तुला न कैशी
थोडीबहूत लाज ?
शादी तुझी असे ही
माझ्या मनाविरुद्ध
राखून मान माझा
वदतो तिला निषिद्ध !

नियतीस मान्य नाही शादी तुझी घडाया
केल्यास लट्पटी त्या जातील सर्व वाया !
प्यारी 'अनार' माझी आहे खरी रखेली
प्रीती तिच्यावरी तू वेड्या किमर्थ केली ?
अनुरूप तूज आहे प्यारी जरी अनार
नाते तिचे नि माझे देते तुला नकार !
लौकीक थोर माझा भावी शहा खरा तू
फासून काळिमा त्या कां साधतोस हेतू ?
मी ना बळी पडेन तूझ्या दुराग्रहाला
अब्रूस चूड माझ्या लावू बरे कशाला ?
तूझ्या विरुद्ध जाया माझी खुषी न राजी
कर्तव्य पाळण्याला मी तो शहाच काजी !
घे हा हुकूम माझा त्यजुनी लगेच दिल्ली
स्वारीस तू निघावे करिता न पायमल्ली !
घेऊनिया प्रियेला जाऊ नको पळून
हानीच त्यात तूझी उमजून घे अजून !'
अवतार तो शहाचा कोपायमान सारा
पाहून पाय काढी बेटा सलीम् बिचारा !

(जाति – मोहिनी)

८....

'काय तुझा बेत ठरे तो सांग मज अनार
मुदत दिलेली तुज गेली सरुन आज पार!'

शहा अनाराच्या महली अखेरीस गेला
चेहरा तयाचा तेव्हा उग्र जाहलेला
प्रश्न तये ताठरतेनें तिला खास केला
दीन गाय उत्तर द्याया जाहली तयार!

'दिला तुम्हां पूर्वी माझा स्पष्ट मी जबाब
प्रीतिची असे ती अमुची खाजगीच बाब
व्हावयास शादी कसला नको तो दबाब
जीव सलीमावर माझा जडे बेसुमार!'

'ऐक तूच निर्णय माझा ठाम जो जहाला
तुझे आणि माझे नाते ज्ञात ते जगाला
नको कीर्ति माझी जाया पार ती लयाला
विचारास तुमच्या देतो स्पष्ट मी नकार!

धर्मबाह्य शादी तुमची खास व्हावयास
मंजुरी तियेला माझी तुम्हां द्यावयास
यातना किती मज होती अंत ना तयास
कसे सांगु समजावूनी जळे हे जिव्हार!

बादशहा म्हणुन अखेरी बने मीच क्रूर
तुला हवा तितुका पैका घेइ महामूर
सलीमास विसरुन जा तू कुठे पार दूर
भीक घाल इतुकी मजला बनुन तू उदार!'

'धनाने खरी ती प्रीती मिळे ना कुणाला
सलीमावरी मम प्रेमा ठाम जुळुन आला
मोह तो कशाचा नुरला माझिया जिवाला
खऱ्या प्रीतिला नच ठावा कधी फेरफार !'

'नको ज्ञान सूज्ञपणाचे तुझे ऐकण्याला
सजा मौतची तुज भारी हवी द्यावयाला
बंदिवान केले तुजला समज या क्षणाला
तुरुंगात होइल तूझी जितेपणि शिकार !

२ २

(जाति – उद्धव)

९....

दुर्घटना घडुनी आली	ती अनार कैदी झाली !
अपमान शहाचा केला	हा गुन्हा तियेचा घडला
कैदेत बिचारी पडली	हो कठोर शिक्षा तिजला
स्वारीवर जाण्यापूर्वी	ये सलीम भेटायाला

दुर्दशा तियेची बघुनी
मनि सलीम पुरता थिजुनी
अश्रूंनी गेला भिजुनी

चर्याही सुकुनी पडली	ती अनार कैदी झाली !

पाहुनी प्रियाला अपुल्या	ती अनार रडुनी वदली –
' भेटीला आला माझ्या	शेवटची आशा फिटली
मृत्यू मज येवो आता	भीती ना कसली उरली

प्रीती निज सुंदर जुळली
शादीची आशा जळली
गति दैवाची कां वळली ?

अल्लाची करणी सगळी	ही अनार कैदी झाली !'

'स्वारीवर जाण्यासाठी तो हुकूम मजला सुटला
तू निघून आणिक जाशी शेवटच्या पर्यटनाला !
तकदीर तुझे अन् माझे लावावा दोष कुणाला !'
मी हरलो, दुर्बळ ठरलो
व्यर्थ मीच जन्मा आलो
जन्मताच कां नच मेलो
शादी नच अपुली घडली तू अनार कैदी झाली !'

'हा परिस्थितीचा फटका नच इलाज आता कसला
प्रेमाचा अनुभव न्यारा दोघांनी मिळुनी लुटला
जे माझ्याजवळी होते सर्वस्व दिले मी तुजला
द्यावयास काहीं नुरले
दिल् माझे फाटुन गेलें
दों अनार घे जे उरले –
प्रीतीचा ठेवा जवळी ही अनार कैदी झाली !'

ऐकून प्रियेचे बोल तो सलीम अश्रू ढाळी
'मागणे मागते एक' ती अनार अंती वदली
'दिल् चाहिल तैसे माग आशा तव पुरविन सगळी'
'स्वारीहुन येता तुम्ही
नच दिसेन या जगतीं मी
मृत्यू मज येइल हुकुमी
शेवटची आशा उरली ही अनार कैदी झाली !'

प्रीतीची अपुली याद — या जगास येण्यासाठी
प्रीती ती कैशी करणे — युवकांस कळायासाठी
'ह्या संगमरवरी कबर — बांधुनिया माझ्यासाठी !'

'काळजी न करता कसली
तव इच्छा पुरविन सगळी
दे हात तुझे गे जवळी

भेटीची वेला सरली — तू अनार कैदी झाली !'

हातामधि घेउन हात — त्यांचे ते चुंबन घेती
दोघांच्या हृदयामधले — पट भंगुन तेव्हा जाती
रोमांच थरारुन उठती — आंतडी तटातट तुटती

हुंदक्यांचा वारा सुटला
रुदनांचा ढग गडगडला
अश्रूंचा पाउस पडला

ताटातुट होउन गेली — ती अनार कैदी झाली !

(जाति – पादाकुलक)

## १०....

कडक शहाचा हुकूम पाळुन — स्वारीवरती सलीम गेला
तुरुंगातल्या एका खोलित — अनार रखडे शिक्षा भोगित !

चिरविश्रांती देण्या करता — चिरा बांधला तिच्याचसाठी
जितेपणी तिचि मौत कराया — पूर्ण जहाली सर्व सिद्धता !

एके दिवशी सकाळ प्रहरी — अकबर आला तिचिया जवळी
अनार तेंव्हा थरकुन गेली — मौन पाळुनी, शांत राहिली !

दुःखावेगे शहा बोलला— — 'बेटी, मज दे माफ करूनी
सलीमवर तव प्रेम जाणुनी — कन्येसम मी तुला मानिली !

माझा पण झाला निरुपाय
खान्दानाचे करणे रक्षण
जनरोषाचे टाळुन दूषण
कर्तव्यच ते कठोर ठरले !

प्रीतीसाठी तू पतकरली
जीत तुझी ती होउन गेली
धीटपणाने मौत स्वतःची
हार आणखी माझी झाली !

निर्मळ तुमच्या प्रीतीमध्ये
दुष्ट कर्म ते हातुन घडले
म्या दुष्टाने निमक घातले
ठरवुन देतिल जन मज दोषी!

पैशाने ना लाभे प्रीती
प्रणयी जन तुज दुवा देउनी
स्पष्टपणे मज दिले पटवुनी
दिगंत होइल तुझीच कीर्ती !

बादशहा मी म्हणून नाही
दर्द व्हावया माझा कमती
बाप सलीमाचा मज जाणुन
माफ शेवटी कर मज बेटी !

रडावयाला तुजला येते
कारण पडलो बादशहा मी
रडण्याची मज ना आझादी
सारे खोटे मोठेपण ते !'

बादशहा तो वदता ऐसे
मनात कष्टी होउन गेला
डोळे त्याचे भरून आले
पश्चात्तापाने हळहळला !

अगतिकता ती बघुन शहाची
'माफी करणारी मी कोण
अनारकली भारून बोलली
सांगा मजला अब्बाजान !

माफी करणारा तो अल्ला
दिली तुम्हांला मी तकलीफ
कर्तव्याला तुम्ही जागला
तुम्हीच मजला करणे माफ !'
'हाक दिली मज 'अब्बाजान'
विसरुन मग मी सारे गेलो
प्रीतीस्तव तू मौत चाहिली
धन्य तुझे गे झाले जीवन !
प्रीतीची तव रम्य कहाणी
तमाम दुनिया श्रवुन निरंतर
उत्कंठेने करील गर्जत
तव प्रीतीचा जयजयकार !'

दु:खित होउन अंतर्यामी
हळूहळू टाकीत पाउले
दिन ते काही जाता सरुनी
येण्यापूर्वी हाय ! परंतू
काळ तसा तो पुढे लोटला
तयें चिऱ्यावर संगमरवरी
शब्दाला तो पुरा जागला
नूरजहाँच्या सहवासाने
कथा अशी ही अनार्कलीची
शादी त्यांची जरी न झाली

पुशीत अश्रू डोळ्यांमधले
बादशहा तो निमूट गेला !
सलीम आला स्वारीवरुनी
चिरेबंद ती अनार झाली !
बादशहा मग सलीम झाला
कबर बांधली अनार्कलीची !
घाव तयाच्या हृदया बसला
मंद गतीने कमती झाला !
जहांगीरच्या खास प्रियेची
अमर प्रीतिने गाजुन गेली !

## श्री माणिक प्रभु महाराज

(जाति-लवंगलता)



गुलबर्गा हे शहर तेधवा मोगल साम्राज्याचे
राजगृहाचे स्थान विराजे निजाम सरकाराचे !
समीप त्याच्या सुंदर शोभे गाव दुजे 'कल्याण'
वास्तव्याला तेथे नांदे कुटुंब सान, महान !
पती 'मनोहरपंत,' 'बयम्मा' सुगरण त्यांची पत्नी
दोघे भगवत् भक्त निरंतर वृत्ती धर्माचरणी !
निजाम दरबारात पतीला लाभे मोठा मान
संसाराला सदैव त्यांच्या लक्ष्मीचे वरदान !
सुखी कुटुंबामधे परंतू उणीव मोठी भासे
मूल बाळ ना म्हणून त्यांच्या मनात चिंता ग्रासे !

पतिव्रतेने खडतर करता व्रत-वैकल्ये कैक
देवदयेने मिळे तयांना सुपुत्र सुंदर एक !

आई वडिलांकडून लाभे नाम तया 'हनुमंत'
'महाराज' ते 'दादा' म्हणुनी पुढती झाले ख्यात !

सिद्धपुरुष कुणि गावामध्ये नांदत तेव्हा होता
'सदानंद' ते बनून स्वामी, मानी त्यांना जनता !

दर्शन त्यांचे घेण्यासाठी 'पंत', 'बयम्मा' जाता
स्वामी करती आज्ञा, त्यांची भाविक वृत्ती बघता !

'मनापासुनी दत्तगुरूंची पूजा नित्य करावी
गुरुचरिताची पवित्र पोथी दोघांनी वाचावी !'

पुढील दारी त्यांच्या बहरे औदुंबर शुभ वृक्ष
पतिव्रतेचे त्यावर गेले अचूक वेधुनि लक्ष !

त्याच्या भवती सडा शिंपुनी रेखुनिया रांगोळी
दिवा तुपाचा तेवत ठेवी प्रशांत सायंकाळी !

दोघेजणही नित्य वाचती गुरुचरिताची पोथी
घडता पारायणें, साजरी करती गोड समाप्ती !

खंड न पडला कधी तयांच्या खडतर सेवेमाजी
स्वप्नी त्यांच्या दत्तांची ये मूर्ती एके दिवशी !

जटाधार ती, अंगावरती भगवी कफनी ल्याली
करात स्मरणी, कक्षी झोळी, श्वेत विभूती भाली !

पदी खडावा, शुभ्र सफेती धेनू मूर्तीमागे
चार कुक्कुरें समीप तिचिया संचरती अनुरागे !

प्रसन्न होउन त्यांचेवरती दत्तगुरू भगवान
वदले, -'माझ्याकडून मागा तुम्हां हवे जे दान !'

हात जोडुनी दत्तापुढती दोघे वदले तेव्हा –
'कुल–मोक्षास्तव एक पुत्र तो भला लाभला देवा!
मात्र अन्य तो पुत्र तुम्हासम हुबेहूब द्या थेट
मनाप्रमाणे अम्हांस द्या ही गोड मनोरम भेट!'
प्रभू बोलले– 'सुपुत्र पहिला कुलउद्धारक खास
बनेल योगी, परब्रह्माचा संतत जडुनी ध्यास!
अन्य पुत्र तो जसा पाहिजे तुम्हांस तो मिळणार
करा न चिंता, कुलात तुमच्या संभव मम होणार!
'माणिकप्रभु' त्या नाम लाभुनी दिगंत मिळविल कीर्ती
'दत्तगुरू' ती अवताराची समजा साक्षात् मूर्ती!'
बोलुन इतुके दत्तगुरू ते झाले अंतर्धान
घडणारे ते घडून येते, बघा लावुनी ध्यान!

° ° °

दत्त गुरूंच्या कृपाप्रसादे घडून साक्षात्कार
'माणिकप्रभु' ते येती जन्मा घेउन नव अवतार!
बालपणातच कौतुक झाले नव बाळाचे भारी
सुवर्ण जिनसा अंगावरती, वस्त्रेही जरतारी!
अलंकार ते जपण्यासाठी संतत त्याच्यापाशी
अरब, रोहिले यांची राहे खडी शिबंदी खाशी!
अंगावरचे दागदागिने कोणी ना लुटणार
हिंमत मोठी करावयाला लुटारु ना धजणार!
सवंगड्यासह स्वैरपणे तो गांवामधुनी भटके
हासे, खेळे, पार हुंदडे, मनीं न चिंता शिरके!

वर्ष सातवे त्यास लागता, त्याचा हो व्रतबंध
थाट उडाला, नुरला कोठे खर्चाला धरबंद !

मेजवानीच्या कितीक उठल्या पंक्तीवर त्या पंक्ती
दानधर्म किति अमाप घडला त्याची नाही गणती !

पुरोहितांनी गायत्रीचा मंत्र बटूला दिधला
कुणी न पढवी, 'ब्रह्मकर्म ते ज्ञात मला' तो वदला !

शाळेमध्ये कुठे न जाता किती निराळ्या भाषा
कळे न कोणा, अवगत झाल्या कोठुन त्याला कैशा ?

संध्या, पूजा, रुद्र, संहिता सगळी धार्मिक कृत्ये
तोंडपाठ तो वदू लागला अचूक वदनावाटे !

चार वेद अन् षट् शास्त्रांवर मिळवुनिया प्रावीण्य
अधिकाराने वदू लागला, भले जडूनी पुण्य !

○ ○ ○

माणिक प्रभुच्या रूपे घेती दत्तगुरू अवतार
मंगल वार्ता जिकडे तिकडे पसरत गेली पार !

हुमणाबादेसमीप मोठे जंगल पूर्वी होते
नयनमनोहर मंदिर शोभे महादेवाचे तेथे !

माणिक प्रभुना तेथिल जागा पसंत पडुनी गेली
बिल्वतरूच्या छायेखाली वसती त्यानी केली !

आसपासच्या जागेची हो साफसफाई पुरती
पर्णकुटी मग एक बांधली, छप्पर तिजला गवती !

हळूहळू त्या स्थळी इमारत होई दगडविटांची
स्थापन केली अखेर तेथे गादी दत्त गुरूंची !

अनेक सेवकवर्गासाठी पर्णकुटयाही झाल्या
पिण्यास पाणी हवे म्हणूनी खोदुन विहिरी केल्या !

कालपरत्वे तेथे वसला सुरम्य मोठा गांव
त्या गांवाला 'माणिक मंदिर' लाभे मंगल नांव !

माणिकप्रभु ते येथे आले कायम वास्तव्याला
समजुन चुकलै वर्तमान ते लगेच प्रत्येकाला !

माणिकनगराकडे लोटली तदा प्रजेची झुंड
राव पातले, रंक धावले, सभ्य तसेही गुंड !

अलोट यात्रा भरत चालली पवित्र दिन गुरुवारी
माणिकप्रभुचे दर्शन घ्याया जो तो उत्सुक भारी !

माणिकप्रभुची रोज चालते येथे पूजा अर्चा
कथा, प्रवचने नित्य घडूनी होई धार्मिक चर्चा !

सकाळ, संध्याकाळी भाविक येथे आरत्या म्हणतो
सुगंध कर्पुर-उदबत्त्यांचा जिकडे तिकडे सुटतो !

पूगीफल, खारीक तयांचा देवापुढती ढीग
गिरीप्रमाणे लागुनि जाई प्रचंड श्रीफल-रीघ !

नवस करूनी येथे कोणी प्रसाद वाटप करतो
गोरगरीबां श्रीमान् धनको भोजन रुचकर देतो !

दत्तरूप ते पहावयाला, मिळण्या आशीर्वाद
कृपालोभही जडावयाला जो तो बनतो धुंद !

रोग आपुला निवारावया दु:खित येती कोणी
नष्ट कराया गरिबी जमती कैक निराश्रित प्राणी !

पिशाच्यबाधा अंगामधली काढाया बिनधोक
अनेक हेतू मनीं धरूनी गर्दी करती लोक !

दुःखांचा निज विसर व्हावया, लाभाया मनशांती
हवी संतती म्हणुनी दुर्बल निपुत्रिकाही येती !

चार घरें जाऊन मागती माधुकरी ती कोणी
उदरंभरणा भिक्षा तितुकी पुण्य म्हणूनी मानी !

क्षुद्र भिकारी, बेकारीजन ठिय्या देउन बसती
करीत सेवा सर्व प्रकारे दास प्रभूचे बनती !

माणिकप्रभुच्या दारी लोटे संपत्तीचा पूर
अनुभव येता जो तो देई पैका त्यां भरपूर !

ज्याला त्याला प्रसाद येथे रोज मिळूनी जाई
प्राप्त जहाली सिद्धी त्याला पडे न कमती कांही !

० ० ०

बालपणापासून प्रभूची होती लहरी वृत्ती
एका जागी ठरे न त्यांची गांवामध्ये वस्ती !

भक्तासंगे गांवोगांवी पदयात्रा ते करती
गिरी–गुहेतुन शांत ठिकाणी ध्यान लावुनी बसती !

योगसाधना करणाऱ्यांचे दर्शन व्हाया नक्त
ध्यास जडूनी संतत त्यांचा विहार चाले मुक्त !

जेथे तेथे चमत्कार नव जाती दाखवुनीया
किमया करणारा कां सारी झुकवुनि देतो दुनिया ?

दैवी लीला अगाध त्यांच्या वरचेवर पाहून
नास्तिक जनता आस्तिक बनुनी जाते आकर्षून !

जातिभेद ते अमान्य त्यांना मानव एकच धर्म
ज्याने त्याने ओळखुनी निज नित्य करावे कर्म !

पेच–प्रसंगामधे आपला सापडला जर भक्त
संकट त्याचे निवारुनी ते करती त्याला मुक्त !

विविध तऱ्हेची असह्य दुःखे भक्तगणांना जडती
जाणुन बुजुनी आनंदाने स्वतःस वाटुन घेती !

श्रद्धा बसुनी, अनुभव येता, जीवन ज्यांचे फुलले
गांवोगांवी अनेक धर्मी भक्त तयांचे बनले !

लहान मोठ्या बहुत देणग्या मिळता भक्तांकडुनी
माणिकप्रभुचे वैभव गेले शिखरावरती चढुनी !

० ० ०

लौकिक त्यांचा राज्यामध्ये निजामला आकळला
बड्या असामीसवे लगोलग निरोप तैं पाठविला !

' दर्शनभेटीचा मज अपुला अलभ्य द्यावा लाभ
येउनि इकडे मला करावे कृतार्थ ताबडतोब !

कृपा प्रभूंनी केली तर मी अपुल्या सेवेसाठी
जहागीर ती करीन अर्पण मोलाने जी मोठी ! '

निरोप कळता निजामचा हा प्रभू मनामधि हसले
त्याच असामीसवे तयानी उचित्तोत्तर धाडियले !

' राज्यामध्ये तुमच्या आणिक तुमच्या भूमीवरती
लुंगे सुंगे फकीर आम्ही ! करून बसलो वसती !

हीच अम्हाला अपुली देई जहागीर तो अल्ला
तुमची आणिक घेउन दुसरी काय करावे बोला ?

मेहरबानी करुन एकदा तुम्हीच इकडे यावे
दर्शनभेटीचा मज अपुला लाभ देउनी जावे !

खुदाकृपेने राज्य आपणा आहे हैद्राबादी
दुजे तसे मी, राज्य तुम्हाला इनाम देइन अगदी !
निरोप ऐसा पोचुन जाता, निजाम हो गपचीप
माणिकप्रभुच्या निस्पृहतेची मनीं करी तारीफ !

० ० ०

माणिकप्रभुचे कनिष्ठ बंधू नामे 'तात्याराव'
सुपुत्र त्यांचा सुंदर बालक नामे 'अप्पाराव !'
थाटामाटामधे तयाचा घडून ये व्रतबंध
सर्वत्रांना तदा जहाला आनंदी आनंद !
लोटुन जाता तदंतरी तो काळ पुरा महिन्याचा
योग पातला दोघे बंधू एकत्रित जमण्याचा !
निवांत जागा पारखुनीया एका खोलीमधली
बोलत बसले किती वेळ ते, कुणा न वार्ता कळली !
'स्वरूप आत्म्याचे ते कैसे ? विचार हो दोघांत
निर्णय त्यांनी काय घेतला, परस्परांना ज्ञात !
पारायण ते गुरुचरिताचे 'तात्याजींनी' केले
दानधर्महो करून नंतर नामस्मरणी रमले !
ठरल्या दिवशी भेटुनि सर्वां, आपुलकीने वदले
संध्या समयी माणिकप्रभुच्या नंतर पाया पडले !
विश्वाचा जणु निरोप घेउन पवित्र जागी आले
योगासन घालून अखेरी समाधिस्त ते झाले !
शास्त्राधारे उत्तरीय विधि 'अप्पाकडुनी' घडले
वियोग घडता 'तात्या'जींचा सारे जन हळहळले !

मंगल वाद्यांनी पण केला सुस्वर एकच गजर
दत्तभक्त ते 'तात्या' झाले जगतामाजी अमर !

o o o

'समाधि आपण कशी बरें ती घ्यावी आणिक केव्हा ?'
विचार आला मनामधेही माणिकप्रभुच्या तेंव्हा ।

प्रगटपणे जाहीर समाधी घेणे नाही युक्त
पेच पडूनी नाखुष होतिल अनेक यवनी भक्त !

निश्चय अपुल्या समाधिचा तो म्हणून ठेवुनि गुप्त
विश्वासातिल तिघाजणांना माहित केला फक्त !

जिवलग त्यांचे मित्र एकटे 'रामचंद्र' त्या काली
समाधि-कामावरी तयांची योग्य योजना झाली !

रात्रीला सर्वत्र जेधवा झोपुन जाती लोक
निश्चित जागी निवांत चाले बांधकाम ते चोख !

माणिकप्रभुचे बंद न पडता कसले धार्मिक कृत्य
पूर्विसारखे दर्शन त्यांचे भक्तांना हो नित्य !

रुग्णांच्या सेवेत सदोदित होउन जाती चूर
आर्थिक अडचण जडलेल्यांची करीत होते दूर !

परोपकारी कार्य चालले, उणीव नाही कसली
समाधिची ती गुप्त वार्ता कुणा कळू ना दिधली !

दिवस असे ते लोटत होते रोज खरोखर छान
'श्री'च्या पाठीवरी उगवला फोड कशाचा सान ?

काळपुळी ती दिनानुदिनही थोडी थोडी वाढे
तिच्या वेदना असह्य होउन 'श्रींचे' अडले गाडे !

बंद जहाले स्नान प्रभूचे, दर्शन तैसे देणे
निवडक लोकांचे पण तेव्हा होते येणे-जाणे !

तीर्थ घ्यावया भगिनींना ती बंदी केव्हा नव्हती
बरी प्रकृती 'श्रीं'ची तेव्हा, सताड दारे उघडी !

शास्त्री, पंडित, सज्जन केव्हा कुणी अवलिया येती
आजारी जरि प्रभू तयांना भेट न चुकता देती !

भेटीमध्ये बोलाचालित वेळ किती तो लोटे
भान न उरता, प्रभूस तेव्हा दुःख पळाले वाटे !

दानधर्म तो अफाट त्यांचा स्वैर सदोदित चाले
खंड न पडला त्यात कधीही संकट येवो कसलें !

दर सालाला येउन संधी भरते जत्रा छान
फकीर, मुल्ला आणि मौलवी यांना द्याया दान !

जत्रेमधे प्रभू तयांना रोकड पैका लुटती
खैरातीला जणू तेधवा अलोट येते भरती !

नुकते कोठे बरे वाटुनी गादीवर ते बसले
भक्तजनांना दर्शन द्याया मुक्त खरोखर झाले !

एके दिवशी दर्वानाने दिली प्रभूना वर्दी–
'जत्रा आली, भरत चालली, अफाट जमली गर्दी !

या वर्षाला नेहमीपेक्षा भरेल जत्रा भारी
खैरातीचा दिवस उद्याचा, हवी तयारी जारी !'

खबर ऐकुनी दर्वानाची प्रभूस पडली चिंता
खैरातीची कशी व्यवस्था करून द्यावी आता ?

गळा काढुनी रडू लागले, वदले रडता रडता–
'खैरातीला कुठून देवा पैसा उरला आता ?

अंगामध्ये शक्ती नाही हालायाची मजला
हाय ! हाय ! तो प्रसंग मजवर कैसा दारुण आला ?

निभावुनी मी या खेपेला कसा बरे जाणार
वदेल जनता – ' जिवंत असुनी कर्ण कसा हा ठार ? '

गळा काढुनी पुन्हा प्रभू ते ढसाढसाही रडले
नवल वाटुनी कित्येकांना, दुःखित तेही बनले !

' मायावी कां सोंग प्रभूचे ? ' खरे कुणा ना कळले
' खोटे आहे ढोंग तयांचे ' कुणी न तेव्हा वदले !

सूर्योदय होताच लुटीची सकाळ उदया आली
स्नान करूनी गादीवरती प्रभुची स्वारी बसली !

खैरातीचा समय जसा ये ज्याला त्याला चिंता
पैसा नसता माणिकप्रभुची खरी परीक्षा आता !

अगाध लीला असे प्रभूची खराच प्रत्यय घडतो
निज भक्ताची लाज राखण्या सत्वर धावुन येतो !

वेशीवरती तेव्हा गोंधळ एकाएकी उडला
गोसावी कुणि करी मागणी प्रभूस भेटायाला !

आत सोडता तये अर्पिला प्रभूस खजिना मोठा
नवल वाटुनी जो तो वदला ' लुटीस येथ न तोटा ! '

हैद्राबादेकडील होता गोसावी तो रोगी
रोग जयाचा बरा कराया, पडले प्रभु उपयोगी !

हुमणाबादेकडील तैशी आली व्यक्ती कोणी
प्रभूस ज्याने तदा अर्पिली भली धनाची गोणी !

गादीवरती बसुन प्रभूनी पैसा वाटप केला
वाटप सरुनी, पैसा सगळा आला तैसा उरला !

हीच प्रभूच्याकडून ठरली शेवटची खैरात
पुन्हा अशी ती होणे नाही ! गूढ कुणाला ज्ञात ?

०  •  ०

समीप तेव्हा येत चालला मार्गशीर्ष तो मास
पहिल्या एकादशीस मंगल–योग–समाधी खास !
' रामचंद्र ' जे स्नेही प्रभुचे त्याना बोलावून
सांगावा तो केला त्यानी अखेर आज्ञापून !
' मायावी व्यवहार आमुचा आता हा सरणार
लौकर त्याची खास समाधी होउनिया जाणार !
अमुच्यामागे येथे आपण सोळा दिवस रहावे
आग्रह केला कुणी तरीही त्याचे ना ऐकावे !
जाउन सोलापुरास तेथे नवीन स्थापा गादी
दत्तगुरूंच्या परंपरेची सुरू करावी नांदी !
दत्त गुरूंचा उत्सव तुमच्या घरीं होतसे छान
यथासांग तो पुढती व्हावा, राखा त्याची शान !
समाध घेउनि झाल्यावरती मौन चार दिन पाळा
वार्ता अमुची गुप्त ठेवुनी कुठे न बाहिर बोला !
पौर्णिमेस ते भंडाऱ्याचे भोजन होता पार
तदंतरी जनतेस दर्शना मुक्त करावे दार !
वर्तन ऐसे जर ना केले संकट ओढावेल
बेत आपुला फिस्कटला तर अनर्थ फोफावेल !
यवन भक्त मम सर्व अडाणी, संतापी, बलदंड
समाधिचे मग वृत्त समजता करतिल मोठे वंड !

नेतिल माझे शरीर कोणी दंगा धोपा करुनी
समाधि–कामामधे अडथळा येइल तेव्हा घडुनी !

यवनाहाती शरीर माझे हिंदू नच देतील
यवन तसेही भांडण काढुन युद्ध बळे करतील !

युद्धामध्ये समाधिपाशी नको सांडणे रक्त
म्हणून वार्ता समाधिची मम हवि ठेवाया गुप्त !

दर्शनास मम आतापासुन करा मनाई, बंदी
मनात शंका कुणास तेव्हा येइल ना ती अगदी !

समाधि झाल्यानंतर तुम्ही सोळाव्या दिवसाशी
पुतण्या अमुचा 'अप्पा' त्याला धरूनिया हाताशी !

अमुच्या गादीवर त्या बसवा, देउनि त्याला मान
अमुच्यामागे वारस म्हणुनी तोच असे गुणवान !

सर्व योजना सांप्रत जैशी पुढे तशी चालावी
गादी अमुची 'अप्पानीही' नीट सदा राखावी।'

० ० ०

'रामचंद्र' जे स्नेही प्रभुचे त्यांच्या सदनीं आता
वार्षिक उत्सव दत्तगुरुंचा सांप्रत चालू होता !

उत्सव–कामें पार पाडता, मनात ते अस्वस्थ
लक्ष तयांचे कुठे न लागे चर्या संतत त्रस्त !

जळफळ होई फार जिवाची चैन पडेना कांही
अस्थिर त्यांची स्थिती कशाने ? कुणास कळले नाही !

एकादशिचा दिवस जसा तो समीप अगदी आला
समाधिचा तो योग स्मरूनी हृदय विदारत गेला !

भेटायाला प्रभूस आता बंदी केली होती
तीर्थ अगोदर पुरे देउनी, स्त्रिया न कोणी येती !

विद्वान् ‘ बाप्पाचार्य ’ आणखी ‘ नारायण दिक्षीत ’
दोन चार श्रेष्ठींस अनुज्ञा, घ्याया प्रभुची भेट !

‘ प्रभुच्या गादीचेच अतां ते दर्शन होइल फक्त ’
आज्ञा ऐशी तिथे काढली इतर जनांना सक्त !

बंदोबस्ती अशी मंदिरी करूनियाही जारी
समाधिची ती गुपित बातमी फुटुन पडे बाहेरी !

वाऱ्यासारशी गुप्त बातमी जिकडे तिकडे पसरे
मंदिर–दारीं हिंदू-मुस्लिम-भक्त खडे हो सारे !

बळजोरी ते करू लागता वाढे गोंधळ, गिल्ला
‘ प्रभुचे दर्शन हवे अम्हांला, ना तर होइल हल्ला ! ’

जो तो ऐसे गर्जत वदला, बिकट स्थिती ओढवली
सरकारी येऊन शिपाई, चौकी त्यांची बसली !

मंदिरातही माणिकप्रभुचे रक्षण करण्यासाठी
ठेवुनि दिधले विश्वासाचे चार शिपाई खंदी !

अरब, रोहिले दास प्रभूचे सुसज्ज शस्त्राधारी
करीत, दमदाटी ओरडले घुसून मंदिर–दारीं !

‘ प्रभुचे दर्शन घेण्यासाठी आत अम्हाला सोडा
ना तर तुमचा खून होउनी पडेल येथे मुडदा ! ’

चिघळत गेली अती भयंकर परिस्थिती त्या ठायी
होइल मोठा दंगा ऐशी भीती दाटुन राही !

हुमणाबादेहुन सरकारी शस्त्रशिबंदी आली
प्रतिक्रियेने पूर्ण शांतता जेथे तेथे झाली !

o o o

समाधि–वार्ता यापावेतो बहुत ठिकाणी पसरे
जिकडे तिकडे वाहु लागले नैराश्याचे वारे !
माणिकनगरी रहिवासी जन अवाक होउन गेले
दुःखातिशये चेहरे त्यांचे मलूल अगदीं पडले !
रविरायाची प्रकाश-किरणे मंदावुनिया गेली
धूसर काळी छाया अवघी अवकाशाला आली !
रानामध्ये गुरे वासरे चरावया जी गेली
हुंदडता नच सुस्त राहिली पडून वृक्षाखाली !
स्वैर विहारी उडुगण पक्षी नभीं न संचरताना
घरट्यामध्ये निपचित पडले झाकुनि निज नयनांना !
सर्वांच्या जणु उत्साहाला विरजण तेव्हा पडले
वातावरणीं गमे अमंगल आता काही घडले !
समाधिबद्दल खरी बातमी कुणी कुणा नच सांगे
कुजबुज होई, तर्क चालले, जुळती ना पण धागे !
'रामचंद्र' ते घरात त्यांच्या उत्सव गुरुदत्ताचा
दर वर्षासम चालू राही खंड न तेथे कैसा ?
कथा, कीर्तने तशी भोजने चालू त्यांच्या सदनीं
प्रभू–मंदिरी येणे जाणे त्यांचे येई दिसुनी !
समाधिची ती वार्ता खोटी, ठासुन कोणी बोले
अंदाजाचे, अनमानाचे थांबत नव्हते चाळे !
दशमीच्या त्या तिथीस वार्ता कळली कांही लोकां
'समाधिचा तो विचार प्रभुचा झाला आता पक्का !

विद्वान् 'बाप्पाचार्य' आणखी 'नारायण दिक्षीत'
' कांही ब्राह्मण, तयांस केलें प्रभुने आमंत्रीत !
त्यांच्याकडुनी धर्मविधीने, शास्त्रविधीने तैशी
माणिकप्रभुनें धारण केली दीक्षा संन्यासाची !
' अप्पारावा'कडून घेतली विधिनें अपुली पूजा
त्याचप्रमाणे तशी घेतली मागुन त्यांनी भिक्षा !
नंतर त्यांच्याकडून आणिक त्यांच्या मातेकडुनी
वंदन होता प्रभूस, त्यांना दिले घरी धाडूनी !
त्या दिवसाला, त्या वेळेला मंगल वाद्यें झडुनी
नाद तयांचा, वास फुलांचा, कळे न येई कुठुनी ?

o o o

दशमीची ती रात्र उजळुनी अर्धी आता सरली
माणिकप्रभुनी इष्ट मंडळी जवळ स्वतःच्या केली !
'एकादशिला समाधि अपुली निश्चित ठरली' वदलें
आणि मुखातुन शब्द तयांच्या शेवटचे हे पडले !–
' समाधि अमुची अखेरची ही निश्चयपूर्वक जाणा
म्हणून आज्ञा सर्व जणांनी कृपा करूनी माना !
नका समाधी उखडू माझी पडून मायामोही
करील जो दुष्कृत्य तयाचे भले व्हायचे नाही !
पौर्णिमेस ते भंडाऱ्याचे भोजन होऊ द्यावे
समाधिचे मम वृत्त तोवरी कोठे ना फोडावे !
चुकून बाहेरी जर कोणी गुपीत हे फोडील
जिकडे तिकडे अनर्थ झाल्याशिवाय ना राहील !

समाधि झाल्यावरी तियेच्या सोळाव्या दिवसाला
गादीवरती बसवुन द्यावे अमुच्या ' अप्पाजीला !'
सर्व व्यवस्था पूर्विप्रमाणे पुढे तशीं ठेवावी
दत्तगुरूंची अखंड सेवा कधी न संपू द्यावी !'

० ० ०

ज्या दिवसाची वाट पाहिली मंगल दिन तो आला
पूर्व दिशेला प्रभा फाकुनी सूर्योदयही झाला !
एकादशिला सकाळ प्रहरी सिद्धी होता सगळी
समाधि-जागा तीर्थ शिंपुनी पवित्र आधी केली !
वेत्रासन मांडून ठेविली गुरुचरिताची पोथी
नंदादीपहि दोन तुपाचे लावुनि तिचिया पुढती !
स्नान करूनी पूजा अर्चा केली माणिकजीनी
उटी चंदनी तया लाविली नंतर 'अप्पाजीनी'!
टिळा केशरी लावुन त्यांना, घालुन देता हार
माणिकप्रभुचा दिसून आला त्रिगुणात्मक अवतार !
हार गळ्यातिल परत घातला प्रभुने ' अप्पाजीला '
दत्तार्ती होऊन अखेरी प्रसाद वांटप झाला !
'रामचंद्रजी,' 'बाप्पा शास्त्री, ' दीक्षित, ' ' अप्पा ' यांस
आनंदाने प्रसाद दिधला माणिकप्रभुनी खास !
वर्दी तो ये,-पैठण येथिल साधू ' भैय्याराव '
माणिकप्रभुच्या भेठीसाठी आले घेवुन धाव !'
आणुन त्याना आत, घेतली त्यांची प्रभुनी गांठ
गळ्यात घालुन हार, दिली त्यां मौक्तिक कंठी भेट !'

समाधीत प्रभु बसता झाला एकच जयजयकार
दर्शन त्यांचे पुढे न म्हणुनी, हळहळले जन फार !

० ० ०

श्वान 'भरोसा' नामे कोणी माणिकप्रभुचा प्यार
त्याच्यावरती जीव तयांचा होता अपरंपार !
समाधीत ते प्रभू बैसता श्वान उपाशी राही
तिसऱ्या दिवशी समाधिपाशी जग हे सोडुन जाई !

मराठी ग्रंथ संग्रहालय
२५४८
२५९८०
२११२८६
संग्रह शाखा

# सती अनसूयेची सत्त्वपरीक्षा
# व
# श्री गुरुदेव दत्तांचा अवतार







(जाति – भूपति वैभव)

स्वर्गात एकदां नारद ते मुनिवर्य
बैसले तपाला तीव्र, धारुनी धैर्य
श्रीविष्णु तयावर अखेर होउन तुष्ट
बोलले–'नारदा ! माग हवे ते इष्ट !'

जोडून करद्वय नारद वदले तेव्हा–
‘ रज तमोगुणाचे रूप दिसे तव देवा
पण सत्वगुणाचे रूप खरे जे धन्य
कर दर्शन त्याचे, इच्छा मम ना अन्य ! ’
श्रीविष्णु तेधवा तयास वदले तूर्ण
‘ हे त्रिभुवन सारे सत्व गुणाने पूर्ण
ते सत्वरूप मम झळके जिकडे तिकडे
शरिरात चुकुन मी दडवुन ठेवी थोडे !
मज असे खरी त्या तमोगुणाची गरज
‘ तत्कारण सांगा, ’ नारद पुसती सहज
‘ जर सत्वरूप मी समग्र धारण केले
कधि दैत्य माझियाकडून नसते मेले !
जाणून मनीं हे पूर्णपणे हमखास
मी सत्व अर्पिले शिवास अन् धात्यास
त्या तमोगुणाने रजोगुणाने, युक्त
मम दर्शन तुजला घडून येते फक्त !
जर सत्वगुणाचे स्वरूप मम संपन्न
तुज बघावयाची इच्छा हो उत्पन्न
ते ब्रह्मा, विष्णू, महेश जेव्हा एक–
जमतील, तदा नव रूप मनोहर देख ! ’
श्री विष्णूचे हे श्रवता सात्विक बोल
मनि नारद मुनिच्या ठसून जाती खोल
शिव, ब्रह्मा, विष्णू एकत्रित आणाया
सुविचार सुचे जो, जाउ न देती वाया !

संचार करित ते पृथ्वितलावर आले
परिभ्रमण तयांचे सुख-संतोषे चाले
ये सहज दृष्टिला, भटकत रानोमाळ
तो अत्रि ऋषींचा आश्रम रम्य, विशाल !

नदिकाठी आश्रम, प्रशांतमय प्राकार
ज्या भंवती झाडी सुरेख हिरवळ गार
पशु, पक्षी संतत विहार करती स्वैर
सत् पावित्र्याला इथे न कसले वैर !

आश्रमात नारद प्रवेशताना खुलले
ना तिथे महर्षी अत्रि तया आढळले
ऋषि-पत्नी शोभे कुलशीला अनसूया
करि स्वागत त्यांचे हासत ठेवुन चर्या !

देऊन नारदा वेत्रासन बसण्यास
बोलली– 'आर्य मम येतिल सत्वर खास
घ्या फळें मधुर ही आपण सेवायास
ठेविले थंड हे पाणी प्राशायास ! '

बोलून एवढे गृहकार्यी ती रमली
घेऊन मुसळ तें तांदुळ कांडत बसली
तितुक्यात आश्रमीं अत्रि मुनी आगमले
बहु तृषार्त, त्यानी पाणी तिज मागितले !

ती पतिव्रता अन् पुण्यवती स्त्री साध्वी
जे करात होते मुसळ अधांतर ठेवी !
धावून लगोलग पतीस देई पाणी
पति-सेवा अपुला स्वधर्म उत्कट मानी !

तो पतिव्रतेचा स्वभाव सेवाधर्मी
ते मुसळ अधांतर, चमत्कार तो नामी
नयनांनी अपुल्या नारद तेथे बघता
गहिंवरून वदले, ‘ सत्वशील ही कांता ! ’

ते तेज सतीचे सूर्याहून प्रचंड
धगधगीत अग्नी तिच्यासमोरी थंड
तो सुसाट वायू नम्र तिच्या हो पुढती
ती पंचभुतांना जिंकुन रमते जगतीं !

सौंदर्यवती ती गृहलक्ष्मी अनसूया
गुणि सकल स्त्रियांहुन श्रेष्ठ खरोखर आर्या
ज्यां घडेल दर्शन पुण्यवती रमणीचे
विलयाला जातिल सारे दोष तयांचे !

दृढ विचार ऐसे करिता अपुल्या चित्तीं
नारदास सुचली गोड मनोरम युक्ती
शिव, ब्रह्मा, विष्णू युती अता साधावी
कळ प्रियात त्यांच्या लावुन मौज पहावी !

लवलाही नारद जाउन वैकुंठाला
भेटलें अगोदर विष्णूच्या लक्ष्मीला
बोलले–‘ सती ती अनसूया तन्वंगी
गुण पतिव्रतेचा मोठा तिचिया अंगीं !

ती पृथ्वी-लोकीं गाजे अगदी भलती
जगिं सत्वशील अशि कुठे दिसेना युवती ’
म्हणि मनात मत्सर लक्ष्मीच्या हो जागा
जळफळुन अंतरी करी भयंकर त्रागा !

‘ जाऊन भेटते लगबग विष्णूलागी
अनसूया लागुन गेली कोण शुभांगी ?
सांगते तयां जा पृथ्वीवरती जलदी
अन् सत्वहरण या करुन तियेचे अगदी ! ’

कळ भलती सलती लावुन नारद-मूर्ती
पार्वतीस गेले भेटायाला पुढती
वृत्तांत कथियला लक्ष्मीला जो पूर्वी
श्रवताच तिचाही उसळे द्वेष मनस्वी !

‘ शंकरास वदते गांठुनि या भूलोक
घ्या अनसूयेची कडक परीक्षा चोख ’
पार्वती सतीचे वच ते क्रोधायुक्त
ऐकून मुनीने दुःख न केले व्यक्त !
शेवटी भेटले नारद सावित्रीला

जी ब्रह्मा-पत्नी सुरेख चारूशीला
लौकीक ऐकता तिनेहि अनसूयेचा
होऊन चकित ती भडके क्रोध तियेचा !
‘ धात्यास ह्मणी मी पाठवते भू-लोकीं
ती कोण अनसुया सत्व प्रतापी राखी ?
घ्या तिची परीक्षा हरवुन सारे सत्व
कां निरर्थ लाभे एका स्त्रीस महत्व ? ’
कळ लावुन भलती देवांच्या पत्नींत
मुनि नारद झाले मनात आनंदीत
‘ निज कार्य यशस्वी होवो, जे उत्स्फूर्त
जय नारायण ’ हे वदत जाहले गुप्त !

० ० ०

अथ देवी गेल्या अपुल्या महलामाजी
बातमी तयांनी दिली पतींना ताजी
' जी सुंदर आहे पतिव्रता अनसूया
तिजविषयी अमुच्या जडे मनात असूया !
भू–लोकीं आता सत्वर जाउन थेट
द्या अत्रिमुनींच्या सुखाश्रमाला भेट
त्या अनसूयेची घ्यावी सत्वपरीक्षा
ही तुम्हांस आहे अमुच्याकडुनी शिक्षा ! '
त्या शिक्षेनें जणु ब्रह्मा, विष्णु, महेश
मनि जळफळुनी त्यां त्वेषें ये आवेश
' त्या पतिव्रतेला समक्ष बघुनी घेतो
अणि सत्वहरण ते करुन तियेचे येतो ! '
करुनिया प्रतिज्ञा, देव प्रभावी तीन
निज रूप बदलुनी ब्राह्मण बनले दीन
भर दुपार तेव्हां कडक उन्हाळा माथी
आश्रमात आले गरीब तीन अतीथी !
सुस्वागत केले अनसूयेने त्यांचे
बसण्यास दिलें त्यां सौख्यासन वेतांचे
बोलले तियेला अतिथी व्याकुळतेने–
' लागली भूक दे भोजन तत्परतेने !
तव रूप पाहुनी आम्ही झालो वेडे
नच घेता तूं गे कसले आढेवेढे
होउनी विवस्त्रा भोजन तूं वाढावे
ही इच्छा अमुची म्हणुन तसे वागावे ! '

मागणी विलक्षण ऐकुनिया अतिथींची
चलविचल जहाली मनात अनसूयेची
संभ्रमात पडली, चुकुनि मनीं उद्‌भवले
' कां देव–पुरुष मम सत्व पहाया सजले ?
त्यां विन्मुख करुनी कसे बरे चालेल
मन निर्मळ माझे, पाप न कधि लागेल
मम सत्व खरे मग होइल कैशी हानी ?
जी पतिव्रता ती भीति न कसली मानी ! '
सुविचार असा हा मनात तिचिया येता
ती मुळी न डरता, पाकगृहाला जाता
बोलली स्पष्ट कीं, ' थांबा हो मेहमान
इच्छेस आपुल्या दिला पुरा मी मान ! '
पतिदेव तियेचे तेव्हा देवघरात
पूजेस बसूनी रमले होते शांत
वर्तमान सगळे तिने तयांना कथिले
जे अतर्ज्ञानी रहस्य त्याना कळले !
' प्रिय अनसूयेचे सत्व बघावे म्हणुनी
पातले देव हे ' कळले त्याना चुकुनी
पत्नीस तयानी गंगेने भरलेली
लघु झारी देउन कृती पुढे सांगितली !
' हे तीर्थ घेउनी आता झारीमधले
त्रय अतिथीवरती शिपड तू गे सगळे
मग खूष कराया तीन्ही त्यां पुरुषांस
दे इच्छा–भोजन वखवख हाटविण्यास ! '

पति–आज्ञा मानुन तीर्थाची लघु झारी
घेऊन सती ये अतिथींच्या सामोरी
शिपडून देई त्यांचेवरती तीर्थ
क्षणि चमत्कार मग घडून येई सार्थ !

अतिथींची रूपें बालस्वरूपी बनली
पय–प्यास जडुन ती ओक्साबोक्सी रडली
होऊन विवस्त्रा अनसूया त्या समयी
प्रिय माता बनुनी मांडीवर त्यां घेई !

तीचिया स्तनांना फुटला तेंव्हा पान्हा
प्रत्येक बाळ तो तिचे समजला कान्हा
स्तनपान करुन त्यां पुरवी त्यांची आस
सहवास तिचा त्यां गोड गमे हमखास !

० ० ०

कित्येक दिवस ते लोटुन ऐसे गेले
मुनि नारद विहरत आश्रम-स्थानी आलें
सुस्वागत त्यांचे अत्रिमुनींनी केले
अन् परस्परांनी कुशल स्वत:चें कथिले !

आश्रमात तेव्हा मुनिवर्यांच्या नजरीं
ती तीन्ही बाळें दिसली गोंडस हसरी
ते ब्रह्मा, विष्णू, महेश म्हणुनी देव
जाणिले तयानी सुखात सगळे जीव !

आनंद नारदां मनापासुनी झाला
ये परतुन त्यांचा फेरा वैकुंठाला
घेतलीं तयानी त्रय देवींची गांठ
निज पती कुठे ? त्या पहात होत्या वाट !

'ते पती तयांचे तीन्ही बाळें बनली'
माहिती सर्व ती मुनिवर्यांनी दिधली
चिंतेनें ग्रासुनि तीन्ही देवी रडल्या
'न्या अम्हां आश्रमीं' व्याकुळतेनें वदल्या !

नारदासवे त्या तीन्ही देवी मिळुनी
आश्रमात आल्या चिंतातुरता जडुनी
येताच पाहिली तीन बालकें छान
जी अनसूयेच्या मांडीवर रममाण !

देवींनी तिजला नमून वंदन केलें
मागून क्षमाही, दुःख स्वतःचे कथिले
याचना अखेरी केली कर जोडोनी—
'दे पती आमुचे परत पुन्हा मिळवोनी !'

अनसुयेस तेव्हा करुणा त्यांची आली
ती पतीस 'विनवी काय करू या वेळी ?'
बोलले ऋषी तिज 'तीर्थ पुन्हा ते घ्यावे
अन् बाळांवरती खुशाल शिंपुन द्यावे !'

हातात घेउनी झारी मग तीर्थाची
अनसूया आली लगेच देवीपाशी
बोलली,– 'आपुल्या पतीस घ्या निरखोनी
पाळण्यात निजली, त्यांना घ्या जाणोनी !'

कळवळुनि अखेरी देवी वदल्या तिजला–
' नच ओळखता ये अमुचे पति आम्हांला
तू माता त्यांची जाणुन घेशी त्यांना
दे करुनि पूर्ववत् अमुच्या पति देवांना ! '

त्या विनम्र देवी अनसूयेने बघुनी
शिंपिले तीर्थ मग बाळांवरती तीन्ही
बालकें पूर्ववत् देवस्वरूपी बनली
शिव, ब्रह्मा, विष्णू त्रिमूर्ति तेव्हा गमली !

त्या स्थळी अखेरी अत्रि महर्षी आले
अभिवादन करुनी त्रिमूर्तिना ते वदले–
' जाणार त्यजूनी अम्हांस देवा काय ? '
बोलले देव कीं ' अमुचे व्यर्थ उपाय ! '

त्यानंतर नारद पुढे सरकुनी वदले–
' शिव, ब्रह्मा, विष्णू एकट येथे झाले !
ते सत्व रूप निज देवा दावा सकला '
क्षणि चमत्कारही देवस्वरूपी घडला !
' मस्तकें तीन अन् सहा हस्तकें ज्याला
अवतार प्रभूचा नवीन जन्मा आला '
ती सात्विक-मूर्ती झळके गुरु दत्तांची
ही महती सारी माता अनसूयेची !

# स्वामी श्री नृसिंह सरस्वती
# व
# कारंजा जन्मगांवाची महती



(जाति–लवंगलता)

भारत देशी ' कारंजा ' हे गांव असे विख्यात
जन्म तिथे घे कोणी बाला ब्राह्मण उच्च कुळात !

ज्योतिषींनी तिचे पाहता जातक पडताळून
' भाग्यवती ही बनेल पुढती सुपुत्र तिज लाभून ! '
' अंबा ' ऐसे गोड सुमंगल नाम तियेला साजे
' देवि भवानी ' कुळीं जन्मली मायपित्यांना भासे !

विवाहास ती योग्य म्हणूनी नंतर मोठी होता
'माधव' नामक शिवभक्ताची बनून गेली कांता !
पवित्र, मंगल संस्कारांनी विकसित दोघे झाले
श्रीशिव–पूजन सदैव त्यांचे भक्तिपुरःसर चाले !
वय सोळावे वर्ष लागता स्त्री–तनु–कांती फुलते
माधव–पत्निस गर्भधारणा सहजासहजी घडते !
डोहाळे तिज लागुन गेले अनेक मोठे सान
अवस्थेत त्या करी निवेदन जनांस ब्रह्मज्ञान !

नऊ मास मग भरून झाली प्रसूत ती शुभ–काली
पुत्र लाभुनी, तिच्या जीवना माळ यशश्री घाली !
जन्मताच नव बालक वदला 'ओंकार' एकच शब्द
आश्चर्याने ऐकुनि झाले माय–पिता निःशब्द !

गांवामध्ये उत्सुक वार्ता पसरे टाकोटाक
चमत्कार तो बघावयाला गर्दी करती लोक !

दृष्ट नको व्हायला मुलाला म्हणून आई–बाप
घेती आस्था वरचेवरती रक्षुनि त्यास अमाप !
मायामोहे तया लाविती मंत्रुनिया अंगारा
रक्षाबंधन करास करती बांधुन काळा दोरा !

पृथ्वीवर जो साक्षात् घेई परमात्मा अवतार
दुष्ट, अघोरी दृष्ट कुणाची लागुनि त्या जाणार ?
नाम 'नरहरी' त्या बाळाचे प्रथम दिले ठेवून
'सरस्वती श्री नृसिंह' पुढती झळके नांवाजून !

माया पाखर माय-पित्यांची जडली बाळावरती
पालनपोषण जिवापलिकडे सदैव त्याचे करती !
माय बोलली पतिस एकदां आणुन अश्रू नयनीं
'अंगावरचे दूध तया मम जाते कमती पडुनी !
स्तन्यपान त्या करावयाला शोधा दाई दुसरी
दूध पुरे द्यावयास किंवा मोलें आणा बकरी !'
मातेचे हे भाषण श्रवुनी मुलास झाला हर्ष
स्तनांस नंतर मातेच्या तो करि नाजुकसा स्पर्श !
चमत्कार मग घडून येई लगोलगी परभारा
वाहु लागल्या स्तनांमधूनी परम पयाच्या धारा !
वस्त्रें भिजली, मातेचे पय वाहे देहावरुनी
विस्मित झाले माय-पिता ते कृति बाळाची बघुनी !
प्रगट न केले नवल विलक्षण त्यांनी हे कोणाला
नमस्कार पण दोघांनीही केला निज बाळाला !
दिनानुदिन लोटून बाळ तो वर्षाचा जरि बनला
मुका राहुनी 'ओंकारा'विण शब्द तया ना फुटला !
चिंता पडली माय-पित्यांना, उपाय दैवी हरले
बाळ न बोले पुरा अजूनी, गूढ तयांना पडले !
ज्ञान सर्व त्या होउन राहे, ऐकू येते सगळे
जाणुनबुजुनी वदे न कां तो ? कुणा न कारण कळले !
यापरि वर्षे सात लोटुनी गेली लागोपाठ
हां हां म्हणता बाळ जाहला वर्षांचा तो आठ !

कुळाचार निज पाळायास्तव पंडित तेव्हा वदले–
‘ मुंज करूनी टाका त्याची, दैव पहा कीं उजळे ! ’
मुंजीमध्ये गायत्रीचा मंत्र कसा त्या द्यावा
एकाएकी माय–पित्यांना संशय ग्रासे तेव्हा !
चिंताकुल ते माय–बाप निज बोल लाविती दैवा
‘ एकुलता हा बालक देवा मुका अम्हां कां व्हावा ?
शनि–प्रदोषी पूजा केली तुझी शंकरा खास
आस आमुची हाय निखालस नेशी कां विलयास ? ’
चिंता–ज्वाला माय–पित्यांना अनंत जाळुन घेती
मातेची निज समज काढण्या बाळ तदा हो पुढती !

तिला भेटण्या घेउनि जाई सळई लोखंडाची
तिच्यापुढे तो करून दावी बावनकस सोन्याची !

चमत्कार हा अगम्य दिसला मातेच्या नयनाला
लगेच बोलावुनी पतीला दाखविता तो दिपला !

लीला बाळाची कां दैवी ? खात्री व्हावी पटुनी
लोह आणखी तयास देता सुवर्ण दावी करुनी !

माय–पित्यांचा अखेर बसला पुत्रावर विश्वास
गमे तयांना ‘ अवतारी ’ हा बनेल पुढती खास !

कुरवाळुन त्या माय बोलली ‘ कुलदीपक तू ज्ञानी
बोल बोबडे तव ऐकावे फुटून तुजला वाणी ! ’
हसतमुखानें बाळ तेधवा खूण करूनी सांगे–
‘ गळीं जानवे घालाया मज लंगोटीही दे गे !

मौंजीबंधन माझे होता वाणी मज येईल
हुरहुर तुमच्या मनातली मग कायमची जाईल ! '

आनंदीआनंद तेधवा माय-पित्यांना झाला
मुंजीचा सोहळा मुलाचा डामडौलाने खुलला !

मातेसंग भोजन घडले बाळाला सुग्रास
गायत्रीचा मंत्र लाभला पित्याकडूनी खास !

माय मुलाला भिक्षा घालित अखेर वदली ' बाळा
मुखामधूनी बोल अता तू हवेच काढायाला ! '

भिक्षा घेता स्वच्छंदाने नवल खरे नव घडले
सर्व वेद ते मुखामधूनी बाळाच्या हो पडले !

चमत्कार हा बघून झाले पंडित जन दिग्मूढ
अवतारी त्या बाळाचे ये कळून त्यांना गूढ !

बाळ खरोखर जगद्‌गुरू तो होउन गाजे पुढती
कारंजा हे गांव झळकुनी जागृत लाभे महती !

# पराक्रमी परशुराम



१....                                                            (जाति–चंद्रकांत)

भृगु कुलातुन जन्म जयाला लाभे दैवाने
समर्थ भार्गवराम तपी तो गाजे कीर्तीने !
शिवाकडूनी मिळे तयाला परशु महाशस्त्र
'परशुराम' हे नाम म्हणूनी प्रसिद्ध सर्वत्र !
आजा त्याचा 'ऋचीक' नामक ब्राह्मण जातीचा
त्या धर्माचा जमदग्नीही पिता ऋषी त्याचा !

माय ' रेणुका ' तैशी आजी ' सत्यवती ' त्याची
मुळात क्षत्रिय जातकुळी ती वरिष्ठ दोघींची !

नदी नर्मदा तिचिया कांठी रम्य अरण्यात
जमदग्नीचा प्रशांत आश्रम तेव्हा विख्यात !

क्षात्र कन्यका, प्रिया ' रेणुका ' संसारी रमली
प्रेमळ पतिची भविष्यवाणी मनीं तिच्या रुजली !

' क्षात्र आणखी ब्राह्म अशा द्वय तेजानें युक्त
अवतारानें कुलात अपुल्या येइल भगवंत ! '

भविष्यवाणी पतिरायाची होइ फलद्रूप
गर्भवती ती राहुन झळके रम्य तिचे रूप !

वैशाखातिल अक्षय तृतिया, मंगल दिन आला
श्रेष्ठ तिथीला, शुभ वेळेला, पुत्र तिला झाला !

परशुराम तो, चार तयाला वरिष्ठ भाँवंडे
सर्वांपेक्षा तेज मुखावर त्याच्या ओसंडे !

बुद्धिवान तो निपजुन त्याच्या अंगी निर्भयता
विनम्रतेसह दिसे उठावुन आज्ञाधारकता !

सर्व सोबत्यामधे सुशोभे चलाख, बलदंड
सिंहासम तो छावा, नकळे करिल कधी बंड !

अग्नीसम तो दिसावयाला माणिक कीं लाल
पित्याप्रमाणे रागिट अगदी आग्यावेताळ !

जमदग्नीच्या आश्रमात नित लोटत दिनमान
प्रिया रेणुका रमवी अपुली संसारी जान !

संगोपन ती करी मुलांचे वरचेवर छान
पतिदेवाच्या दिनचर्येची ठेवि तशी शान !
एके दिवशी नर्मदेत ती करिताना स्नान
जलक्रीडेस्तव तिथे 'चित्ररथ' येई गुणवान !
राजविलासी वैभव त्याचे रूप तसे गोड–
बघुन तियेचे मन बावरले, लागुनिया ओढ !
लवलाही ती परत आश्रमी ओशाळुन येई
देखुन तिजला पती तियेचा संशय मनि घेई !
करूनिया दुर्लक्ष तियेचे वर्तन हो गैर
धार्मिक नीतीचेही घडलें उल्लंघन स्वैर !
'निमित्त इतुके पुरे' म्हणुनि तो ठरवी कोपीष्ठ
'प्रिया पापिणी, जिवंत तिजला न ठेवणे इष्ट !'
पर्णकुटीला तोंच तयाची सर्व मुलें आली
रानामध्ये कुंदमुळें जी आणाया गेली !
आल्यावर तीं करी पिता त्यां आज्ञा कटुशार
'माता तुमची ठरे पापिणी, करा तिला ठार !'
विचित्र आज्ञा श्रवुनि पित्याची चार पुत्र पहिले
स्थंभित होउन हाय ! तयांनी कर्म न ते केले !
परशुराम तो नंतर त्याच्या नजरेला आला
आज्ञा केली तशी पित्याने अखेरची त्याला !
आज्ञा बडिलानी जी केली तथ्य असे त्यात
प्रेमळ मातेचा वध केला त्यानें निमिषात !

आज्ञाधारकपणा तयाचा पाहुन जमदग्नी
संतोषित होऊन म्हणाले, 'घे वर मागूनी !'
मातृभक्त तो, मातृवियोगी, दुःखित झालेला
वदे 'पुन्हा मम माता प्रिय ती, करा सजीव तिला' !
योग्य विनंती निज पुत्राची, पिता करी मान्य
सजीव होता माय, ठरे तो 'परशूराम' धन्य !

० ० ०

२....

मौंजी-बंधन-उत्सव गाजे भार्गवरामाचा
आनंदाचा-उत्साहाचा-मंगल कार्याचा !
'कश्यप' आणिक भृगु कुलातिल महा तपी कैक
बटूस आशीर्वाद देउनी गेले बिनचूक !
ब्रह्मतेज ते तेव्हा त्याचें रजोगुणी खुलले
कौतुक त्याचे ज्याने त्यावे संतोषुन केले !
गायत्रीचा मंत्र तयाला तेजस्वी गमला
तीन्ही काळी संध्या-अर्चामधे अती रमला !
संध्या-अर्चामधे पूर्ण ना मिळे समाधान
अपूर्व साध्यासाठी त्याचे मन हो रममाण !
घेउनि आशीर्वाद आपुल्या आई-वडिलांचा
आश्रय त्याने दिला त्यजूनी झणी आश्रमाचा !
सरिता, ओढे, जंगल, सडका ओलांडत पार
पर्वत 'शालिग्राम' तिथे तो थकून ये फार !

‘ कश्यप ’ मुनिचा आश्रम शोभे गिरि-कंदरात
जेथे विद्यापीठ तपाचे, शास्त्रांचे ख्यात !
परशुराम हा छात्र म्हणूनी शिकावया येई
‘ कश्यप ’ मुनिना मनापासुनी मोह अती होई !
सुडौल बांधा, सतेज डोळे, नाक धारदार
गौर वर्ण अन् उंच पुरेसा, कृष्ण जटाभार !
शिवाप्रमाणे रौद्र जयाचे रूप दिसे स्पष्ट,
‘ परशुराम ’ तो, कश्यप मुनिचा शिष्य बनें पट्ट !
शास्त्र कलांचे, शस्त्रांचेही संपादुन ज्ञान
भार्गवरामाप्रती लाभले सौख्य, समाधान !
शस्त्र कलेला तीव्र तपाची जोड मिळायाला
गुरु – आज्ञेने निघून पुढती कुठे बरे गेला ?

० ० ०

३....

श्रीशिवशंकर, देवांचा तो देव महादेव
सर्व जगाचे मंगल करितो ठेवुनि जाणीव !
प्रसन्न करुनी घेण्यासाठी त्याला साक्षात
भार्गवरामाप्रती वासना होइ अतोनात !
वसतीस्तव गिरि गंधमादनावरती शिव राही
आठवताना परशुरामही स्थानी त्या जाई !
त्रिकाळ संध्या, ध्यानधारणा, व्रतें किती नाना
तीव्र तपस्येसवे चालवी कधि न चुकविताना !

प्रसन्न त्यावर अखेर झाली शिवशंकर मूर्ती
उपासना जो करी तयाला लाभे फल अंती !
अग्नीसम अति लखलखणारा प्रचंड धारेचा
' परशु ' तयाला बहाल केला प्रसाद भक्तीचा !
शस्त्र आणखी मंत्र अशा त्या विद्येतिल सगळी
गूढ रहस्यें त्यास शिवानें उकलुन सांगितली !
क्षत्रिय-विद्या किति शिष्याला अवगत झाली ती
प्रयोग करुनी समक्ष त्यानें पारखली पुरती !
झटापटीच्या समरामध्ये परशूचा वार
महादेवाच्या मस्तकावरी बसे जोरदार !
शिव-शीर्षी ती कायम राही जखमेची खूण
' खंड परशु ' हे नांव शिवाला तेव्हापासून !
शिष्य-शिरावर ठेवुन नंतर शिवगुरुनी हात
वदले त्याला अखेर देउन शुभ आशीर्वाद !
' परशुराम ' हा माझा परशू अर्पण तुज ठाम
वागविणारा ' राम ' त्यास तू खरा परशुराम !
चंद्र, सूर्य ते नभात जोंवर प्रकाश झळकून
लौकिक तूझा अपार जगतीं राहिल गाजून !'

• ० ०

## ४....

काल तेधवा धामधुमीचा क्रांती होण्याचा
परस्परांशी युद्ध करूनी, वरचढ बनण्याचा !

रेवा नदिच्या उत्तर तीरी हैहय साम्राज्य
'कार्तवीर्य' हा पराक्रमाने करी तिथे राज्य !

ईशकृपेने – लोकयुतीने – प्रचंड शक्तीने
वैभव त्याचे वाढत गेले सतत झपाट्याने !

सहस्त्र हातांचे बळ त्याला गेले लाभून
नांव गाजले म्हणून त्याचे 'सहस्त्रअर्जुन !'

शक्ती सामर्थ्यासह त्याचा अहंकार वाढे
पुण्य लोपुनी अराजकाचे वरचढ हो गाडे !

दिग्विजयाची इच्छा त्याला होई अनिवार
जिकडे तिकडे स्वैर तयाचा चाले संचार !

सामर्थ्याच्या धुंदीने तो निर्भय बनलेला
चाल समुद्रावरी कराया लढवय्या गेला !

समुद्रास तो गर्जत वदला गर्वाने पूर्ण–
'तोलामोलाचा माझ्यासम लढवय्या कोण ?'

शांतपणाने अखेर त्याला दर्या उत्तरला–
'योद्धा तो मी नव्हे,' (उफाळुन भविष्य कडकडला ! –)

'परशुराम तो योद्धा तुजला आढळेल खुद्द
युद्धाची तव वखवख वेड्या करिल जेरबंद !

लुटीत नाना प्रदेश त्याने करुनि बेचिराख
कार्तवीर्य तो हाय ! दुरात्मा ठरला हकनाक !

वशिष्ठ मुनिचा सुरेख आश्रम निष्कारण जाळी
सात्विक जन जे, संकट त्यांच्या निरर्थ ये भाळी !

पवित्र आश्रम जाळून करि जो व्यर्थ महापाप
वशिष्ठ मुनिनी रागाने त्यां दिला कडक शाप ! –
' आश्रम माझा जाळुनि केली हानि अतोनात
परशुराम तो घडकुनि तूझा करील निःपात ! '
दुष्ट नृपाच्या दुष्कृत्यांना जन सारे विटले
वनात एकांती वसणारे तपीहि ना सुटले !
प्रहार घातक जमदग्नी जे मुनी तया बसला
कार्तवीर्य सरसावुन त्यांच्या आश्रमात घुसला !
आश्रम सारा लुटून त्याची जाळपोळ केली
कामधेनुही पवित्र त्यांची हिरावुनी नेली !
वनात गेलेला परतोनी परशुराम आला
घडला जो वृत्तांत पित्याने निवेदिला त्याला !
कानीं पडता वृत्त, बनें तो रागानें लाल
लगेच त्या दुष्टावर गेला करूनिया चाल !
युद्धामध्ये दुष्ट नृपाला पार लोळवून
कामधेनु निज तयें आणिली त्वरें सोडवून !
भार्गवरामाच्या या कृतिने मुळात जो तंटा
तो न थांबता, पुन्हा तयावर फिरला वरवंटा !
मुलें नृपाची दुष्ट पित्यासम उर्मट, हैवान
सह्य न झाला पराभवाचा तयांस अपमान !
आश्रमात ना भार्गव ऐशी संधी साधून
करावयाला हल्ला गेले एकट धावून !

हल्ल्यामध्ये जमदग्नीला पार ठार केले
तेल वडचाचे वांग्यावरती पडुन तदा गेले !
दु:खद आणिक अती विदारक प्रकार जो घडला
आश्रमास निज भार्गव येता तयास आढळला !
संतापाने अती भडकला, मनात चरफडला
लाल जहाला, तोल उडाला, आवेशें उठला !
फोडुनि टाहो करी प्रतिज्ञा अघोर शेवटली
' क्षत्रीयांच्या अपकृत्यांची शतपापें भरली !
पितृवधास्तव सूड उगवितो, आवरुनी खेद
समग्र क्षत्रीयांचा आता करीन उच्छेद !'
' एक्वीस वेळा करून जखमा जलाल शस्त्रांनी
आवडत्या तव पित्यास वधिले क्षत्रिय गुंडांनी !'
दु:खद वार्ता निज मातेनें निवेदली जेव्हा
हाय ! मुलाचा कलिजा गेला फाटुनिया तेव्हा !
सूड, प्रतिज्ञा सत्पुत्राची श्रवूनिया माता
तृप्त होउनी, अखेर गेली सोडुनि या जगता !
दु:खातिशयें हाय पोरका परशुराम झाला
' परशूवांचुन कुणी न त्राता मला अता ' वदला !

° ° °

५....

करात परशू, मनीं ठसवुनी सूडाची निष्ठा
युद्धावरती निघे प्रतापी परशुराम द्रष्टा !

कार्तवीर्य तो वसे आपुल्या हैहय प्रांतात
भार्गव तेथे धावत गेला गर्जत त्वेषात !
सैन्य शत्रुचे सशस्त्र साऱ्या शस्त्रांनी झळके
एकाएकी युद्ध भयंकर धडाडुनी भडके !
रणभेरींचा निनाद झडुनी, अरिसेना उठली
धुंद धुमाळी उसळुन झाली एकच कल्लोळी !
परशुराम झुंजार एकटा परशूने लढुनी
हां हां म्हणता अरि–सेनेची उडवी धुळधाणी !
पराभवाने अरि–सेनेची होइ फुटाफूट
कार्तवीर्य ये चालुन तेव्हा बनून बेछूट !
द्वंद्व युद्ध मग दोघांमध्ये झडले घनघोर
खडा सामना रंगत गेला चढुनिया जोर !
कार्तवीर्य तो अखेर गेला पडून कमजोर
परशूरामे निज परशूने केले त्यां ठार !
राजपुत्र मग चिडुन धावले सैन्यासह तेव्हा
पराक्रमी परशूरामाचा उडवाया धुव्वा !
'द्वंद्व युद्ध ते नव्हे' जाणले परशूरामाने
रथावरी आरूढ जहाला लगेच वेगाने !
शिवाकडूनी लाभुन गेली धनुविद्या त्यास
तेज तियेचे प्रखर दाविले त्याने वैऱ्यांस !
लढाईत झुंजून अखेरी विजय तया लाभे
अनेकांस तो ठरुन सवाई रणयोद्धा शोभे !

वशिष्ठ मुनिनी शाप दिला ज्यां पूर्वी रागाने
खरा करूनी दाखविला तो परशूरामाने !

○ ○ ○

६....

वशिष्ठ मुनिची शापित वाणी सत्य जरी ठरली
भार्गवरामे करी प्रतिज्ञा पूर्ण कुठे झाली ?
जे जे क्षत्रिय दोषी ठरले हत्या हो त्यांची
पुरे अता ती, समजुत झाली भार्गवरामाची !
ताण मनावर पडे अतीशय तुमुल संगरात
मनःशांति निज व्हाया गेला गर्द अरण्यात !
अनेक वर्षे लोटुन जाता क्षत्रिय जे उरले !
'कुठे प्रतिज्ञा तुझी ?' म्हणूनी तयास चेतविले !
'क्षत्रिय काही सर्व न मेले उघडुनि बघ डोळे
जिकडे तिकडे अजून त्यांची जिवंत अल्प कुळें !
तुझी प्रतिज्ञा पोकळ सारी, बडबड वाह्यात
ढोंग करूनी तीव्र तपाचे, जाशि अरण्यात ! '
लाभुन शांती भार्गव कोठे बसलेला स्तब्ध
होता हेटाळणी, पुनरपी झाला प्रक्षुब्ध !
खोडी त्याची बळें काढली करुनि कुणी त्रागा
स्वीकारुन आव्हान, केसरी होइ पुन्हा जागा !
हैहय वंशापुरतें त्याचे पूर्वी रणक्षेत्र
रेवातीरी वसती ज्याची, कुठें न अन्यत्र !

उत्तरेस त्या हिमालयाच्या टोकापर्यंत
वाढत गेली आता त्याच्या युद्धाची हद्द !
जेथे तेथे क्षत्रिय दिसता हत्या हो त्यांची
दुष्ट भावना ज्वलंत राही मनात सूडाची !
कलिंग, मालव, विदेह, काश्मिर येथिल राजांचा
काढुन कांटा, त्यांस दाविला रस्ता स्वर्गाचा !
लुंगे सुंगे क्षत्रिय कोणी जे उरले सुरले
करुनि स्थलांतर, नामांतरहो गुपित स्थळी वसले !

शूर भार्गवापुढे आपुले तेज पडे दुबळे
कार्तवीर्य – सुत भयें कापुनी, हिमालयीं दडले !
जिकडे तिकडे परिसीमा हो हत्याकांडाची
झाली दाणादाण भयंकर क्षत्रिय वंशाची !
एक्वीस वेळा कत्तल झाली क्षत्रिय वैऱ्यांची
होइ प्रतिज्ञा – पूर्ति अखेरी भार्गवरामाची !
विजयोन्मादें तृप्त अंतरी परशुराम झाला
शस्त्र खालती ठेवित तेव्हा अखेरचे वदला– !

' चुकून आला दुःख – काल जर ब्रह्म – महर्षींना
करीन धारण शस्त्र तेधवा, अन्य कदापी ना ! '

मायपित्यांना, पितामहांना तर्पण देऊन
मुक्त बने तो संहाराच्या कृतकृत्यातून !

अत्याचारी क्षत्रिय राजे उद्धट बनलेले
पराभवाने मऊ सुतासम सरळ अता आले !

स्वेच्छाचारी वृत्ती त्यांची समूळ हो नष्ट
पृथ्वी सारी शांत बनूनी झाली संतुष्ट !
मनास आणिक तनूस अपुल्या द्याया विश्राम
‘ सिद्ध ’ वनाला, करावया तप, जाइ परशुराम !

० ० ०

७....

युद्धामध्ये सारी पृथ्वी परशुरामाची
स्वामित्वाने बने स्वतःच्या कायम हक्काची !
सागरवलयांकित पृथ्वीचे कर्तेपण सारे
ये तद् दैवीं, जीवन पण त्यां वैरागी प्यारे !
‘ काबिज केलेल्या पृथ्वीचे काय करू पुढती ’
विचार करण्यामधे तयाची गढून जाय मती !
अखेर त्याने अश्वमेध हा करुन महायज्ञ
‘ कश्यप ’ मुनिवर्यांना केले पृथ्वीचे दान !
यज्ञामध्ये रम्य बनविली सुवर्णमय वेदी
पृथ्वीदानासवे मुनीना अर्पण केली ती !
कश्यप मुनिनी करून खांडे सुवर्ण वेदीची
पुरोहितांना दिली दक्षिणा याज्ञिक कार्याची !
सुवर्ण सारे दान तयांना गमे मौल्यवान
मुनीस दुसऱ्या चिंतेने पण केले हैराण !
‘ पृथ्वीचे हे दान घेउनी चुकलो कां पार
रक्षण आता कोण तियेचे पुढती करणार ?

क्षत्रिय झाले नष्ट म्हणूनी रक्षण होईना
दुष्ट जनांचा त्रास अनावर तिला सोसवेना !

अधर्म माजुन नियमन कसले कुठे बरे नाही
त्रस्त होउनी रसातळी ती हळू हळू जाई !'

तिची दुर्दशा बघुन मुनीनी दावुन तत्परता
उरूत अपुल्या दाबुन धरिली, बुडू न तिज देता !

पृथ्वी तेव्हा उदास बनुनी मुनीप्रती वदली–
' बुडू न देशी मजला, किंवा देशी ना वाली !

विनाश झाली ना ती अगदी समूळ क्षात्र–कुळें
वंशज त्यांचे अजून कोठे असतिल दडलेले !

शोधुन त्यांना घेउन ये तू, आस मनातील
विद्यमान जे असतिल ते मम रक्षण करतील !'

आज्ञा होता पृथ्वीची मग मुनी कश्यपानी
क्षात्र-वीर ते कुठे तयांना शोधुन आणूनी– !

केले सिंहासनस्थ त्यांतिल बघून नर–रत्न
अभिषेकाने त्यांस अर्पिली नव राज्यें भिन्न !

नवीन क्षत्रिय भूपालांना होउ नये त्रास
म्हणून त्यांनी खडसावियले परशूरामास– !

' दान दिलेल्या पृथ्वीचा मी बनें मुखत्यार
तुला न येथे रहावयाचा कसला अधिकार ! '

गुरु – आज्ञा ती वंद्य म्हणूनी पाळण्यास पुढती
महेन्द्र गिरिवर भार्गव राही बांधुनि पर्णकुटी !

o • o

८....

निसर्ग–संकट कसे घडविले कठोर काळाने
हिमालयातुन गंगा वाहत आली वेगाने !
महाभयंकर पूर लोटला तिचिया पाण्याने
गंगासागर तुडुंब भरुनी उठे गर्जनेने !
प्रचंड लाटा उसळुन त्याच्या चहूंकडे भारी
प्रदेश पृथ्वीचा तो व्यापी अधिकाधिक जारीं !
जिकडे तिकडे चहूंकडेही सर्व आसमंत
प्रदेश भूचा जलाशयाने भरे मूर्तिमंत !
महासिंधुच्या उग्र उसळुनी लाटांच्या लहरी
फैलावत त्या थेट पातल्या सह्य-गिरी-कुहरी !
प्रळयाचा कल्लोळ तेधवा माजे भडकोनी
ऋषी, मुनींचें धाबे गेलें पार दणाणोनी !
जलमय बनता भूमी सारी हो हाहाःकार
जनता तेव्हा होउन गेली पार निराधार !
वर्तमान हे कळून चुकता परशूरामाला
धापा टाकत येई धांवत मदत करायाला !
धनुची दोरी ताणुन तेव्हां जोराने भलती
नियुक्त केली बाणावरही मंत्रांची शक्ती !
तुफान दर्यावरी सोडिला प्रखर तयें बाण
सूं सूं गेला ध्वनी करित तो अती वेगवान !
मंत्रांचे बळ ज्या बाणाला दैवी जडलेले
अपार सिंधू–जल ते त्याने मागे हाटविले !

प्रचंड मागे जसे सैन्यदल सरे हळूवार
हाटत तैसे गेले तेव्हा दर्या-जल पार !
सिंधु-जलाने प्रदेश जादा पुरा व्यापलेला
एकाएकीं पूर्विप्रमाणे मुक्त अता झाला !
सह्य-गिरीच्या पायथ्यास हो पट्टा निर्माण
सागर त्या भूमीपावेतों हटला संपूर्ण !
त्या पटयावर गांव वसूनी गाजे सर्वत्र-
रम्य कोंकणामधे दिव्य ते 'परशुराम क्षेत्र ! '

० ० ०

९....

परशुराम हा महाप्रतापी प्रवीण आचार्य
आर्यावर्ती गाजे त्याचे लोकोत्तर कार्य !
विद्या शस्त्रांची, मंत्रांची त्याला जी ज्ञात
शिवाप्रमाणे शिष्यवरांना शिकवी साक्षात !
क्षत्रीयांचा वध करण्याची ईर्षा पूर्वीची
मनामधूनी त्याच्या आता गेली कायमची !
कर्तृत्वाने प्राप्त तया जी संपत्ती होई
खुल्या दिलाने सत्पुरुषांना वाटुनिया देई !
दातृत्वाची वार्ता वेधी सकलांचे लक्ष
तेव्हा द्रोणाचार्य भेटले तयास प्रत्यक्ष !
दान-धनाची तये याचना केली त्या गोड
दानशूर तो अखेर देई उत्तर बिनतोड !-

' कश्यपास मी होते नव्हते दान दिले पूर्वी
देण्यासाठी थोडी आता ना उरली उर्वी !

सारी पृथ्वी अर्पण केली, देह उरे फक्त
शस्त्रास्त्रांचे तंत्र–मंत्र–धन हवे काय मुक्त ? '

गुप्त मंत्र ते धनु-विद्येचे त्याला जे ज्ञात
द्रोणाचार्यांनाही देई करून संप्राप्त !

भीष्मानाही तशीच विद्या देउ तये केली
हाय ! पुढे पण गुरु शिष्याची मैत्री विस्कटली !

पितृ-भक्तिने भीष्माने अधिराज्य आपुले ते
त्यजून, केले सत्यवतीच्या स्वाधिन पुत्राते !

' चित्रांगद ' तो, राज्यपदावर बसला जो कोठे
एकाएकी मृत्यु पावता संकट ये मोठे !

लहान बंधू ' विचित्रवीर्य ' जो तयास भीष्माने
राज्यपदावर बैसविले त्यानंतर प्रेमाने !

' विवाह त्याचा करून द्यावा थाटामाटात '
विचार ऐसा भीष्माच्या ये त्वरें मानसात !

स्वयंवराचा थाट तेधवा कन्यांचा तीन
काशी–राजा जाहिर करुनी देई मांडून !

मुली कशा त्या बघावयाला, भीष्म तिथे जाई
सुंदर दिसता, तिघीस पळवुन रथातुनी नेई !

काशी-राजाने जरि त्याचा पाठलाग केला
निष्फल झाला, भीष्म मुलीसह राजगृही आला !

मुलीस तीन्ही कळून आला भीष्माचा हेतू
'अंबा' त्यातिल रागें वदली येउन तिज किंतू !
'राजा शाल्वावरी बसूनी मन माझे गेले
निरर्थ भीष्मानी मज येथे ओढुनि आणियले !'
विचार घेता सभा-जनांचा, तिजला भीष्माने
राजा शाल्वाकडे धाडिले अपूर्व थाटाने !
'शाल्व स्वत:ला करील स्वीकृत आता अनुरागे'
अंबेला हे गमे परंतू, वदला तो रागें ! –
'दुसऱ्याचा तुज स्पर्श जहाला, जा नजरेआड'
भीष्मावर मग सूड उगविण्या ती हो अडदांड !
'नको पित्याचे, भीष्माचे वा घर ते शाल्वाचे
स्वीकारी ती जीवन आता कटु वनवासाचे !
'स्वयंवरातुन तिला पळविले भीष्माचार्याने
त्या अर्थी तिज तथें वराया हवे मुकाटयाने !'
सर्व ऋषींचा विचार ऐसा ठरला, पण भीष्म
'आचरणारा ब्रह्मचर्य मी,' उत्तरला ठाम !
सर्व ऋषींचा वरिष्ठ म्हणुनी 'होत्रवाहनाने–'
सांगितले, त्यापरी ऐकिले अखेर अंबेने !
'भीष्म खरोखर शिष्योत्तम त्या परशूरामाचा
पडू न देइल शब्द खालती निज गुरुवर्याचा !'
परशूरामाकडे धडाडुन अंबा मग गेली
जशी हकीकत घडली त्याला कथन तिने केली !

परशूरामाने तिज नेले भीष्माच्या पुढती
'लग्न करावे तयें तिच्याशी ' केली विज्ञप्ती !
भीष्माने ती पार झुगारुन केला अपमान
युद्धाचे मग परशुराम त्यां देई आव्हान !
युद्ध गुरूशी करावयाचे नव्हते भीष्माला
प्रसंग येता पडे वागणे तैसे वीराला !
अघोर गेले युद्ध माजुनी अखेर दोघात
विजय कुणाला मिळेल त्याचा लागेना अंत !
' चतुर्वेद हे अश्व आणखी रथ तो पृथ्वीचा
वायु सारथी, गमला तेव्हा भार्गवरामाचा !
सावित्री, गायत्री आणिक सरस्वती तैशी
पराक्रमाची अमूल्य कवचें दिसून ये त्याची ! '
अखेर भीष्माच्या शौर्याची पटली त्यां जाण
शिष्य गुरूवर कधीतरी तो करतो वरताण !
' भीष्म आपणाहुनी श्रेष्ठ ' तो निर्णय घे खास
निरुपायास्तव अंबेला दे लावुन वाटेस !

• • •

१०....

महेन्द्र गिरिवर निवास असता परशूरामाचा
त्याच्या भेटीसाठी ठरला विचार कोणाचा ?
पाची पांडव यात्रा करिता गंगाकांठाने
अनेक सरितामधे तयांची सचैल हो स्नानें !

महानदीच्या कांठी त्यांचा असतां मुक्काम
परशूरामाचे आठवले सहज तयां धाम !
दर्शन त्याचे घेण्यासाठी महेन्द्र गिरिवरती
पाची पांडव तेथे गेले आवर्जुन अगदी !
अन्य ठिकाणी परशुराम त्यावेळी गेलेला
एकाएकी आश्रमात निज वेळेवर आला !
भेट तयाची खास घेतली पांडव बधूंनी
महायुद्ध ते होइल सत्वर सकलां ये कळुनी !
आप्त बांधवामधील जावा टळून संग्राम
शिष्ठाई ती ज्यांनी केली त्यात परशुराम !
हट्टी दुर्योधनास केला त्याने उपदेश
उपदेशातिल मुळी न त्याला पटला उद्देश !
एकापेक्षा एक सवाई वीर जगीं ख्यात
गर्वाने जो वागे त्याचा अखेर हो घात !
' दंभोद्भव राजाची त्याला निवेदली गोष्ट
भ्रमात होता ' नरमुनिला ' जो करावया नष्ट !
हाय ! परंतू राजाचे बळ मुनीस आकळले
हां हां म्हणता समग्र त्याने भस्मसात केले !
संख्येने ते पांडव समरीं अल्प जरी दिसले
सामर्थ्याने नरमुनिच्यासम बलवत्तर ठरले !
दुष्ट विचारापासुन दुर्योधन नाही ढळला
भार्गवरामा न मानता तत्घात घोर घडला !

० ० ०

११ . . .

आर्यावर्तामधे गाजला रणीं कर्ण योद्धा
भार्गवरामाचा तो बनला शिष्य खरा बंदा !
अपुल्याविषयी गुरूस व्हावा आदर निर्माण
'ब्राह्मण आपण' खोटी ऐशी देई त्यां जाण !
मांडिस त्याच्या भुंगा डसतां, करि न हालचाल
भार्गवास ये कळून त्याचे तदां कपटजाल !
'क्षत्रिय असुनी ब्राह्मण आपण वदतो हा लुक्का
'खरे काय ते सांग' गर्जला गुरू बडा पक्का !
गुन्हा आपुला कबूल केला अखेर कर्णाने
जात खरी निज गुरूस कथिली प्रांजळ भावाने !
प्रतारणा करणारे त्याचे पाहुन चातुर्य
शाप दिला कडकडीत त्याला कोपुन अनिवार्य !
'युद्धामध्ये शस्त्रकलेचे मंत्र शिकविलेले
ऐन प्रसंगी स्मरणामधुनी जातिल तव सगळे !'
अर्जूनाशी अखेर लढता महा संगरात
पडताळा कर्णास तयाचा आला साक्षात !
युद्धामध्ये अपार त्याची गांगरली बुद्धी
लढता लढता आला मृत्यू लोपुनिया शुद्धी !

• • •

१२...

आयुष्याच्या उत्तरकाली वीर परशुराम
महेन्द्रगिरिहुन कुठे निघाला घ्याया विश्राम ?

सह्यगिरीच्या पश्चिम-भागी निवांत जागेत
वेणा नदिच्या तीरी मोठ्या वट-तरु-छायेत !

सृष्टिसतीचे अलोट वैभव जेथे समृद्ध
आश्रम छोटा बांधुन राही तिथे तपी वृद्ध !

गिरि मंदारावरी चमकतो सूर्य चकचकीत
तसे तपाने तेज तपीचे दिसे तकतकीत !

गांभीर्याने दिसून येतो रत्नाकर रौद्र
त्रिकाल जल-स्नानाने मुनिची तनू दिसे आर्द्र !

अग्निशिखेसम झळके त्याची तनू गौरवर्ण
वल्कलधारी, परशूधारी मूर्त उंच पूर्ण !

बळरामासह कृष्ण जेधवा फिरत इथे आले
दर्शन परशूरामाचे त्यां प्रथम असे घडले !

मथुरेवरती जरासंध तो स्वारी करणार
वृत्त समजतां कृष्ण कोपला मनात अनिवार !

मथुरानगरी आपण आता कैशी रक्षावी
निज प्राणाची चिंता तैशी किती बाळगावी ?

बंधूसह तो करित पलायन बाहेरी पडला
देशांतर केल्याने त्यांना भार्गव आढळला !

जरासंध जो दुष्ट तयाचे संकट ना टळले
श्रीकृष्णाने आगमनाचे कारण सांगितले !

'कोठे जावे, काय करावे, आम्ही यापुढती '
परशूरामाप्रती तयाने केली विज्ञप्ती !
परशुराम मग तया बोलला, करूनिया मनन
' गोमंतक गिरिवरी करावे दोघांनी गमन !
रानामधल्या पशुपक्ष्यासम स्वैर संचरून
दुर्गयुद्ध ते कसे करावे घ्यावे समजून !
दुर्गयुद्ध ते करण्यासाठी प्रचंड निकराने
प्राप्त तिथे होतील आयुधें सर्व प्रकाराने !
सामर्थ्यासह तुमचे दिसता अलोट ऐश्वर्य
निरुपायाने शत्रू जाइल होउन हतवीर्य ! '
होणाऱ्या युद्धातिल सगळा सांगुन मतितार्थ
त्यांच्यासह तो समक्ष गेला गिरी-दर्शनार्थ !
गोमंतक पर्वताकडे ते होता मार्गस्थ
चाल तयांची दिसून आली गजांपरी मत्त !
अनेक देवामुळे शोभुनी झळाळतो स्वर्ग
अग्नीसम ते तिथे चालता उजळे कीं मार्ग ?
गिरि मंदाराजवळ जसे ते देव पोचलेत
गोमंतक गिरि समीप चालत आले ते थेट !
तऱ्हेतऱ्हेचे लहान मोठे वृक्ष गिरीवरती
कोमल हिरव्या वेली त्यांना लपेटुनी घेती !
पृष्ठभाग तो गिरिचा सारा झाकुन वृक्षांनी–
दिसे मनोहर, त्यात नाचता मोर–मयूरींनी !

नभःप्रांगणी दृष्टिस पडता काळे घन गर्द
टाहो फोडित मोर सांगती ‘ सरे अता दर्द ! ’
पर्वत – शिखरें आकाशाला जाउन जणु भिडती
उंच तरूंचे शेंडे स्पर्धा त्यांच्याशी करती !
मदोन्मत्त ते गजराजांचे दात टोकदार
घासुन दिसती चरे शिलांवर खरखीत पार !
गिरिप्रांत तो संचाराने विविध विहंगांनी
किलबिल करुनी भरुन टाकिला मंजुळ नादांनी !
त्यांत आणखी कोसळणारे प्रपात पाण्याचे
दरीदरीतुन घुमवुन देती निनाद घों घों चे !
तृण, तरु-पानें दऱ्यांस घेती पार झांकळून
त्यांत काजवे चमकुन देती गगन जाणवून !
दऱ्या, काननें, शिखरें यांनी पर्वत सजलेला
त्याच्या भंवती अथांग वेढा जलें घातलेला !
तमाल, चंदन, आम्र, इंगुदी, निंब, देवदार
मूल्यवान हे गिरि रायाचे वृक्ष अलंकार !
गजराजांचे, हरिणांचेही कळप किती मोठे
गिरिराजाच्या सौन्दर्याचे धनरूपी साठे !
सरोवरातुन जिकडे तिकडे कमळांच्या वेली
निळी, तांबडी, पिवळी त्यांना फुलें डंवरलेली !
सिद्धपरायण, चारण, साधू, किन्नर, गंधर्व
गुहे गुहेतुन शांत ठिकाणी निवासले सर्व !

वृक्षाखाली शिलातळावर विद्याधर रमती
प्रीती–पत्रें प्रियांस अपुल्या प्रेमभरे लिहिती !
दडून कोठे वाघ, केसरी वसले या ठायी
त्यांच्या डरकाळ्यांनी पर्वत दुमदुमुनी राही !
प्रहार इंद्राच्या वज्राचा गिरिला नच ठावा
प्रभंजनाचे वा वणव्याचे ना भय त्या केव्हा !
शोभिवंत हा पर्वत संतत रम्य वनश्रीने
वानप्रस्थाश्रमी नांदती इथे शांततेने !
विशाल याचा असे पायथा, उंच तसे शिखर
भू– आकाशामधे बुडोनी प्रकाशतो प्रखर !
रम्य गिरीवर अशा पोचले त्रय ते जाऊन
स्पष्ट अखेरी परशुराम त्यां देई सांगून– !
'माझ्यासंगे तुम्ही पातला, झालो संतुष्ट
आयुध – प्राप्ती इथेंच तुम्हां होइल ती इष्ट !
देव जरीही युद्ध कराया आले साक्षात
पराभवाने कधी न तुमचा होइल नि:पात !
दुर्ग – लढाइस योग्य दाविले तुम्हांस स्थळ नामी
'शूर्पारक' नगराला जातो, कृतार्थ होउन मी !'

० • ०

१३ . . .

भार्गवरामें किती शिष्य ते केले निर्माण
त्या शिष्यांचे, त्या वीरांचे झाले कल्याण !

दाशरथी श्रीराम धुरंधर वीर धनुर्धारी
पराक्रमाने गाजे तेव्हां गुणी सदाचारी !

कीर्ती त्याची श्रवून कानी परशुराम घाला
राम–पराक्रम पहावयाला अयोध्येस आला !

त्याच्या आगमनाची वार्ता चहूंकडे झाली
दशरथ राजा राज्यपदावर शोभे त्या काली !

श्रीरामाचे दर्शन घडता परशूरामाला –
धीट तयाचा स्वभाव सहजी आढळुनी आला !

धनुष्य अपुले देउन त्याला वदला तेव्हा तो –
' दोरी याची ओढुनि दाखव कानापावेतों ! '

श्रीरामाने लीलेने ते धनुष्य पेलून
कर्णान्तीही दिली तयाची दोरी ओढून !

इतुके नच पण, हातुनि त्याच्या घडे चमत्कार
धनुदोरीचा करुन दाविला त्वरे टणत्कार !

' काय करावे मीच आणखी ' रामाने पुसले
भार्गवास सामर्थ्य तयाचे पुरते ना कळले !

निज शौर्याच्या अभिमानाने वदला तेव्हा तो –
' बाण एवढा ओढुनि दाखिव कानापावेतों ! '

भार्गव घेई काय परीक्षा ? न पाळता धर्म ?
शूर जाणतो शूराच्या झणि मनांतले मर्म !

रामानें तो बाण ओढता कानापर्यंत
झळके त्याच्या वदनावरती क्षात्रतेज मूर्त !
तेज जणू कीं, 'भास्कर, अग्नी, रुद्र तशी बिजली
या सर्वांची एकवटूनी रम्य युती बनली !
त्या तेजाने भार्गव दिपता, लगेंच रामानें
सरसर झरझर बाण सोडिला अजस्त्र शक्तीनें !
बाण उडे तों – 'उल्का, वर्षा, वायू, भूकंप —
यांच्या आवाजाने झाला प्रचंड थरकांप !
काळवंडल्या दिशा सर्वही, भार्गव हादरला
क्षत्रिय रामापुढे अखेरी नम्र पुरा बनला !
'अवताराचे कार्य आपुले सरले' त्या कळले
रामाठायी तेज स्वतःचे विलीन तें केले !
श्रांत जाहले जीवन त्याला द्याया विश्रांती
महेन्द्र गिरिवर निवांत राही करुनिया वसती !
प्रशांत जागेमधे तयाचे अदृश्य वास्तव्य
चिरंजीव तन्नाम राहिले जगामधे दिव्य !
जिकडे तिकडे सदैव त्याचा चाले संचार
'परशुराम हा रामासम हो दैविक अवतार' !

• ० ०

शिकस्त केली पराक्रमाची परशूरामाने
चरित्र त्याचे रम्य गाइले 'बाबुलनाथाने' !

# अमृत धारा

## वर्षाव दुसरा

### नावीन्यपूर्ण अप्रातिम कविता

# उषा देवते !



(जाति–चंद्रकांत)

विभवशालिनी उषा देवते ! शुभदे ज्ञानवती
दीप्तिमती तू कीर्तिवती तू सुंदर नव युवती !
भयाण अंधाराचा काळा पट हा उधळीत
स्वर्गकन्यके ! मंद पाउलें ये तू टाकीत !
नभःप्रांगणी पूर्व दिशेला होउन अवतीर्ण
रम्य किरणमय घालुन ये तू अलंकार पूर्ण !
शुक्रोदय होताच काल ये ब्राह्म मुहूर्ताचा
निद्रेमधुनी ब्रह्मोपासक जागृत होण्याचा !
ब्राह्म मुहूर्तानंतर ये तू उदयाला रोज
असुन पुरातन नित्य नवे तुज चढो दिव्य ओज !
यशोदायिनी तू तर लक्ष्मी तेजस्वी खास
रथात वसुनी सत्वर ये तू दर्शन देण्यास !

तुझ्या अलौकिक आगमनाने सकल ऋषी, योगी
स्नात होउनी उपासनेच्या लागतात मार्गी !
चोर, दरोडेखोर भयंकर उपद्रवी लोक
प्रगटतांच तू पसार होती खुशाल बिनधोक !
घरट्यांमधुनी विहंग उठुनी उडती बाहेर
किलबिल त्यांची सुरू होतसे नभात चहुफेर !
गोठ्यामध्ये गाय वासरें सुखात हंबरती
हिंसक प्राणी भक्ष्य शोधण्या स्वारीवर निघती !
आगमनाने तुझ्या प्रवासी होती मार्गस्थ
सज्जन, साधू उत्सुक बनती तुझ्या स्वागतार्थ !
कालस्थिती तू, खरी ऋषींच्या कोमल हृदयाची
तुला देवता मानण्यात ये, परंपरा तैशी !
उदय तुझा होताच सत्वरी संसारी जीव
आचरताती नैमित्यिक निज कर्मांना सर्व !
वंदन करुनी प्रथम तुला गे सारे विद्वान
तुझ्या स्तुतीचे मंगलकारक आळवती गान !
तुझ्यासवें जणु तांबुस धेनू लगबग येतात
पालन पोषण जगताचे कीं करण्या झटतात !
यज्ञांची तीं स्थळें सुशोभित दिसू लागतात
वस्तु चराचर झळकुन साऱ्या येति प्रकाशात !
सुंदर रमणी पुरुषांना जशि आकर्षित करते
तशी उषा तू प्रसन्न करशी प्राणी-मात्रांते !



ग्रंथालय
२५४८
२५५७८
२१।११।६६

गोचर करुनी वसुंधरेच्या सर्व पदार्थांना
कार्यधुरंधर व्हाया देशी स्फूर्ती रसिकांना !

दावे सुटता धेनू जैशी धांवे चहुफेर
श्रावणधारा झरता जल कीं पसरे सर्वत्र !

तशी उषे तव प्रभा फाकुनी दाहि दिशा जाते
सौभाग्याचे अपूर्व वैभव भक्तांना मिळते !

'भरद्वाज' त्या मुनिस दिले तू विभव तुझे खूप
'आंगिरसाच्या' स्तोत्रांना तू केले फलद्रूप !

पृथ्वीवरच्या प्राण्यांना तू जागृत करतेस
प्रेरक शक्ती यज्ञ कराया ऋषींस देतेस !

भक्त जनांच्या अज्ञानाचा करशी विध्वंस
महन्मंगले उषे तुझा ते घेति निजध्यास !

'वाय्य' ऋषींना प्राप्त व्हावया अश्वाचा लाभ
स्तवन तुझे नां केले त्यांनी धरूनिया लोभ ?

त्यांच्यासाठी, अमुच्यासाठी उदया तू येई
निवास स्थानी येउन अमुच्या तेज तुझे देई !

जरी लुटारू सूर्य दडुनि तव मार्गावर बसला
मार्गामध्ये विरोध किंवा त्रास न हो तुजला !

रथावरी आरूढ होउनी मूर्ति तुझी येवो
दीप्तिसंपदा भक्तांना तव धनदौलत होवो !

ज्ञानप्रेरणा, कर्मोत्तेजन, जनहित करणारी
अन्न–धनश्री तूच देवते ! संकट हरणारी !

विश्वपूज्य तू उषे अर्पुनी पवित्र वरदान
पापनाशिनी सार्थ होउ दे तव जन–कल्याण !

आधार :– 'उषासूक्त' ऋग्वेद

# हे आश्रम–जीवन

(जाति–मनमोहन)

हे आश्रम–जीवन मन माझे कां घेई आकर्षून ?
भव्य गिरिच्या पायथ्याशी
शांत जागा जंगलांची
त्या स्थळी रम्य हा आश्रम शोभे गुरुकुल कुणि थाटून !
दिव्य सरिता जवळ वाही
खळखळूनी नाद देई
किति विहंग फिरती सैरावैरा गीत गोड गाऊन !
आश्रमीं सायं, सकाळी
अग्नि-पूजा निरनिराळी
करि स्वच्छ हवा कां धूम सदोदित होम–हवन गर्जून !
कंद, समिधा, फळं, फुलें तीं
प्राप्त व्हाया छात्र फिरती
अन् कलश घेउनी आश्रम–कन्या जल भरतात झटून !
वृक्ष, वेलींना करांनी
नित्य त्या देतात पाणी
त्यांचिया हृदीं मग अपत्य-ममता अंकुरते हटकून !
धवल वसनें छात्र लेती
कंद, फळही गोड खाती
मउ मृगाजिनाची शय्या देते शांत नीज आणून !
गुरु–गृही राहून येथे
छात्र घेती शिक्षणातें
हो जीवन सर्वांगीण तयांचे विविध कला कमवून !
गुरुकुलें ही आश्रमांची
धन्य गमती दैवतांची
घडतांच तयांचे दर्शन, गेलो मलाच मी विसरून !

# श्रीसमर्थ आणि उद्धव

(जाति–पादाकुलक)

गांव ' टाकळी ' नदी किनारी
निवांत जागी समर्थ आले
त्रयोदशाक्षर शुभ मंत्राचे
पुरश्चरण सुरु त्यानी केले !

समीप तिथल्या खेडेगांवी
कुणी ' सदाशिव दशपुत्रे ' हा
मानव जाता निवर्तुनीया
नदीवरी शव त्याचे येई !

निवर्तलेल्या त्या मनुजाची
सहगमनास्तव येई पत्नी
दृष्टिस पडता तिनें समर्था
हात जोडले, नमस्कारुनी !

' उमा ' सतीला समर्थ तेव्हा
' अष्टपुत्र हो सौभाग्यवती '
देता शुभ हा आशीर्वाद
आश्चर्युनिया वदे सती ती– !

' समर्थ, अपुला आशीर्वाद
फलद्रूप तो होउन जावो
सत्य प्रचीती त्याची येवो
समोर गत हा माझा स्वामी !'

देहावरुनी हात मृताच्या
समर्थ तेव्हा फिरवुन देती
जिवंत झाला मृत माणुस तो
दृष्टिआड पण समर्थ होती !

मर्त्य जीव तो जिवंत झाला
ध्यास तयाला लागुन गेला
'पुनर्जन्म मज दिला जयानें
भेट तयाची सत्वर होवो !'

दुसऱ्या दिवशी समर्थ त्याला
आपण होउन देती भेट
भेटीमध्ये दोघांच्या पण
निश्चय गेला ठाम ठरून !

'सुपुत्र पहिला होइल जेव्हा
समर्थास तो अर्पण व्हावा'
येउनि जन्मा पुढे तेधवां
'उद्धव' नामें ख्यात जहाला !

प्रबुद्ध झाल्यावर 'उद्धव' तो
टाकळीस हो त्याची वसती
स्थापुनि मठ त्यां समर्थ देती
गुरुशिष्यांची गाजे महती !

# शिवभक्त श्री मार्कंडेयाची कथा

(जाति—लवंगलता)

' मार्कंडी ' या नदीकिनारी ऋषी ' मृकंडू ' कोणी
ध्यान धारणा करीत राही तपास तीव्र बसोनी !
प्रसन्न व्हाया श्री शिवशंकर म्हणून त्याचा यत्न—
अखंड चालू, त्यास्तव त्यानें अनेक केले यज्ञ !
ध्यान तपाचे बघून त्यावर शंकर झाले तुष्ट
' पुत्र तुला होईल परंतू निवड करी तू इष्ट !
पुत्र तुला जर हवा शतायू, निघेल मूढ, कुरूप
दुसरा किंवा हवा तयाचे सांगुन देतो रूप !
जगेल दुसरा सोळा वर्षे नंतर मृत्यू त्यास—
घडेल, लाभुन रम्य रूप अन् बनेल ज्ञानी खास ! '
शिवाकडूनी ऋषीस ऐसे मिळे न जों वरदान
चिंता पडुनी, गळून त्याचे जाई कां अवसान ?
धर्मपत्निला बोलावुनिया तर्क तियेचा घेई
दोघांचा मग विचार होउन निश्चय ठरुनी जाई !
' सोळा वर्षे पुत्र सद्गुणी जगतां नाही चिंता
उद्धारक होईल कुलाचा बनून तो हितकर्ता ! '
योग्य याचना अशी तयांनी शिवास अपुली केली
पुत्र तसा तो तयां लाभतां प्रमुदित दोघे झाली !
नांव मुलाचें गोड ठेविले त्यांनी ' मार्कंडेय '
शिव—कृपा लाभून गांठले अखेर अपुले ध्येय !

पुत्र तयांचा जसाजसा तो मोठा होउन जाई
माय-पित्यांना चिंता पडुनी पुढील घटना दाही !
सोळा वर्षे मुलास सरतां संकट ठाके भारी
रेड्यावरती बसून आली यमराजाची स्वारी !
शिव-लिंगाचे करीत होता पूजन तेव्हा पुत्र
मुखामधूनी संतत चाले शिव-महिमाचे स्तोत्र !
यमास बघतां शिव-लिंगाला घट्ट मिठी तो मारी
यमराजाची गात्रें तेव्हां ढिली जहाली सारी !
धजे न मन ते प्रथम यमाचे धरून न्याया त्याला
धैर्य करूनी अखेर त्यानें पाश टाकिला अपुला !
लगेच तेव्हां शिव-लिंगातुन त्रिशूळधारी मूर्ती—
महादेवाची प्रगटुन येतां, थरारला यम चित्तीं !
श्री शिवशंकर रागावुनिया यमास तेव्हां वदला—
'धैर्य तुझे हे व्यर्थ ! ' श्रवूनी यम माघारी फिरला !
मृत्यूंजय साक्षात शिवाचे पवित्र दर्शन घडतां
मार्कंडेयाला मृत्यूचे कधि न उरे भय आतां !
वैजनाथ या गिरीतुनी जी सरिता वाहे शांत
'मार्कंडी' तिज नांव लाभुनी झाली जगतीं ख्यात !
आयुधारा तिच्या अजूनी संतत वाहत जाती
मार्कंडेयाची ही घडली कथा तियेच्या कांठी !

## गोदातीरी दिव्य चमत्कार

(जाति–चंद्रकांत, अंतरा–पादाकुलक)

गोदातीरी पैठण नामक क्षेत्र जुने फार
नकळत तेथे घडून येई दिव्य चमत्कार !

गुरु आज्ञेने विठ्ठलपंत
संन्यासातुन होति गृहस्थ
आळंदीचे ब्राह्मण वृंद

चिडून त्यांच्यावरी टाकती पूर्ण बहिष्कार
देहत्यागाचे त्यां देती शासन विषधार !

शिक्षा देहत्यागाची ती
निरुपाये ते पालन करती
मुलांस अपुल्या त्यजून जाती

प्रयाग क्षेत्री पत्नीसोबत पाळुन व्यवहार
देहार्पण निज करून झाले दोघे भव पार !

निवृत्ति, ज्ञानेश्वर, सोपान
बहीण त्यांची मुक्ता सान
भावंडें तीं सर्व लहान

संन्यासाची पोरें ठरली लोपुन आधार
त्यांच्या नयनापुढे उरे नित भयाण अंधार !

जातीमध्ये त्यांना घ्याया
ब्राह्मणांस ना कसली माया
मौंजीबंधन त्यांचे व्हाया

निष्ठुर धर्माची त्यांवरती टांगुन तलवार
ब्रह्मवृंद ते करती त्यांचा पुरा कोंडमार !

सनातनी ते कठोर सगळे
मानव-धर्मा विसरुन गेले
पशुवत् वर्तन त्यांनी केले
निराधार तीं मुलें, निघाली करून निर्धार—
पैठण क्षेत्री लाभायास्तव नैतिक अधिकार !

पंडित तेथिल कट्टर धार्मिक
पोकळ आस्तिकवादी पाइक
वरचढ एकापेक्षा एक
शुद्धिपत्र देण्यास मुलांना देति न होकार
करून हेटाळणी उलट त्यां करती बेजार !

आत्मतेज मग ज्ञानेशांचे
मानव धर्माच्या महतीचे
जागृत झाले सत्व गुणाचे
'सर्वांभूती एकच ईश्वर घेतो अवतार'
सांगाया हे दिव्य दाविती करून सुविचार !

महिष कुणीसा पखाल-वाहक
उभा स्थळी त्या होता एक
साधुन त्याच्याशी संपर्क
महिष–मुखाने वेद वदविले घडवुन संस्कार
ज्ञानेशांचे तेज प्रकटुनी झाले साकार !

विस्मित तेव्हां सारे पंडित
पश्चात्तापें बनुनी दुःखित
ज्ञानेशांचे झाले प्रेषित
महिमा कळुनी, संतांचा ज्यां हो साक्षात्कार
जन्मभरी ते करती त्यांचा शुभ जयजयकार !

# खैबर खिड

(जाति–कोकिळा)

खैबर खिड भयाण
खरोखर खैबर खिड भयाण
हिमाळयाच्या उंच नगातुन झाली ती निर्माण !
हिमालयाचा पर्वत भक्कम
हिंदूकुश अन् काराकोरम
दोन तयाचे हात शोभती प्रचंडमय बळवान !
हिमाळयाचे उत्तर, दक्षिण
भाग असे ते देती पाडुन
हिंदूकुश दे पश्चिमेस निज पसरुन रांग तुफान !
भारत देशाचे संरक्षण
करावयाला वा कल्याण
निसर्ग निर्मुन अजस्त्र भिती देइ नगांचे दान !
हिमालयाच्या उत्तरभागीं
लोभी जन ते जागोजागी
डोळा त्यांचा दक्षिणभागीं भारत जो धनवान !
आक्रमकांचा संतत लोंढा
घोळत होता अपुला गोंडा
बर्फ–डोंगरी–मार्ग पिटाळुन करी तयां हैराण !
प्रयत्न त्यांचे कधि न थांबले
दैव अखेरी अनुकुल ठरले
हिंदुकुशोतिल उंच कमी त्यां गवसे खिड ठिकाण !

ओलांडुन ती खैबर खिंड
आक्रमकांची लोटे झुंड
शूर शिकंदर करून स्वारी साधी निज कल्याण !
गझनीच्या त्या महंमुदाने
अनेक स्वाऱ्या करुन बळाने
धर्मनिष्ठ तो हिंदुस जाई बाटवून हैवान !
चेंगिझखानहि चालुन आला
नंतर तैमुरलंग धांवला
शहांच बाबर येउन मोंगल राज्य करी निर्माण !
राज्य मोंगली दों शतकें ते
हिंदुस्थानीं बळकट होते
अखेर नादिरशहां लुटारू करि सर्वांवर ताण !
भारत भूवर करून स्वारी
लुटली त्याने दिल्ली सारी
मयूर सिंहासन बळकावुन गांठी पार इराण !
खिंडीतुन अन् सागरमार्गे
इंग्रज तेव्हां यवनासंगे
घुसुन भारतीं, फडकुन गेले ' युनियन् जॅक निशाण !
खरोखर खैबर खिंड भयाण !

ॐ ॐ

## श्री घृष्णेश्वर

(जाति—पादाकुलक)

मराठवाड्यामधे तेधवां राष्ट्रकुटांचे स्वराज्य होते
'कृष्णराज' हा राजा पहिला नांव आपुले गाजुन गेला !
महाप्रतापी तसाच ज्ञानी शिल्पकलेवर प्रेम तयाचे
त्याच्या कालीं वेरुळ गांवी खोदुन पर्वत बनली लेंणी !
लेणें कैलासाचे सुंदर भव्यपणा तो त्यात खरोखर
शिव, बुद्धोच्या, महावीरांच्या लेण्यामध्ये अनंत मूर्ती !
लेण्याजवळी वृक्षाभंवती लाल दगड ज्यां वापरलेला
घृष्णेश्वर ते शोभे मंदिर कृष्णवर्ण श्रीशिवलिंगाला !
शिवरायांचे जे आजोबा मालोजी भोसले तयानी
जुनाट मंदिर जे घृष्णेश्वर केला त्याचा जीर्णोद्धार !
मोगल राज्यामधे परंतू अनेक ज्या ज्या सुंदर वास्तू
विनाश त्यांचा बहुत जाहला घृष्णेश्वरही त्यात गवसला !
पेशवाईच्या काळामध्ये होळकरांची ख्यात 'अहिल्या'
तिने बघुन हे मंदिर भग्न मनामधे कां हो उद्विग्न ?
घृष्णेश्वरचा जीर्णोद्धार तिने पुन्हा तो दिला करुन
त्या शेजारी रम्य सरोवर तीर्थ 'शिवालय' शोभे सुंदर !
चहूंकडुन ते बांधिव सारे आत उतरण्या भव्य पायऱ्या
शिवरात्रीला तेथे भक्त स्नान करुनिया होती शुद्ध !
बारा ज्योतिर्लिंगामध्ये घृष्णेश्वरला अपूर्व मान
मागे टेकाड्यांतुन सान 'इलगंगा' ही नदी वाहते !

या स्थानाची मोठी महती
ब्राह्मण होता कुणी धनीक
दंतकथा ये कानीं एक
पत्निकडुन त्यां पुत्र न प्राप्ती !

निपुत्रिकेचे अखेर पतिला
विनवुन आग्रह अखेर केला
वंश वाढण्या, पुत्र व्हावया
विवाह दुसरा करून घ्यावा !

'घृष्णा' नामक अन्य स्त्रियेशी
पतिव्रता ती गृहिणी शांत
विवाह त्याने नंतर केला
भांडण तंटा नसे कुणाशी !

महान होती ती शिवभक्त
पूजन त्याचें होतां नित्य
रोज शिवाचे लिंग घडवुनी
करी विसर्जन इलगंगेत !

तिजवर होउन कृपा शिवाची
पहिली पत्नी, सवत तिच्या पण
पुत्र तियेला सुरेख झाला
मनात मत्सर उसळुन आला !

घृष्णेच्या त्या सान मुलाला
शव ते त्याचे इलगंगेत
करुन बळें सवतीने ठार
फेकी संतापें अनिवार !

घृष्णेच्या पण शिव-भक्तीने
प्रसन्न शंकर तिजवर होउन
पुत्र तिचा तिज परत मिळाला
'इच्छा तव ती काय' म्हणाला!

घृष्णा तेव्हां हात जोडुनी
'श्रीशिव अपुलीं कायम वसती
नमस्कारुनी करी विनंती –
याच ठिकाणी द्यावी करुनी !'

तिची प्रार्थना ऐकुन सुंदर
तेव्हांपासुन इथे निरंतर
प्रसन्न तिजवर हो शिवशंकर
घृष्णेचा तो श्रीघृष्णेश्वर !



## इच्छा मरण

(जाति–कोकिळा)

इच्छा मरण झकास
जगीं या इच्छा मरण झकास
हे जरठांनो ! हे रुग्णांनो ! करिता खंत कशास ?

हिमालयाच्या रम्य ठिकाणी
प्रयाग क्षेत्री, संगम स्थानी
रमुन तपस्वी केले त्यांनी गंगार्पण शरिरांस !

चिरकालिन ते करुन उपोषण
योगींचे हो आत्म-समर्पण
क्षुल्लक भौतिक देहाची त्यां नव्हती ममता खास !

धन्य भट्ट त्या कुमारिलाने
भव्य तुषाग्नीच्या दहनाने
देह विसर्जित केला अपुला, भिऊन ना मरणास !

आळंदीच्या पवित्र क्षेत्री
खोदुनि भूमी खोल, भुयारी
श्री ज्ञानेश्वर घेति समाधी जडून विठ्ठल–ध्यास !

देशासाठी ज्या वीरांनी
सर्वस्वाचा त्याग करूनी
झाले रणक्षेत्रात हुतात्मे त्यांची सर न कुणांस !

रणांगणी यवनाशी लढुनी
जाता रजपुत वीर मरूनी
त्यांच्या रमणी करति जिवाचा जोहाराने न्यास !

इतिहासाच्या कालामध्ये
लढाईत जे मेले योद्धे
त्यांसह गेल्या प्रिया सती कुणि, धरून हट्टाहास !
हिंदुस्थानी इंग्रज आले
रीत सतीची हटवुन गेले
हाय ! परंतू जनता वेडी जाई अन्य थरास !
मनस्ताप अति होता कोणी
वीष प्राशुनी मरती प्राणी
जाळुन घेती, किंवा मरती, गळयास लावुन फांस !
अति निद्रेच्या गोळया खाउन
छातित किंवा पिस्तुल झाडुन
पुलावरुन वा उडी मारुनी मुकतो कुणि प्राणास !
आगिनगाडी धांवत येता
तिच्यापुढे कुणि झेंप टाकता
उडुन चिंधडया तनुच्या जाई मरुन क्षणी हमखास !
हत्या असली करणे म्हणजे
आत्मघात तो हटकुन गाजे
मृत्यु घृणास्पद करी तयाच्या मोक्ष कुठुन आत्म्यास ?
युद्ध-क्षेत्री, तीर्थ–क्षेत्री
मुदे मिठी जो मरणा मारी
ईश्वर देतो ब्रह्मस्वरुपता दिव्य अशा मनुजांस !

# अंबा आणि अंबिका

(जाति–चंद्रकांत)

राजकन्यका दोन कुणी त्या सुंदर दिसण्यात
भीष्म पितामह जिकुन त्यांना धरुन आणतात !
एक ' अंबिका ' दुसरी ' अंबा ' नांवे ती त्यांची
राजा मोठा ' विचित्रवीर्य ' जो त्यास अर्पण्यासी !
राजाला त्या स्पष्टपणाने गेल्या बोलून–
' अन्य नृपांवर जडले अमुचे मन कधिपासून ! '
प्रश्न पडे मग राजाला कीं विवाह त्यांच्याशी
कशास आपण करून घ्यावा फशी पडायासी ?
अन्य नृपांवर मन जर त्यांचे पूर्वी जडलेले
कसे वरावे आपण त्यांना कोडे त्यां पडले !
' जिकुन गेलेल्या कन्यांचा प्रेमी नृप आतां
करतिल कां स्वीकार '? असाही प्रश्न पडे भलता !
राजकन्यका पति न लाभतां अखेर त्यां कोणी
हाय खाउनी, झुरून गेल्या, सुकुन कळ्या दोन्ही !

## सरस्वती आणि बनास

(जाति–चंद्रकांत)

'सरस्वती' अन् 'बनास' नामक सरिता या दोन्ही
भव्य अबूच्या पहाडामधुनी जाती वाहोनी !
गुर्जर आणि राजपुताना यांच्या प्रांतात
महत्व आहे या सरितांना म्हणून त्या ख्यात !
नशिबीं नाही या सरितांच्या सिंधु लाभण्यात
कच्छ रणातच लुप्त होउनी श्वास सोडतात !
कौमार्याची, सौभाग्याची, वा वैधव्याची
यांपैकी ना दशा तयांच्या दैवीं कायमची !

पदभ्रष्ट हो गुजरातेतुन नृपाळ जो 'करण'
नदी किनारी करी इथे कां अखेरचे भ्रमण ?
दोन असूं खेरीज तयाच्या नद्यांस या दोन्ही
अन्य काय तो मानव प्राणी देइल अर्पोनी ?

('करण वाघेला' हा गुजरातेतील एक पदच्युत राजा एके काळी या नद्यांच्या कांठी अज्ञातवासात दिवस कंठीत होता.)

# जीवन क्षणभंगूर

(जाति–कोकिळा)

जीवन क्षणभंगूर
जहाले जीवन क्षणभंगूर
प्रवास आता करणे म्हणजे घोर मनीं हुरहूर !

जिकडे तिकडे रस्त्यावरती
रहदारीची उसळे गर्दी
फूटपाथही फुलून दिसती
सायकल्, स्कूटर, बस्, मोटारी धांवत जाती दूर !

जपून कोणी पथी चालला
धडक तया दे सायकल्वाला
होइ दुखापत जरी तयाला
सोसायाच्या सर्व वेदना ना करता कुरकूर !

बसेस् आणिक स्कूटर यांची
मालमोटारी, मोटारींची
टक्कर घडता कधि जोराची
अपघातानें गाड्यांचा मग होतो चक्काचूर !

त्या अपघातीं कोणी मरती
कितीक जखमी दुर्बळ बनती
पुढे कसेंतरि जीवन जगती
दुर्घटनेचा दारुण घाला खरोखरी निष्ठूर !

सिंधूमार्गे गांवी जाता
वादळवारा तुफान सुटता
उसळुन लाटा बोटित शिरता
हाय ! मुशाफिर बुडून जाती तिच्यासवें भरपूर !
आगिनगाडित प्रवासताना
बसुन विमानीं विहारताना
घात कधी ते घडती नाना
संहाराचें चित्र तेधवा दिसून ये भेसूर !
प्रवास केव्हा होइल दुष्कर
कल्पना न ये कुणा अगोदर
दैवीं तैसे घडे खरोखर
काळ करी हा खेळ सदोदित माजवीत काहूर !

# अतूट त्याची माझी जोडी

(लावणी)

गेले पति भीमथडी
भरलि मला हूडहुडी !
मोरपंखी पानपुडे
पिकल्या पानाचे गे विडे
सांग कुणा देऊ गडे
भरलि मला हूडहुडी !
महाल माझा उघडा पडे
आंतड्याला पीळ पडे
रडून माझी भिजली साडी
भरलि मला हूडहुडी !
जलावेगळी मच्छी पडे
मीच तैशी तडफडे
आटले पुण्याईचे घडे
भरलि मला हूडहुडी !
तुटुनि धागा वावडी उडे
गोते खात धडपडे
तिच्याहि वर माझी कडी
भरलि मला हूडहुडी !
कैशी दिली काळ दडी
कां हो मनीं धरली अढी
ढळलि धीराची ग गुढी
भरलि मला हूडहुडी !
डोळे लागुन वाटेकडे
पापणी कां फडफडे
ऊर माझा धडधडी
भरलि मला हूडहुडी !
सोळा शिणगाराचे चुडे
पिचुनि त्यांसी पडति तडे
दैवाची ग बिघडे घडी
भरलि मला हूडहुडी !
गगनीं मेघ गडगडे
तुटून बिजली कडकडे
लागे शिळंधार झडी
भरलि मला हूडहुडी !
सलते विरहाची सडी
काया कवळी लवते छडी
वाट बघत आहे खडी
भरलि मला हूडहुडी !
झुरुनि कुडी झाली काडी
विटलि विषयाची गोडी
सखयासाठी बनले वेडी
भरलि मला हूडहुडी !

लोपे आशेची घडाडी        घडकी भरे घडोघडी
आला जीव रडकुंडी        भरलि मला हूडहुडी !
घेइन कड्यावरुनी उडी        देइन नदीमाजीं बुडी
खाऊं विषाची कां पुडी        भरलि मला हूडहुडी !
रणमर्द माझा गडी        पायी त्याचें घेइन अढी
अतूट त्याची माझी जोडी        भरलि मला हूडहुडी !

(माझे वडील बंधु कै. शंकर शामराव काळे (ऊर्फ कवि चंद्रचूड) ' अस्तादेय ' या खंड काव्याचे लेखक, यांच्या कागदपत्रात अपूर्णावस्थेत सांपडलेली ही ' लावणी ' मी पूर्ण करून प्रसिद्ध करीत आहे.)

# सीता हरण

(जाति–माळीण, पादाकुलक)

हृदय येत भरुनी
किती हे हृदय येत भरुनी
अजून सीता-हरणाची ती करुण कथा स्मरुनी !

सीता, लक्ष्मण रामासोबत
पंचवटीला वनीं निवासत
घटना घडली तेव्हां दुःखद
लंकाधीपति रावण येई दुष्ट बेत करुनी !

मारिचास मृगरूप देउनी
याचक आपण गेला बनुनी
कांचन–मृग अनुरूप देखुनी
वदली सीता 'रामा मृग तो द्या मजला धरुनी !'

मृग–मागोवा घेता घेता
राम अखेरी थकून जाता
बाण तयावर सोडुन देता
'धाव लक्ष्मणा !' मृग मायावी गर्जे गहिंवरुनी !

रामासम तो ध्वनी नेमका
सीतेच्या दे जिवास धसका
लक्ष्मण धांवे झणी तदां कां–?
साधुन संधी, रावण नेई सीतेला हरुनी !

# हिरा हरपला

(जाति–वसंत–गज्जल–सुनीत)

महाराष्ट्रीय हा गेला कवी स्वर्लोक–दर्बारा
हिरा वागीश्वरीचा कीं ध्रुवाचा जाहला तारा !
कधीं तत्काव्य-गंगेची न हाटे 'पाणपोई' ती
तृषार्थी काव्य–भक्तांची तिनें केली पुरी तृप्ती !
यशश्री लाभली त्याला मिळोनी मान ते सर्व
खऱ्या त्या जातिवंताला मुळी ना स्पर्शला गर्व !
कवीची कैक तीं गीतें क्षणीं सर्वोन्मुखी झाली
स्वयें तो गाउनी देतां प्रजा मोहूनिया घाली !
अकाली सोडुनी जाई जयांना माउली माई
कवीचे काव्य तें 'आई' स्मृती त्यांना तिची देई !
हिरा हा हर्पुनी गेला स्वतेजाने चकाकोनी
जगू ना देव दे कांही गुणी प्राणी जरी कोणी !
जगीं जन्मास जो येई तयाला मृत्यु कां अंती ?
मृताच्या मुक्त आत्म्याला प्रभो दे सर्वथा शांती !

(महाराष्ट्र कवि श्री. यशवंत यांना वाहिलेली
भावपूर्ण आदरांजली)

# अमृत धारा

## वर्षांव तिसरा

### वैशिष्ठ्यपूर्ण अजब कविता

# एका कवीचा खुळा धंदा




## (एक पथ-काव्य)

(वृत्त—शार्दुलविक्रीडित)

हाताने अपुल्या अनंत कविता वेडा कवी खर्डुनी
त्याचे कागद विस्तरून बसला चौकात रस्त्यावरी
टाहो फोडित गर्जना सतत तो सिंहाप्रमाणे करी—
'माझ्या या कविता, अहो विकत घ्या, द्या मोल काही कुणी!'
पोरांची कवि—भोंवती जमुनिया गर्दी तदा लोटली
न्यारा काय प्रकार हा ? म्हणुन त्यां आतूरता वाढली !
कोणी कागद विस्कटून कविचे मागेपुढे पाहती
त्याचे अक्षर ते गचाळ बघतां, तात्काळ भिर्कावती !

मौजेनें विनवी कुणी ' कवि तुम्ही घ्या आपुले नांव ते '
तेव्हा मुर्कुन स्त्रीसमान मग तो गालीं हसूनी वदे –
' मित्रांनो मम नांव ते मज तुम्ही घ्यायास सांगू नका
त्याच्याबद्दल गीत दिव्य म्हणतो, थांबा जरा आयका ! '
' गा गा गा कविराज, बेछुट नवे ते प्रेम-गाणे खरे '
पोरें आर्जवता, कवी, गुणगुणे गाणे स्वयें जे स्फुरे !
' राधे ! सांग तुझा कुणी ग बुचडा हा सैल केला बरे ? '
' आम्ही नाहि कवी,' भकून सगळी पोरें पळाली त्वरें !
तेंव्हां हाय ! तिथे चुकून कविचा वस्तादजी ठाकला
त्याच्या ताठ मिशा बघून कवि तो अत्यंत थर्कापला
गर्जे त्यास गुरू – ' अरे चल भल्या, गुंडाळ हे कागद
घे हे दान छुपे,' कवी मग उठे, धंदा खुळा सोडत !

( ' गाऊ दावुनि आमुच्याच कविता आम्हीच रस्त्यामधे ! ' )

– झेंडूची फुलें

## तीन घोडयांची शर्यत

(जाति–पादाकुलक)

अय घोडयांची सुटली शर्यत
ग्रामिण पहिला, दुजा कोंकणी
दोन जुने ते खास मुरब्बी
दलित धांवला तिसरा गर्जत !

किती वेळ तो होउन गेला
मधेच माशी कशी शिकली ?
शर्यत घोडयांची अडखळली
निकाल त्यांचा अडून पडला !

निकाल लागे तोंपर्यंत
खात बैसले घोडे पेंड !

• ० ०

निकाल अंती स्फोटक घडला
अश्व उपेक्षित विजयी ठरला !
बाकी दुसरा पण खिकळला –
'हुटे औषधाविना खोकला !'

० ० •

ग्रामिण टेंभा मिरवित बसला
चौखुर उधळुनी, जरी गचकला !

काही कालानंतर पहिले दोन नामांकित घोडे 'इहलोकींच्या तबेल्यातून' एकाएकीं अदृश्य झाले आहेत ! कुठे गेले तें सांगता येत नाही. पण पुन्हा ते दिसणार नाहीत एवढं मात्र खरं. हाय रें दुर्दैवा !!

## खल्वाटो निर्धनं क्वचित्

(जाति–पादाकुलक)

साहित्यिक कुणि टक्कलवाला
अन्य देश तो बघण्या गेला
टक्कल त्याचे पण पडलेले
फिरावया त्या आणी लज्जा !

टक्कल अपुले झाकायाला
डोक्यावर तो ' हॅट ' चढवितो
कधी कधी तर टोप घालुनी
नटाप्रमाणे स्वैर हिंडतो !

विचार करतांना पण केव्हां
तस्कर डोक्यावरून फिरतो
दर्पणात अन् त्याने बघतां
फरक तयाला भलता दिसतो !

टक्कल गोटयाचा तो व्यास
इंचाइंचावरून वाढे
कारण त्याला कळे न काही
प्रगती कैशी अपूर्व होई ?

हिंडुन तेथे बाजारात
हवे हवे त्यां सर्व लाभते
हाय ! परंतू मिळे न कोठे
शुद्ध खरे खोबरेल तेल !

गत डोक्याची विद्रुप सारी
दैव तयाची करून देई
मनामधे जळफळून जातो
अखेर त्रागा करून वदतो – !

' पूर्णपणे तो मम डोक्याचा
होउन जावो सपाट गोटा
हजामतीचा त्रास चुकेल
वाचुन जाइल खर्च तेवढा ' !

' खल्वाटो नच निर्धन सहसा '
या तत्वातिल गूढ उकलता
बरळे वेडा ' श्रम नच करतां
रंकाचा मी बनेन राव !'

## मेलेला जिंदा झाला !

(जाति–उद्धव)

हा प्रसंग अद्‌भुत घडला मेलेला जिंदा झाला !
खेड्यात दूर त्या कोठे कुणि एक भुकेला प्राणी
कष्टतो अती बेमाने रक्ताचे करुनी पाणी
खळगी न भरे पोटाची स्थिति ऐशी केविलवाणी

मायेचे कोणी नुरले
मित्र ना तया आढळले
एकाकी जीवन कुजले

आयुष्य म्हणूनी जगला मेलेला जिंदा झाला !

नच कुठे निवारा त्याला तो राही अडवळणीला
झोपण्यास भूमी उघडी गगन–वस्त्र पांघरण्याला
जवळपास ओढा वाहे वस्त्र, अंग रोज धुण्याला

तो चुकुन पडे आजारी
बेशुद्ध जहाला भारी
कुणि वैदू घेत भरारी–

बघुनी त्यां, ‘ मेला ’ वदला मेलेला जिंदा झाला !

खेड्यात लगोलग तेंव्हा वाऱ्यासम पसरे वार्ता
कुणि खेडुत जमुनी नेती ओढ्याच्या कांठी मयता
सरणावर ठेवुनि देती मृत देह जाळण्या करिता

लाविता चितेला अग्नी
ज्वाला त्या भिडती गगनीं
रखरखित निखाऱ्यामधुनी–

उडि मारुन मृत वर आला मेलेला जिंदा झाला !

# नव कवीचा लिंग-भेद

(जाति–पादाकुलक)

‘ ना धिन् धिन्ना, ना धिन् धिन्ना
ना तिन् तिन्ना, ना तिन् तिन्ना ’
तबल्याचे हे बोल बडविता
नव कवि तालात् रचतो कविता !

बालांसाठी ‘ कविता-वाचन ’
कार्यक्रम हो, त्या नव कविचा
प्रथम ग्रासे बाळ कुणी पण –
‘ नांव ’ कवीला ‘ घ्या हो ’ वदला !

नव कवि तेव्हां मनीं शरमला
धाडस करुनी अखेर वदला –
‘ कुंदा मेंदर्गीकर ’ सुंदर
नांव असे मम प्रिय बाळांनो ! ’

प्रेक्षक पोरें गर्जुन उठली –
‘ नांव झूट कां केले धारण ?
‘ कुंदा ’ स्त्रीचे नांव असून
पुरुष तुम्ही हो स्त्री कां बनला ?’

नव कवि झाला पुरता सर्द
हात कपाळा लावुन बोले –
‘ नांव खरे मम असे ‘ मुकुंदा ’
करा न त्याचा चेंदामेंदा ! ’

गाजे ‘ गोदीचा गोविंदा ’
उलट ‘ मुकुंदा ’ बनला ‘ कुंदा ’ !
मुलें गर्जली – ‘ उठा पळा रे
लिंग-भेद कवि करून मिरवी ! ’

# भीम शूर तो दुर्बळ बनला !

( कांही प्रतिष्ठित व्यक्तींच्या हातून कधी कधी कळत न कळत लहान मोठया चुका घडत असतात. तेव्हां त्या उघडकीस आणतांना ' प्रहारिकांचा ' जन्म झाल्यास आश्चर्य मानण्याचे कारण तें काय ?

(जाति–पादाकुलक)

## (प्रहारिका–नवा प्रकार)

वाद, वादळांचा तो अंक
एक विषय जरि ना वादाचा
कुणी नाटकी लिहिता लेख
संपादक निर्धास्त छापतो !
असभ्य टीकेचा तो लेख
रसिक वाचतां चिडून गेले
देतां संपादकास टोला
भीम शूर तो दुर्बळ बनला !

( पहा :– म. सा. पत्रिका ' वाङ्मयीन वाद व वादळें विशेषांक जुलै, ऑगस्ट, सप्टें. १९८४ अंक २३०. लेख– ' भटाला दिली ओसरी' (नाटकाने उठवलेले वादळ) लेखक– मो. ग. रांगणेकर पृष्ठ ५५ आणि– म. सा. पत्रिका अंक ऑक्टो, नोव्हें, डिसेंबर १९८४ अंक २३१ मधील पत्र-व्यवहार. पत्र श्री. वि. त्र्यं. शेटे व संपादकाची दिलगिरी– पृष्ठ २५)

# भीम–पराक्रम निष्प्रभ ठरतो !

(जाति–पादाकुलक)

## (प्रहारिका–नवा प्रकार)

नागपूर त्या शहरामधले
संशोधक नांवाजुन गेले
वार्धक्यावें निधन पावले
सारे जन तेव्हां हळहळले !

नांव तयांचे 'वा. वि. मिराशी'
संपादक पण फर्डा भीम –
'वि. वा. मिराशी' असे छापतो
भीम–पराक्रम निष्प्रभ ठरतो !

( पहा :– म. सा. पत्रिका 'राम गणेश गडकरी' संस्मरण अंक. २३२–३३ जाने. ते जून ८५ संपादकीय 'दुखवटा' पृष्ठ ४)

## हौशी नट दोघे कोणी

(जाति–उद्धव)

हा प्रसंग दारुण घडला ती गेली पण तो जगला !

हौशी नट दोघे कोणी तो कुमार तीहि कुमारी
नाटचांत काम करण्याची उभयतांस आवड भारी
व्हावया सभासद गेले संस्था जी नामी शहरीं
ओळख निज देउन पुरती
झाले ते तेथे भरती
कामास यथास्थित ठरती
जम सत्वर त्यांचा बसला ती गेली पण तो जगला !

नाटकांत कामें त्यांना प्रमुख खास लाभुन गेली
दोघांनी ओतुन जीव अभिनयात क्रांती केली
नट कुमार नायक बनला नायिका नटी नव सजली
दोघांची जमली जोडी
नाटचांत गमे त्यां गोडी
संस्था बहु पैका ओढी
प्रेक्षक-गण अवघा भुलला ती गेली पण तो जगला !

नाटकें दणाणुन झडतां घटना पण नाजुक घडली
जुळुनिया मनें दोघांची पाशात प्रीतिच्या पडली
भिन्न जात अपुली त्यांना लग्नास्तव पुरती नडली
माय-तात दोघांचे ते
प्रतिकूल तयांना भलते
मान्यता न झाले देते
शुभ–विवाह त्यांचा हटला ती गेली पण तो जगला !

प्रेमात जखडतां दोघे ते अखेर बनले वेडे
लग्नाविण जगणें त्यांना हाय ! हाय ! पडलें कोडे
बेपत्ता होउन गेले संस्थेचें अडले गाडे
विश्राम–गृहीं ते रमले
आश्रयास चोरुन दडले
विष रात्रीं पिउनी निजले
नच देतां समज कुणाला ती गेली पण तो जगला !

रात्र ती अघोरी सरली दिन दुसरा ये उदयाला
प्रेमी पण नाही उठले माथ्यावर रवि तांबुसला
विश्राम–धनी घे शंका बघण्यास तयांना धजला
खोलीवर त्यांच्या जाई
बंद दार दिसुनी येई
ठोठविता दाद न कांही
धसका मनि त्याच्या बसला ती गेली पण तो जगला !

दूरध्वनि करिता त्यानें पोलीस स्थळी त्या जमले
खोलीचे फोडुनि दार दृश्य आत भेसुर दिसले
बेशुद्ध दशा दोघांची मधु मिठीत ते निजलेले
रुग्णालयि त्यांना नेता
हो तपास त्यांचा पुरता
नटि सोडुन जाई जगता
नट जिता विरागी उरला ती गेली पण तो जगला !

# नाट्य सृष्टीतील शोकान्त घटना

(जाति–चंद्रकला)

प्रसिद्ध नट कोणी देखणा गान पटाईत
गाजुन गेलेल्या कंपनीमधे नोकरीत !
प्रमुख नायकाचे मिळे त्या काम नाटकात
गाण्यावर त्याच्या भाळती रसिक अतोनात !

महोत्सवीं कोठे तयाला आमंत्रण येई
मैफल गाण्याची भली तो रंगवून देई !
स्वतंत्र जलशात तयाला मिळकत हो भलती
नाट्य कंपनीची नकोशी सेवा हो पुढती !

स्वतंत्र जगण्यात तयाला दिसून ये 'राम'
कंपनीस त्याने ठोकला त्वरें 'राम राम !'
नित्य नव्या शहरीं गाजवी जलसे गाण्याचे
दरदी जन करती भयंकर कौतुक गवयाचे !

साठवीत गेला बहुत तो पैका निज पदरी
दैवें पण त्याच्या गायिका कोणी ये नजरी !
गोड गळा लाभे दिसाया रूपवती रमणी
श्रवून गान तिचे तयाच्या भरली ती नयनीं !

संपादन केला तयाने गोड तिचा स्नेह
मनीं न तिज येई तयाचा कसला संदेह !
गवय्यास पण कां वासना चुकुन पुन्हा व्हावी
नाट्य कंपनी ती स्वतःची काढुन नव द्यावी !

घामाचा पैसा स्वतःच्या कंपनीत घाली
कलावंत मिळता कंपनी नवी उभी केली !

गायिकेस घेई तियेचे मन तो वळवून
मुख्य नटी करुनी भले दे वेतन ठरवून !

जुनी नवी नाट्यें ज्यामध्ये शास्त्रिय संगीत
करून धनप्राप्ती राहिला सदा गाजवीत !

पैका बहु मिळता नको त्यां जडली दुर्व्यसनें
मदिरेचें प्याले भयंकर प्राशी मुक्तपणें !

नटीस गाणाऱ्या ओढिले खुषीत प्रेमात
भुलून त्यावर ती रंगली ऐन यौवनात !

नाट्य कंपनी ती खरोखर नांवाजुन चाले
नटी, नायकाचे वाढले धुंदित पण चाळे !

मालक नट दैवें अचानक रुग्णाइत बनला
व्यसनांनी त्याचा देह कां नकळत पोखरला !

हृदय–विकाराने अकल्पित मृत्यु तया आला
नाट्य कंपनीचा लगोलग अंत पुरा झाला !

नटी गायिका ती दिवाणी प्रिया गायकाची
विटुन जीवनाला कृती कां करी धाडसाची ?

जहर प्राशुनीया अरेरे ! करी प्राणघात
नाटक सृष्टीत घडे ही घटना शोकान्त !

## प्रयोग पहिला हो शेवटला !

(जाति—पादाकुलक)

नवखा कोणी नाटककार
अळेंबळें त्यां स्फुरले नाटक
नव कविची अन् पदें, तया दे
भिकार चाली, भुरटा गायक !

गायनवर्गामधील एका
पास 'विशारद' कुठें न झाली
जिच्या विवाहा वर्ष लोटले
गाणारी तिज नटी बनविली !

कसाबसा हो प्रयोग पहिला
दुसरा व्हाया गाडे अडले
गर्भवती नव नटी राहिली
नऊ मास तिज लोटुन गेले !

हौशी संस्थेचे ते नाटक
प्रेक्षक फुकटे, प्राप्ती थोडी
प्रयोग पहिला हो शेवटला
खर्चाने जो पुरा गाडला !

# दैवी चमत्कार

(जाति–भूपती वैभव)

उद्योग करूनी श्वशुर कुणी गुणवंत
तो बनून जाई नशिबाने धनवंत
एकटीच शिक्षित कन्या त्यास सुशील
जमवून प्रेम, तिज लाभे तरुण वकील !

तो वकील नवखा दिसावयाला छकडा
पण कर्तृत्वाने निघे न कांही फरडा
जम बसे न त्याचा कोठे धंद्यामाजी
नोकरी पत्करी अखेर मास्तरकीची !

संसार चालवी कसाबसा कष्टात
प्रिय पत्नी त्याची शिकलेली जरि ख्यात
नोकरी मिळेना तिजला कसली कोठे
ही कन्या त्यांतुन, संकट आले मोठे !

नच दाद सासरा देई जामात्याला
तो विरुद्ध त्यांच्या प्रीतीच्या लग्नाला
कंजूष तयाचा स्वभाव नाही हटला
तो दुरून त्यांचे हाल बघूनी जगला !

पण एकाएकीं चमत्कार कीं घडला
सासऱ्यास मृत्यू हृदय–विकारें आला
उद्योग तयाचा जामातयास मिळाला
श्रीमंत जावई लगेंच दैवें बनला !



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६८
दा. क्र. २५७७०
-१३९-
मूल्य २११७११८६
ग्रंथ

## कवी शिकंदर कीं बिलंदर ?

(जाति–पादाकुलक)

जन्मतःच तो कवी शिकंदर
प्रयत्नवादी बने धुरंधर !

काव्य कलेस्तव जीवन अपुले
तन, मन, धन सर्वस्व वाहिले
कुशल कार्य ते स्वयें फुलविले
करी तपी तप तीव्र निरंतर !

कविता करण्याविना न छंद
पुरा बने तो वेडा धुंद
देई रसिकां पूर्णानन्द
जातिवंत तो खरा कलंदर !

घोर संकटें अनंत आली
डरे न अगदी दुर्धर काली
ज्वलंत प्रतिभा वैभवशाली
निर्मुनि देई काव्य–समींदर !

सर्व तऱ्हेच्या विचित्र कविता
सोज्वल उपहासें बहु लिहिता
विनोद हसरा ध्यात खुलविता
कवी अकिंचन ! कीं धनवत्तर ?

दीन कवी किति गल्लोगल्ली
कवी शिकंदर महान वल्ली
मजेत उडवुन देई खिल्ली
बलवत्तर कीं ठरे बिलंदर ?

( या कवितेतील ' शिकंदर कवी, ' ' तो मी नव्हेच ' !

## आत्मनिवेदन

जुलै १९८४ मध्ये महाकवि कुलगुरु कालिदास यांच्या 'कुमार संभव या संस्कृत महाकाव्याचा मी सचित्र मराठी काव्यात्मक रसास्वाद 'सुबोध कुमार संभव '(सर्ग १ ते ८ व सर्ग ९ ते १७ दोन्ही भाग एकत्र) हा काव्य-ग्रंथ छंदोबद्ध रचनेत रसिकांना सादर केला. महाकवि कुलगुरु कालिदास यांच्या 'कुमार संभवा' वरून सदर रचना मी केली असली तरी तो अनुवाद नाही व भाषांतरही नाही. गेय रचनेला अनुकूल होतील अशा सोयीने त्या कथेचे स्वयंपूर्ण निरनिराळे भाग पाडून, विविध जातींची आणि छंदांची त्यांत मी योजना केली आहे. माझ्या या 'सुबोध कुमार संभव' या महाकाव्याचे काव्य-रसिकांनी उत्स्फूर्तपणे स्वागत केले हे कळविण्यास मला आनंद वाटत आहे. विशेषत: महामहोपाध्याय कै. श्री. वा. वि. मिराशी यांनी त्यांच्या हयातीत मला पत्र पाठवून माझे अभिनंदन केले. तसेच कविवर्य 'कुसुमाग्रज,' विनोदी लेखक श्री. पु. ल. देशपांडे इ. नामवंत साहित्यिक मडळींनी आपापले उत्तम अभिप्राय मला कळवून माझे कौतुक केले. नुकतेच दिवंगत झालेले माझे गुरुवर्य कै. प्रा. अरविंद मंगरूळकर यांनी तर माझ्या या महाकाव्याचे काव्यपरीक्षण वेळेवर करून दिले व ते मी स्वतंत्रपणे छापून प्रकाशन समारंभाचे वेळी सर्व रसिक प्रेक्षकांस वाटून सादर केले. तसेच परगांवीही अनेक पुस्तक विक्रेत्यांना ते पोस्टाने धाडल्या-मुळे माझे हे महाकाव्य अनेक रसिकांना वाचण्यासाठी उत्सुकता निर्माण झाली. प्रा. अरविंद मंगरूळकर यांचे तें काव्यपरीक्षण या संग्रहात पुन्हा शेवटी मुद्दाम छापले आहे.

वयाच्या चौदाव्या वर्षापासून मी काव्यलेखन अव्याहत करीत आलो आहे. 'अस्तोदय' या गाजलेल्या खंडकाव्याचे लेखक माझे वडील बंधु कै. शंकर शामराव काळे ऊर्फ कवि 'चंद्रचूड' यांच्याकडून मला काव्य-लेखनाचा वारसा लाभलेला आहे. आज वयाच्या ७८ व्या वर्षी (जन्म ७-७-१९०९) माझा हा नवीन सचित्र व छंदोबद्ध पंधरावा काव्यसंग्रह

'अमृतधारा' या नांवाने मी प्रसिद्ध करीत आहे. काव्यलेखन हा माझा धंदा नाही. प्रतिभेचा स्पर्श झालेला तो स्वधर्म असून आयुष्यभर चाललेला श्वासोश्वास आहे. त्यामुळे मला आत्मसमाधान पूर्णपणें लाभले असून त्यांतून काव्यप्रेमी रसिक जनांना आनंद देण्याचा माझा प्रामाणिक हेतू आहे. काव्य हेच माझे जीवन बनून गेले व '**ONCE A POET ALWAYS A POET**' अशी माझी अवस्था होऊन राहिली आहे. थोडक्यात कवितेवर मी अपरंपार भक्ती केली आहे.

१९३५ साली इंदूरच्या साहित्य संमेलन प्रसंगी माझा 'आकाशगंगा हा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर आज पन्नास वर्षांनी 'अमृत धारा' हा माझा पंधरावा सचित्र नवीन काव्यसंग्रह माझ्या काळे ब्रदर्स पब्लिकेशनतर्फे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

माझ्या बहुतेक कवितासंग्रहांच्या प्रथमावृत्त्या संपून गेल्या आहेत. शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे–१ यांनी माझ्या अनेक काव्यांची पुस्तकें शाळा, कॉलेज, ग्रंथालयें यांनी विकत घेण्यासाठी शिफारस केली आहे. पुण्याच्या कॉन्टिनेण्टल प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेल्या 'धुवाँधार' व 'रसराज जगन्नाथ' या माझ्या दोन काव्यग्रंथांना महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेकडून त्यांच्या शक्तिनुसार मला रोख बक्षिसे मिळाली आहेत.

'अमृत धारा' या माझ्या प्रस्तुतच्या काव्य संग्रहात श्री माणिक प्रभु महाराज' यांच्या जीवन चरित्रावर एक प्रदीर्घ काव्य अंतर्भूत केले आहे. प्रथम हे काव्य 'पिसारा' मासिकाच्या खास 'श्री माणिक प्रभु महाराज' या मे १९८५ च्या अंकात प्रसिद्ध झाले. दि. २५-४-८५ रोजी माणिक नगर येथे सांप्रतचे 'सिद्धार्थ माणिक प्रभु महाराज' यांच्या महालात मी त्या काव्याचे समग्र वाचन केले व दुसऱ्या दिवशी म्हणजे २६-४-८५ रोजी 'पिसारा' मासिकाचा हा अंक, संस्थान माणिकनगर येथे मोठया समारंभाने कोल्हापूरचे सहकार महर्षी श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या शुभहस्ते प्रसिद्ध

करण्यात आला. तेव्हां त्या प्रसंगी सांप्रतचे सिद्धार्थ माणिक प्रभु महाराजांनी मला रोख शंभर रुपये व जरीचे उपरणे देऊन माझा व तसाच 'पिमारा' मासिकाचे संपादक माझे मित्र श्री. वा. दा. थत्ते यांनाही शाल व श्रीफल देऊन मोठा सन्मान केला. माणिकनगर या संस्थानने माझे हे काव्य सवडी-नुसार स्वतंत्ररीत्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे.

(महाराष्ट्र कवि श्री. यशवन्त यांच्या 'पाणपोई' या सर्वोत्कृष्ट काव्य-संग्रहाप्रमाणे माझे 'निवडक बाबुलनाथ' (एक गंभीर व दुसरा विनोदी आणि उपहासात्मक) असे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध व्हावेत अशा सूचना माझ्या अनेक रसिक मित्रांनी मला वरचेवर केल्या आहेत. माझ्या निवडक उत्कृष्ट कवितांची निवड मला स्वतःला करतां येणार नाही याची मला जाणीव आहे.) 'माझ्या या दोन निवडक काव्यसंग्रहासाठी कवितांची निवड माझे परममित्र विज्ञाननिष्ठ व विनोदी साहित्यिक प्रा. वि. मा. दी. पटवर्धन यांनी करून द्यावी व त्यांनीच या दोन काव्य संग्रहावर प्रस्ताव-नाही लिहून द्यावी' असे मी त्यांना ते माझ्या 'गीतवर्षा' या काव्य संग्रहाच्या प्रकाशन समारंभ प्रसंगी अध्यक्ष म्हणून पुण्यात १९७८ साली आले असतांना माझी ही इच्छा मी त्यांना खाजगी रीतीने समक्ष बोलून दाखवली होती. तेव्हा ते म्हणाले 'तुमचे हे कार्य मी आनंदाने करून देईन. आतापर्यंत तुमची प्रसिद्ध झालेली काव्याचीं सर्व पुस्तकें माझ्या संग्रहीं आहेत आणि यापुढेही प्रसिद्ध होणारी तुमची पुस्तकें मला वरचेंवर धाडून देऊन तुम्ही नाशिकला सात दिवस सवड काढून माझ्याकडे या व केव्हा येऊ शकाल ते मला पत्राने अगोदर कळवा म्हणजे त्यादृष्टीने मी प्रयत्नशील राहीन. परंतू मे१९८१मध्ये ते अचानक आजारी पडून त्यांचे दुःखद निधन झाल्याचे वृत्त वर्तमानपत्रात वाचावयास मिळतांच मला अत्यंत दुःख होऊन राहिले व त्यामुळे माझे दोन निवडक कवितासंग्रह काढण्याचे काम मी लांबणीवर टाकले आहे. १९३५ साली माझ्या 'आकाशगंगा' या पहिल्या काव्यसंग्रहावर मुंबईच्या 'विविध वृत्त' या साप्ताहिकात त्यांनी सुमारे

दोन पानें उत्कृष्ट परीक्षण लिहून प्रसिद्ध केले. तसेंच नाशिक येथील 'दैनिक गांवकरी,' तारीख ९-९-७९ च्या रविवार पुरवणी अंकात ' विनोदी काव्याचे एक उपासक, ' बावुलनाथ ' यांची स्तिमित करणारी व भारावून टाकणारी ७० वर्षांची वाटचाल ' हा माझ्या, ७० व्या वाढदिवसानिमित्त माझ्या काव्य संपदेचे समीक्षण करणारा मोठा लेख, माझ्या छायाचित्रासह त्यांनी प्रसिद्ध केला. असा हा विज्ञाननिष्ठ व विनोदी साहित्यिक मित्र या जन्मात मला यापुढें लाभणार नाही म्हणून हळहळ वाटून राहिली आहे.

महाराष्ट्र कवि श्री यशवंत यांचे देहावसान वार्धक्याने दि. २६-११-८५ रोजीं झाले. त्यांचा व माझा पन्नास वर्षांचा स्नेह होता. त्यांच्या अध्यक्षतेखाली माझे दोन काव्यसंग्रह ' रसराज जगन्नाथ ' व ' त्रिवेणी ' हे अपूर्व समारंभाने प्रसिद्ध करण्यात आले. मी त्यांचे घरी, वरचेवर त्यांना भेटावयास जात असे व माझ्या नवीन कविता त्यांना ऐकवीत असे व तेही आपल्या नवीन कवितांचे कागद मला वाचावयास देत असत. त्यांचे कडून मला नेहमी मार्गदर्शन व उत्तेजन मिळत होते व मला ' दीर्घायुरारोग्य लाभो व माझेकडून सतत काव्यसेवा घडो ' असा शुभाशीर्वाद मी त्यांचा निरोप घेऊन जातांना ते मला नेहमी देत असत. त्यांच्या निधनाने मी अत्यंत कष्टी होऊन गेलो. ' हिरा हरपला ' ही माझी कविता महाराष्ट्र कवि श्री. यशवंत यांना भावपूर्ण वाहिलेली आदरांजली असून ती ' तरुण भारत ' मध्ये त्यांच्या निधनानंतर लगेंच दुसऱ्या दिवशी प्रसिद्ध झाली. ' अमृत धारा ' या माझ्या नवीन काव्यसंग्रहात ती समाविष्ट केली असून माझा हा काव्यसंग्रह त्यांनाच प्रेमादरानें अर्पण केला आहे. त्यांचे छायाचित्र माझे साहित्यिक मित्र श्री. जीवन किर्लोस्कर यांनी स्वतः काढले असून त्याचा उपयोग मी अर्पण पत्रिकेत करून घेतला आहे.

त्यानंतर गुरुवर्य प्रा. अरविंद मंगरूळकर यांचेबद्दल लिहिल्याशिवाय मला राहवत नाही. १९४५-४६ साली मी पोस्ट ऑफिसात नोकरी करीत

असतांना सकाळी सर परशुरामभाऊ कॉलेजमध्ये शिकावयास जात होतो. प्रा. मंगरूळकर यांचा व माझा तेव्हा परिचय झाला. ते उत्तम तऱ्हेने संस्कृत शिकवीत असत. त्यांच्या शिकविण्यामुळेच मला संस्कृत वाङ्मयातील काव्यें व नाटकें वाचण्याची गोडी निर्माण झाली. त्यांचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आणि वळणदार असे. १९६० साली 'रसराज जगन्नाथ' या माझ्या खंड काव्यावर वेळात वेळ काढून त्यांनी उत्कृष्ट प्रस्तावना लिहून दिली. तसेंच माझ्या 'सुबोध कुमार संभव' या महाकाव्यावर त्यांनी उत्तम काव्य-परीक्षण लिहून दिले हे मी वर सांगितले आहेच. 'अमृत धारा' हा माझा नवीन काव्य संग्रह प्रसिद्ध करण्याचे ठरविल्यानंतर एप्रिल महिन्यांत त्यांनी नेमून दिलेल्या दिवशीं दुपारी ३ वाजतां मी नवीन लिहिलेल्या 'शहाजादा सलीम व अनारकली' हे ऐतिहासिक प्रेम-काव्य त्यांना ऐकविण्यासाठी मुद्दाम त्यांचे घरीं गेलो होतो. हे प्रेम-काव्य शृंगाराने सजविलेले, संघर्षाने वाढलेले, संवादांनी नटविलेले, निरनिराळ्या जाति छंदात रचलेले, कोमल व कठोर भावनांनी ओतप्रोत भरलेले आणि शेवटी दुःखद घटनेने घडलेले एक शोकांत नाटयमय व हृदयंगम असे बनविले आहे. हे काव्य मी वाचत असतांना त्यांचेकडून मला योग्य त्या सूचना मिळत होत्या. सुमारें अडीच तास हे माझे प्रेम-काव्य मी बारकाईने वाचत होतो. शेवटी हे नवीन प्रेमकाव्य मी या वयात लिहिल्याबद्दल गुरुवर्यांनी माझे अभिनंदन केले व आनंद व्यक्त केला. त्यांची व माझी ती शेवटची भेट ठरेल अशी त्यावेळी मला कोठून कल्पना असणार? पण दिनांक २७ मे १९८६ रोजीं त्यांचे देहावसान झाल्याचे वृत्त कळतांच त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो तेव्हां मला अत्यंत भडभडून आले व मी अगदी सुन्न होऊन गेलो.

प्रा. वि. मा. दी. पटवर्धन, महाराष्ट्र कवि श्री. यशवंत व गुरुवर्य प्रा. अरविंद मंगरूळकर हे माझे तीन सर्वश्रेष्ठ साहित्यिक मित्र हा इहलोक सोडून गेले व ते आज माझा 'अमृत धारा' हा नवीन पंधरावा सचित्र काव्य-

संग्रह पहावयास ह्यात नाहीत, हा माझा दैवदुर्विलास आहे.

अमृत धारा ' हा माझा नवीन सचित्र पंधरावा काव्य संग्रह प्रसिद्ध करण्यात मी नेहमीप्रमाणे धाडस केले आहे. या काव्यसंग्रहात पांच प्रदीर्घ कविता (म्ह. छोटीशी काव्येच घडवलेली असून) इतर ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक, विनोदी व उपहासात्मक वगैरे नाना प्रकारच्या वैचित्र्यपूर्ण कवितांचा अंतर्भाव केला आहे. नवीन विनोदी व उपहासात्मक कविता खेळाडू वृत्तीनेच नेहमीप्रमाणे या संग्रहात घातल्या असून रसिक वाचक त्याच दृष्टीने व उल्हसित वृत्तीने त्यांच्याकडे पाहतील अशी आशा आहे. विनोदी व उपहासात्मक कविताबाबत माझे स्पष्ट विचार ' धूमधडाका ' या प्रथमावृत्ति संपलेल्या काव्यसंग्रहात सविस्तरपणे मांडलेले असल्याने त्यांची पुनरुक्ती करण्याचे मी येथे टाळले आहे.

ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक अशी खंडकाव्यें अलीकडे नामशेष होत चालली आहेत. छंदोबद्ध कविता तर फारशी सहसा कुठें आढळून येत नाही. नवकाव्याचे युग सुरू झाल्याने मराठी कविता ही नवीन नवीन वळणें घेत आहे व तिचा प्रवाह निरनिराळ्या मार्गाने अखंड वाहून राहिला आहे. नवोदित कवि आपल्या कर्तबगारीनें व कलाकौशल्यानें मराठी काव्य वाङमयात मोलाची भर टाकतील अशी सदिच्छा मला व्यक्त कराविशी वाटते.

माझ्या प्रिय पत्नीनें व सहकारी मित्रांनी मला सतत प्रोत्साहन दिल्या-मुळेंच मी पुणे नगर वाचन मंदिर, भरत नाट्य संशोधन मंदिर, कॉलेज व पोस्ट ऑफिसातही अनेक सांस्कृतिक कार्यक्रम करूं शकलों व नोकरी संभाळून काव्यलेखन सातत्याने चालू ठेवित गेलो. मला जे कांही मिळाले ते मी श्रीशारदेची मजवर कृपा आहे असे समजतो. ' जी दे देव स्थिती तयांतुन सदा आनंद मानायचा ' या प्रवृत्तीमुळे मी पूर्णपणे समाधानी आहे. ' Love thy art and not thy self व Give to the world the

best you have and the best will come back to you व ' थांबला तो संपला ' अशी माझी जीवन तत्वें, चिरंतन स्वरूपात मी सतत जोपासली असून आपली आत्मोन्नति स्वतःच जाणीवेच्या खडतर तपस्येतून करून घेतली आहे.

कवि–संमेलनात भाग घेण्यासाठी काढून कधीं कोणाचे आमत्रण आले तरच मी जरूर जातो. पण तेथें एखाद दुसरी कविता वाचून माझे समाधान होत नाही म्हणून मी स्वतन्त्रपणे माझा एक ते दीड तास कार्यक्रम ठरवून माझ्या विनोदी व उपहासात्मक कवितांनी रसिकांचे मनोरंजन करीत असतो. पुण्यात व परगांवीही अनेक ठिकाणी मी असे कार्यक्रम करीत आलो आहे.

वयोमानानुसार माझी प्रकृति अलीकडे कधी कधी बरी नसते, त्यामुळें मी घराबाहेर फारसा कुठें जात नाही. नवीन कुठे चांगले कार्यक्रम असल्यास व उत्कृष्ट नाटक कुठल्या थिएटरात लागल्यास जरूर तेथे ऐकण्यास व पहावयास जातो स्वतःच्या घरात राहूनच सतत वाचन, मनन व लेखन अखडपणे चालू ठेवले आहे. टी. व्ही. पाहणे, रेडिओ ऐकणे, टेपरेकॉर्डरवर आवडती गाणी लावणे, प्रिय पत्नीच्या निधनानंतर (दि.१६.९-१९८१) लहान नातवंडाना सभाळून, त्यांच्याशी हसत खेळत दिवस केव्हा आणि कसे मजेत निघून जातात ते कळत नाही. डॉक्टर जॉन्सन् यांनी म्हटले आहे कीं To be happy at home is the ultimate end of all the ambitions ' आणि त्यानुसार माझा जीवनक्रम सांप्रत सेवानिवृत्ती नतरही आनंदात चालला आहे.

माझी आई तिच्या ऐंशी वर्षांपर्यंत ती जगली. तिचे कृपाछत्र मला अनेक वर्षे लाभून गेले. आज मला तिची आठवण येत आहे. तिच्या हयातीत माझा ' आकाशगंगा ' हा पहिला काव्यसंग्रह मी तिलाच अर्पण केला आहे व त्यांत ' आई ' ही पहिली कविता घातली आहे. तिच्याबद्दल मी असे लिहिले आहे कीं –

तेजोनिधी दिव्व देवांगना तूं सुधा आणुनी स्वर्गलोकातली
जणुं ज्ञानसंवर्धनाच्यामिषाने मला दुग्धपानांपरी पाजली !

व शेवटी म्हटले आहे की—

सामर्थ्य येवो शरीरात माझ्या तुझे फेडण्या पांग थोडेतरी
आयुष्य लाभो तुला दीर्घ आई ! टिकाया कृपाछत्र माझ्यावरी !

मला आयुष्य किती वर्षापर्यंत आहे याचा अंदाज अद्यापपर्यंत तरी आलेला नाही. एक प्रकारें तें ठीक आहे कारण अजून वाचन करण्याचे माझें कार्य खूप राहून गेले आहे व लेखन करण्याचे वेड तर न सुटणारे असे आहे. चुकून मध्येंच कधी मरण आले तर ते सुखाने यावे, एवढीच माझी इच्छा आहे.

शेवटी 'अमृत धारा' हा माझा नवीन पंधरावा सचित्र व छंदोबद्ध काव्यसंग्रह सर्व रसिकांना आवडो, ही श्रीशारदेच्या चरणी नम्र प्रार्थना.

आषाढ वद्य ४ शके १९०८
दि. २४-७-१९८६

**वि. शै. काळे (बाबुलनाथ)**



# सुबोध कुमारसंभव

## काव्य–परीक्षण

(१९८४)

(कवि– ‘ बाबुलनाथ ’ ऊर्फ विनायक शामराव काळे)

कवि बावुलनाथ हे मराठीतील सुप्रसिद्ध विनोदी कवि आज ७५ वर्षांचे असले, तरी त्यांच्या काव्यनिर्मितीला खळ नाही. आजवर त्यांचे लहान-मोठे असे चौदा कवितासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. तीन संग्रह संकल्पित आहेत. स्वत:चीच प्रकाशन संस्था असल्याने बाह्य बाजारी अडचणींव्यतिरिक्त त्यांना प्रकाशनास अडचण नाही. इमारत एक खांबी आहे. आपल्या अमृत-महोत्सवी वर्षानिमित्त त्यांनी ‘ सुबोध कुमारसंभव ’ ही अभिनव रचना आता प्रकाशित केलेली आहे. मुद्रण गुण, कागद, बांधणी इत्यादि सर्व आजच्या महागाईच्याहि काळांत फार चांगले ठेविले आहे, ही एक अभिनंदनीय गोष्ट आहे. योग्य त्या ठिकाणीं चित्रकार डॉ. भैय्यासाहेब ओंकारांचीं कथाचित्रें आणि मुखपृष्ठावर कु. रजनी फणमळकरांचें चित्र आहे. त्यामुळे आकर्षकतेंत भर पडली आहे.

कालिदासाच्या ‘ कुमारसंभवावरून ’ प्रस्तुत रचना कवीने घेतली असली तरी तो अनुवाद नाही. भाषांतरहि नाही. ‘ कुमार संभव ’ मुळांतून वाचून, तें नीटपणें अंगीं मुरवून घेऊन, बाबुलनाथांनी स्वत:च्या प्रकृतीस अनुसरून त्याचा गेय आविष्कार केला आहे. तसें करितांना त्यांनी विविध जातींची आणि छंदांची योजना केली आहे. संपूर्ण सतरा सर्गांचें ‘ कुमार संभव ’ अशा प्रकारें आपल्याला मानवेल तसे भाग पाहून त्यांनी त्याने



मराठी ग्रंथ संग्रहालय
–१४९–
रा.

मराठी रसिकांना सादर केलें आहे. तात्पर्य, कालिदासाच्या ' कुमार संभवा'-चा हा पुनर्जात अवतार आहे. म्हणून त्यांत कालिदासाचें व्यक्तिमत्व शोधण्यापेक्षा कालिदासाच्या आधाराने प्रकटलेल्या बाबुलनाथांच्याच रुचि-अभिरुचींचा आविष्कार पाहणें युक्त होय. आणि तो पद्यमय आविष्कार मराठी वाचकांना आवडेल असाच आहे.

सामान्यतः ' कुमार संभवा 'चा परिचय पहिल्या पांच, अथवा फार तर आठ सर्गांचा असतो. पण बाबुलनाथांनी सर्वच्या-सर्व, म्हणजे सतरा सर्गांच्या कथेचा येथे आविष्कार केलेला आहे. गेय रचनेला अनुकूल होतील, अशा सोयीने कथेचे त्यांनी स्वयंपूर्ण भाग पाडिले आहेत. ते सर्व चांगले आहेत. क्वचित कांही लांबट झाले आहेत. तथापि सर्वांची वृत्तरचना विविधतेची आहे. काही ' गज्जला 'हि आहेत. कांही स्थळीं अडखळल्या-सारखे होत असलें, तरी इतक्या विविध जाति-छंदांची निभावणी शेवट-पर्यंत सफाईने करणें ही गोष्ट खास सराईतपणाची आणि दमदारपणाची आहे, ह्यांत शंका नाही. अलीकडच्या काळांत इतक्या विविध अशा गेय छंदांचा संग्रह हा पहिलाच असावा. १ ते ८ सर्ग हा पहिला भाग अधिक हृदयंगम आहे. परंतु ९ ते १७ हेहि सर्ग बाबुलनाथांनी चांगले सजविले आहेत. बाबुलनाथांची भाषा सरळ-सुबोध आणि स्वच्छ आहे. वृत्ति रंगतदार आहे. आणि त्यांत कालिदासाचें छत्र चिरंतनचें त्यांच्या शिरावर आहे. ह्या सर्वांमुळे प्रस्तुत ' कुमार संभव ' गेय गुणांमुळे गाणाऱ्याला जसा लोभसवाणा, कालिदासीय स्पर्शामुळे रंगदार, तसाच वाचणाऱ्यालाहि चमत्कृतिजनक आणि विविध छंदांमुळे आकर्षक झाला आहे.

**— अरविन्द मंगरूळकर**

**सुबोध कुमारसंभव**

डेमी पृ. १८४ योग्य किंमत रुपये वीस

---

काळे ब्रदर्स पब्लिकेशन

# एक कल्पवृक्ष
# व
# दोन विहंग



कै. शंकर शामराव काळे
(कवि-' चंद्रचूड ')
अस्तोदय ' या विलापिका
खंड काव्याचे लेखक
जन्म ' मृत्य
१०–२–१८९६ १२–१०–१९३७



श्री. विनायक शामराव काळे
(कवि ' बाबुलनाथ ' )
' सुबोध कुमार संभव ' या
महाकाव्याचे लेखक
जन्म ७–७–१९०९
(नाबाद ७८)

विनायक शामराव काळे

# कवि बाबुलनाथ यांची काव्यकला

**काव्यसंग्रह :**
आकाशगंगा
जलधारा
मुंग्यांचे वारुळ
प्रभंजन
धुवाँधार
त्रिशूळ
गीतवर्षा
त्रिवेणी
जहाँआरा आणि
अजब कविता
नर्मदा किनारा
धूमधडाका
अमृत धारा

**काव्यें :**
रसराज जगन्नाथ
स्वामी रामतीर्थ
सुबोध कुमार संभव
(सर्ग १ ते ८ व ९ ते १७
दोन भाग)
अस्तोदय (संपादित)
(कवि कै. चंद्रचूड)

**आगामी :**
निवडक बाबुलनाथ
(गंभीर कविता)
खंड १ ला

निवडक बाबुलनाथ
(विनोदी व
उपहासात्मक कविता)
खंड २ रा

अस्तोदय
(विलापिका खंडकाव्य)
कवि कै. चंद्रचूड
(नवीन तिसरी
आकर्षक आवृत्ति.)

**काळे ब्रदर्स पब्लिकेशन**

'शामसदन', ६० सोमवार पेठ, पुणे ११.

REFBK-0025179

REFBK-0025179